


म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं.क्र. ७४८
REFBK-0008906


# ाग्रा

ब. मो. पुरंदरे

चिरंजीव नंदू राजहंस

यास आशीर्वादपूर्वक भेट

शिवचरित्र-मालेतील पुस्तकें :

## विक्रीस तयार :

* ★ लाल महाल
* ★ प्रतापगड
* ★ पन्हाळगड
* ★ राजगड
* ★ पुरंधर
* ★ आग्रा

## संकल्पित :

* ★ सिंहगड
* ★ राज्याभिषेक
* ★ सज्जनगड
* ★ रायगड

# पेटाऱ्यांत बसण्यापूर्वी

महाराज छत्रपति शिवाजी राजांना मित्रांपेक्षां शत्रूच फार होते. मित्र पांच असतील तर शत्रु पांचशें. आणि तेहि स्वकीय. परकीयांना सामील होऊन स्वकीय महापुरुषांचा आणि त्यांच्या कार्याचा नायनाट करण्यासाठीं ह्यातभर अभिमानपूर्वक झुंजण्याची आमची परंपरा फार जुनी आहे. पुरु-राजाविरुद्ध शत्रूला कोण सामील झालं? पृथ्वीराजाविरुद्ध शत्रूला आग्रहाचं निमंत्रण कोणीं पाठवलं? राणा प्रतापाविरुद्ध परकीय सत्ताधीशांना सामील होऊन, त्याला वणवण वनवास कोणीं भोगायला लावला?

आम्हीं! आम्हीं! आम्हीं!

मग शिवाजीला आम्हीं मोकळा सोडूं काय?

चुलतभाऊ, मेव्हणे, सावत्रभाऊ, व्याही, मामा, जांवई, मामेभाऊ, पुतणे इत्यादि नातलगांनींहि प्रत्यक्ष लढून महाराजांना विरोध केला. मग इतरांची संख्या किती मोजावी!

स्वकीय आणि परकीय एकजीव होऊन महाराजांच्या महान् कार्याला सुरुंग लावीत होते. त्यांच्याविरुद्ध दमदाटीचीं सरकारी फर्मानें त्यांच्या अनु-यायांत फिरवीत होते. त्यांचा कोंडमारा करीत होते. हें बीज विषारी आहे असा कांगावा हे साप करीत होते. हें कार्य चिरडून भरडून टाकूं, अशा प्रतिज्ञा करीत होते.

—आणि तरीहि सूर्याच्या सातत्यानें, ध्रुवाच्या निष्ठेनें, चाणक्याच्या आत्मविश्वासानें, महारुद्राच्या शौर्यानें आणि रघुराजाच्या त्यागवृत्तीनें महा-राज आपल्या ओंजळभर सौंगड्यांसह उभे होते. स्वतंत्र, स्वाभिमानी, बलाढ्य पण उदार असें सार्वभौम सिंहासन निर्माण करीनच करीन, ह्या निर्धारानें उभे होते.

महाराजांची खात्री होती कीं, आपलं कार्य हें श्रीरामाचं कार्य आहे, श्रीकृष्णाचं कार्य, परमेश्वरी कार्य आहे.

जर श्रीरामाचं कार्य करायचं असेल, तर प्रत्यक्ष आईहि वनवासास पाठ-वील. सद्धर्म आणि संस्कृतीच्या सिंहासनावर राज्याभिषेक करून घेण्याचा हक्क

असूनहि वल्कलें नेसून कंटकाकीर्ण वनवास पत्करावा लागेल. जर श्रीकृष्णाचं कार्य करायचं असेल तर प्रत्यक्ष मामाच जिवावर कुऱ्हाड घेऊन उठेल. आणि तेंहि पाठचीं सख्खीं भावंडें ठार मारून.

आहे तयारी ? तयारी असेल तर यश हमखास तुमचेंच !

महाराजांच्या सौंगड्यांची तयारी होती. महाराज त्यांच्या आघाडीला होते. जयश्री दुसरीकडे जाईल कोठें ? सत्कार्याला विरोध करणारी आसुरी शक्ति फार काळ टिकत नसते. काळे ढग जमतील. ग्रहण लागेल. क्वचित् खग्रासहि ग्रहण लागेल. पण तें कधींहि कायम टिकणार नाहीं.

महाराजांच्या ईश्वरी कार्यालाहि एकदां ग्रहण लागलें होतें. पण ग्रहणालाहि पर्वणी मानून धारातीर्थांत उभ्या रहाणाऱ्या महाराजांना व त्यांच्या सौंगड्यांना खात्री होती कीं, हा क्षणिक काळोख दूर सरेल. तोंपर्यंतच वेदना. तोंपर्यंतच यातना. नंतर ? गतिमान् सप्त अश्वांच्या अठ्ठावीस टापांत अस्मान जिंकूं !

ह्या माझ्या शिवकथाभारतांतील ग्रहणकालाचा हा अध्याय मी आपणांपुढें वाचीत आहें. श्रोतेहो, चित्त एकाग्र करून श्रवण करा.

शिवचरित्राच्या कथारूप मालेचा हा सहावा भाग आहे. ह्या लेखनांतील माझी भूमिका मीं पूर्वीच्या भागांत सांगितलीच आहे.

बहुत काय लिहावें ? आमचें अगत्य असों द्यावें. विज्ञापना.

—ब. मो. पुरंदरे

* * *

# आ ग्रा



१०६

# १ : महाराज

महाराजांची फार मोठी दौलत मृत्यूनें लुटली.

पुरंधरचा किल्लेदार मुरारबाजी देशपांडे ठार झाला. महाराज आईच्या दुःखानं शोक करीत होते. पुरंधर पडला असता तर दहा वेळां पुन्हा जिंकून घेतां आला असता; पण मुरारबाजी पडला. आतां पुन्हा तो मिळणार नाहीं. महाराज दुःखी झाले होते.

—आणि दिलेरखान पुरंधरच्या पायथ्याशीं अन् वज्रगडावरून खुशीच्या तोफा उडवीत होता.

पुरंधरचा किल्लेदार पडला तरी पुरंधर किल्ला पडलेला नव्हता. गडावरचे भगवे झेंडे बुलंद दिमाखांत फडकत होते. दिलेरखानाला गड हवा होता. नवे हल्ले चढविण्याकरितां तो जंगी तयारी करीत होता.

मिर्झा राजे जयसिंग ह्यांनीं कोंडाण्याला फौज पाठवून गेले दोन महिने सख्त वेढा घातला होता. कोंडाण्यावर खुद्द जिजाबाई आईसाहेब आणि महाराजांच्या एक राणीसाहेब होत्या. पुरंधरचा आणि कोंडाण्याचा वेढा एकदमच सुरू झाला होता. अद्याप दोन्हीहि किल्ले चिवटपणानें झुंजत होते. दोन महिने उलटून गेले तरी खानाला पुरंधर मिळण्याचीं चिन्हें दिसत नव्हतीं. गडावरील महार, कोळी, मावळे आणि रामोशी किल्लेदारावांचून किल्ला लढवीत होते. आतां मात्र खानाला विलक्षण आश्चर्य वाटूं लागलें. हे लोक गेंड्याहून चिवट आहेत, वाघाहून शूर आहेत अन् मासळीहून चपळ आहेत. ह्यांना जिकावं कसं?

"आमचा एक किल्लेदार पडला म्हणून गड सोडूं का काय? आम्ही समदे किल्लेदारच आहोंत. आमच्या किल्लेदारानं पाठीवरून हात फिरवला आहे आमच्या. आम्ही महाराजांचीं माणसं. मरूं पण गड न्हाई देणार!" —गडावरले लोक म्हणत होते.

मोंगलांच्या असंख्य फौजेशीं टक्कर देतांना महाराजांच्या मूठभर स्वराज्य-सेनेची शक्ति पिळून निघत होती. महाराज अत्यंत चिंताक्रांत झाले होते. मिर्झा राजा जयसिंगासारखा प्रभु रामचंद्राच्या वंशांत जन्मलेला रजपूत

राजा औरंगजेबाच्या गुलामगिरींत कां आनंद मानतो, याचं त्यांना कोडं सुटत नव्हतं. वास्तविक एवढा बलाढ्य रजपूत हा! जर मनांत आणील तर दिल्लीचें तख्तहि काबीज करूं शकेल. आज औरंगजेब कुणाच्या जिवावर राज्य करतोय्? कुणाच्या जिवावर त्यानं राज्य मिळवलं? जर मिर्झा राजांनीं त्याला मदत केली नसती तर हा महाकपटी असुर गादीवर आला असता काय? स्वतःच्या शत्रूपेक्षां आपल्यांत ताकद जास्त असूनहि शत्रूचेच नोकर बनण्याची काय ही नादान हौस! आपण स्वतंत्र असावं, सार्वभौम असावं, हा विचारहि ह्या माणसांना शिवत नाहीं का! स्वतःला सूर्याचे वंशज म्हणवून घेतात आणि काभिन्न अंधारांत घुबडासारखे संसार थाटतात वंशज रामचंद्राचे पण कृति मात्र मारीचाची! कशी कळणार ह्यांना स्वाभिमानाची चव! कसा आवडणार ह्यांना स्वातंत्र्याचा स्वच्छंद सुगंध? परकीयांकडून फटके आणि लाथा खात ह्यांनीं त्यांचीं ओझींच वहावींत! बादशहानें मिर्झा राजे ही पदवी दिली, ह्यांतच हा सूर्याचा वंशज खुश होता.

जयसिंह, जसवंतसिंह, सुजनसिंह, रायसिंह, किरतसिंह—सगळे हे असे होते. गुलाम!

पुरंधरच्या पायथ्यापासून दीड कोसावर मिर्झा राजांची छावणी होती. हर उपायानें महाराजांना दिल्लीच्या दावणींत बांधण्यासाठीं मिर्झा राजे राबत होते. त्यांची फौज, त्यांचा खजिना, त्यांचा तोफखाना मराठ्यांविरुद्ध खर्च होत होता. राजे स्वतः राबत होते. प्रत्येकाला राबवीत होते. आणि ह्यांतून देवहि सुटला नव्हता. महाराजांचा पराभव व्हावा, दख्खनचं स्वराज्य नष्ट व्हावं म्हणून मिर्झा राजे व्रतवैकल्यें, अनुष्ठानें, जपतप, होम सतत करीत होते. शंकराची आणि कालरात्रीं बगळामुखी देवीची आराधना चालू होती!

मिर्झा राजांनीं स्वराज्यांत सर्वत्र फौजा पाठवून विध्वंस मांडला होता. कानदखोऱ्यांत, मुसेखोऱ्यांत, मुठेखोऱ्यांत, खेडेबाऱ्यांत, कऱ्हेपठारांत आणि अंदर मावळांत मिर्झा राजांची फौज धुमाकूळ घालीत होती. कुतुबुद्दीनखान लोहगडच्या जवळ सात हजार फौज घेऊन बसला होता. पुण्यांत फौज होती. कोंडाणा, पुरंधर वेढलेले होतेच. रोहिडा व शिरवळकडे स्वार दौडत होते. ह्या सबंध मोंगल फौजेंत मिर्झा राजांच्या रजपुतांचाच भरणा अमाप होता.

**महाराज :**

अनुक्र. 27003 नि. ... क्रमांक ... नों. दि. ...

तरीहि महाराजांना आशा वाटत होती कीं, हा रजपूत जयसिंह आपल्या रामकार्यांत आपल्याला मदत करील. निदान आशीर्वाद देईल. निदान विरोध करणार नाहीं. बस्स ! इतकं केलं तरी पुरे आहे. गेल्या वीस वर्षांत हजारों जिवलगांचे जीव वेंचूनहि आपण राज्यसाधना किती केली? महाराष्ट्राचा नितकोर तुकडासुद्धां अद्याप स्वतंत्र झालेला नाहीं. सारख्या फौजावर फौजा चालून येताहेत. उलटा वारा. उलटा प्रवाह. आम्हांला विरोध आमच्याच लोकांचा. आमचेच मोरे, घोरपडे, नाईक निंबाळकर, घाटगे आमच्या विरुद्ध. जसवंतसिंग आले होते तेहि आमचे. खरोखर हे सारेजण ह्या ईश्वरी कार्यांत सामील होतील तर ? सारा देश सहा महिन्यांत स्वतंत्र करूं. अयोध्या, उज्जयिनी, मथुरा, द्वारका, धारानगरी, दाहोद, इंद्रप्रस्थ आणि हस्तिनापूर येथल्या प्राचीन पवित्र सिंहासनांचा जीर्णोद्धार करून पुनः देवराज्य प्रस्थापित करूं. कुणी कुणाचा गुलाम राहणार नाहीं. सद्धर्म आणि सुसंस्कृति येथें नांदेल. परंतु......

महाराजांनीं राजगडावर बाळाजी आवजी चिटणीस, मोरोपंत पिंगळे, रघुनाथ बल्लाळ कोरडे, त्र्यंबक सोनदेव डबीर, निराजी रावजी वगैरे आपल्या अत्यंत निष्ठावंत मुत्सद्द्यांशीं चालू संकटाबद्दल रात्रंदिवस खलबतें केलीं. ह्यांतून मार्ग कसा काढावा, हें उमजत नव्हतें. ह्या प्रसंगीं लढून निभावणार नाहीं, हें स्पष्ट दिसत होतं. महाराजांच्या मनांत वावरणारी आशा प्रबळ झाली आणि मिर्झा राजांकडे माणूस आणि पत्र पाठवून या रजपुतांत कितपत ओलावा आहे, हें पाहावयाचें महाराजांनीं ठरविलें. लगेच तहाचीं बोलणीं करण्यास आपण तयार असल्याचें पत्र फारसनविसाकडून महाराजांनीं लिहविलें. त्यांतहि आमिष आणि धूर्तपणा होताच. 'मी बादशहांचा बंदा नौकरच आहें. लहान असलों तरी बादशहांचा पुष्कळ फायदा करून देईन. दख्खनच्या ह्या डोंगराळ प्रदेशांत आपण जर विजापूरचा मुलूख जिंकण्याची मोहीम काढीत असाल तर यश निश्चित येईल. मी सेवेस हजर आहें.'— हा त्या पत्राचा आशय होता. स्वराज्यावरील हें झेंगट जर विजापुरावर ढकलतां आलं अन् ह्या निमित्तानं जर मिर्झा राजांचं मन जिंकतां आलं तर–?

महाराजांनीं थैली तयार केली आणि आपल्या करमाजी नांवाच्या जासुदाच्या हातीं दिली.

" करमाजी, ही कामगिरी तुमची ! आम्ही जबाबाची इंतजारी करीत आहोंत ! जय जगदंब ! "

करमाजी थैली घेऊन निघाला. राजगडाहून मिर्झा राजांची छावणी अकरा कोस होती. करमाजी चार घटकांच्या आंत छावणीच्या गीर्द पेशांत दाखल झाला. शिवाजी राजांकडून जासूद आलेला पाहून छावणींत कुतूहल दाटलं. मिर्झा राजांकडे वर्दी गेली. करमाजी राजांच्या शामियान्यांत दाखल झाला. त्यानें राजांना कुर्निसात केला.

" महाराज शिवाजी राजांकडून आलों आहें. जासूद. महाराजांनीं आपल्या खिदमतीस थैली पाठविली आहे. नजर इनायत करावी. " थैली ओंजळीत धरून करमाजी म्हणाला.

" शिवाजी राजाका खत ? ले जाव वापस। मैं उसे पढना भी नहीं चाहता !" करड्या शब्दांत मिर्झा राजांनीं करमाजीचा अर्ज फेटाळून लावला.

" सरकार रहेमदिल आहेत ! निदान एकदां तरी सरकारांनीं थैलीवर नजर मुबारक फिरवावी. एवढ्याहि करमवक्षीनें महाराज धन्य होतील. महाराजांची अत्यंत नम्र विनवणी आहे, एकवार थैली पाहावी. " आदबीनें वांकून करमाजीनें थैलीची ओंजळ पुढें केली.

मिर्झा राजे महाराजांचं साधं पत्रहि वाचायला तयार नव्हते ! गुलामगिरीची गुर्मी ! आणि महाराजांना आशा वाटत होती कीं, राजे स्वराज्याला मदत करतील. खारट पाणी !

पण लगेच काय वाटलं कोण जाणे, मिर्झा राजांनीं म्हटलं, " अच्छा अच्छा ! बताव ! "

राजांच्या अर्जबेगीनें लगेच पुढें येऊन करमाजीच्या हातांतील थैली घेतली व राजांच्या हातांत दिली. मिर्झा राजांनीं वाचली. विजापूरची मोहीम हातीं घ्या, मी मदतीस येतों, असें महाराजांनीं सविस्तर पण अत्यंत धूर्तपणानें लिहिलें होतें. पत्र वाचतांच लगेच मिर्झा राजांनीं उदयराज मुनशीकडून पत्रास जबाब लिहविला. तो असा होता.—

" बादशाही फौज अस्मानांतील ताऱ्यांप्रमाणें असंख्य आहे. तुमचा पराभव करून पाडाव करण्यासाठीं ती आली आहे. तुमचा डोंगराळ व खडकाळ

मुलूख तिला मुळींच दुर्गम नाहीं. आमच्या घोड्यांच्या टापाखालीं कसल्याहि अवघड प्रदेशाची धूळ उडेल. तुम्हांला जर तुमचा जीव वांचवायचा असेल तर आदबीनें बादशहाची गुलामगिरी पत्करून बिनशर्त शरण या. ह्या गुलामगिरींत आमच्यासारख्या सरदारासहि भूषणच वाटतें. तुम्ही आपल्या किल्ल्यांची व डोंगरांची आतां आशा सोडा. असें न कराल तर आपल्या हातानें तुम्ही आपली खराबी करून घ्याल. तुम्ही सुज्ञ आहांत!"

गुलामगिरीचें काय भयंकर विष मिर्झा राजांच्या रोमरोमांत भिनलें होतें! औरंगजेबाची गुलामगिरी करण्यांत त्यांना भूषण वाटत होतें!

मिर्झा राजांच्या जबाबाची थैली घेऊन करमाजी निघाला.

* * *

आधार : मराठी रियासत-२ : पृ. १०६ ते १०९.
सरकारकृत शिवाजी : पृ. ११९-१२०.

मिर्झा राजांच्या जबाबाची थैली घेऊन करमाजी राजगडावर आला. सदरेवर आपल्या मुत्सद्द्यांसह महाराज बसले होते. मोठ्या आतुरतेनें महाराजांनीं थैली घेतली. चिटणिसांनीं वाचली. त्यांतील एकेक शब्द विषारी होता. मिर्झा राजांची स्वत्वहीन, स्वाभिमानशून्य, गुलामी वृत्ति पाहून महाराजांना फार वाईट वाटलं. त्यांचं हृदय घुसळून निघालं. केवढा फरक ! कोणीकडे मुरारबाजी अन् कोणीकडे मिर्झाराजे, कोणीकडे महाराणा प्रताप अन् कोणीकडे राजे जयसिंह ! एकाची वृत्ति लक्ष्मणाची, तर दुसऱ्याची दुःशासनाची; एकाचें स्मरण स्फूर्तिप्रद तर दुसऱ्याचें किळसवाणें; एकाची पूजा स्वर्गातल्या नंदनवनांतील फुलांनीं, केशरकस्तुरीच्या आणि मौक्तिकांच्या गंधाक्षतांनीं, रत्नांच्या दीपज्योतींनीं करावी, तर दुसऱ्याची पूजा—?

अमृताच्या झारीच्या तोंडांत मिर्झाराजे येऊन बसले होते.

महाराजांना ह्या लाचार धर्मद्रोह्याला, देशद्रोह्याला काय लिहावं, काय सांगावं, हेंच समजेना. अफाट बळ घेऊन आला होता. मोरे, अफझुलखान, बाजी घोरपड ह्यांच्याइतकीच मिर्झा राजांची लायकी होती. वास्तविक भवानी तलवारीच्या एकाच फटकाऱ्यानें शहाणपण शिकविणें जरूर होतें. पण अवघड होतें. म्हणूनच तर महाराज शब्दांच्या परड्या पाठवून मिर्झा राजांना तीं फुलें हुंगवीत होते. झाले शहाणे तर झाले ! पण महाराजांची पहिली परडी मिर्झाराजांनीं चुरगाळून टाकली.

महाराज बेचैन झाले. वादळानें पालापाचोळा उधळावा, झाडें करकरा वांकावींत, दारेंखिडक्या थडाथड आदळाव्यात, भांड्यांची उतरंड कोसळावी, वस्त्रप्रावरणें उडून जावींत, असें महाराजांच्या मनांत विचारांचें तुफान उठलें.

"चिटणीऽऽस !" महाराजांनीं चिटणिसांस आरोळी दिली : "लिहा लिहा ! अजून एकवार ह्या रक्ताच्या रजपुताला आमच्या काळजांतले चार शब्द लिहा !"

आणि महाराजांनीं आवेगानें मजकूर सांगायला सुरुवात केली.

" हे श्रेष्ठ सरदारांच्या सरदारा ! हे राजांच्या राजा ! हे भरतखंडांतील बगीच्यांच्या रक्षका ! हे राजा रामचंद्राच्या वंशदीपका ! तुझ्यामुळेंच रजपुतांची गर्दन बुलंद आहे. तुझ्यामुळेंच बाबराच्या औलादीची सल्तनत जादा ताकदवान होत आहे. आणि तिच्या सिकंदर तकदीरानं तिला तुझ्याकडून किमदाद मिळत आहे.

हे जवान आणि नशीबवान् अकलमंद जयसिंहा, ह्या शिवाजीच्या कुर्निसाताचा आणि नजरेइनायतीचा स्वीकार कर. जगदीश्वर तुझी हिफाजत करो आणि तुला धर्मांचा व न्यायाचा रस्ता दाखवो !

मीं असें ऐकलें आहे कीं, तूं माझ्यावर सुलतानढवा करण्यासाठीं आणि दख्खनचा मुलूख काबीज करण्यासाठीं आला आहेस. हिंदूंचीं हृदयें आणि डोळे फोडून त्यांच्या रक्तानें तूं दुनियेंत फत्ते होऊं पहात आहेस. पण तूं हें जाणत नाहीं कीं, या तुझ्या कारनाम्यानें तुझ्याच तोंडाला काळोखी फासली जात आहे. कारण ह्यामुळें देशावर व धर्मावर संकट आलें आहे. जर तूं दिल साफ ठेवून विचार करशील आणि तुझ्या स्वतःच्या रक्ताळलेल्या हाताकडे पहाशील तर तुला दिसेल कीं, हा रंग कोणाच्या रक्ताचा आहे !

हे जयसिंहा, जर तूं तुझ्या स्वतःकरितां ही दख्खन जिंकण्याकरितां आला असतास, तर मी माझें मस्तक आणि माझे डोळे तुझ्या पायातळीं अंथरले असते. मी तुझ्या घोड्याबरोबर मोठी फौज घेऊन चाललों असतों आणि ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत सारा मुलूख जिंकून तुझ्या स्वाधीन केला असता. पण तूं औरंगजेबासारख्या सज्जनांच्या दगाबाजाच्या जाळ्यांत सांपडून आला आहेस. आतां तुझ्याशीं कोणते डाव खेळावे तें मला कळत नाहीं; कारण जर मी तुला येऊन सामील झालों, तर त्यांत मोठी बहादुरी नाहीं. कारण हिंमतबहाद्दर मर्द समयाची सेवा करीत नाहीं. शेर कधीं कोल्ह्यासारखे वागत नाहींत. अन् जर मी समशेरीचा आणि फरशीचा वापर केला तर दोन्हीहि बाजूंनीं हिंदूंचेंच नुकसान होईल. दुःखाची गोष्ट अशी कीं, मुसलमानांचें रक्त पिणें सोडून दुसऱ्याच कामाकरितां मला माझी समशेर म्यानांतून बाहेर काढावी लागेल. जर ह्या लढाईकरितां स्वतः औरंगजेब आला असता, तर आम्हां बहादरांना घरबसल्या शिकार मिळाली असती. पण तो अदालत आणि धर्म ह्यांपासून च्युत झालेला सैतानच आहे.

जेव्हां अफझुलखानाकडून कांहींच कर्तबगारी घडली नाहीं आणि शाएस्ताखानहि कुचकाम ठरला तेव्हां तुला माझ्याशीं युद्ध करण्यास तो पाठवीत आहे. कारण तो स्वतः आमचें शौर्य सहन करील इतका धैर्यशील नाहीं.

औरंगजेब इच्छितो कीं, हिंदूंचा कोणीहि बहाद्दर माणूस शिल्लक उरूंच नये. सारे शेर आपसांत लढून जखमी व्हावेत आणि कस्त व्हावेत अन् मग गिधाडांनीं वनराज म्हणून मिरवावें.

हा गुप्त डाव तुझ्या डोक्यांत कसा शिरत नाहीं? मला वाटतें कीं, तूं त्याच्या जादूमुळें हुरळून गेला आहेस. तूं जगांत पुष्कळसे भलेबुरे अनुभव घेतले आहेस. बगीच्यांतील ,फुलें आणि कांटेहि तूं एकत्र केले आहेस. तूं आम्हां लोकांशीं जंग करावेंस आणि हिंदूंच्याच गर्दनी धुळीला मिळवाव्यात हें योग्य नाहीं. अशी मातबर कर्तबगारी अंगीं आल्यावरहि तूं लहान मुलांसारखे असले पोरखेळ खेळूं नकोस. शेख **सादींच्या** ह्या शब्दांची याद कर कीं, ' सर्वच ठिकाणीं घोडा फेकून काम होत नाहीं; कधीं कधीं ढाल फेकून पळूनहि जावें लागतें. '

शेर जंगली जनावरांच्यापुढें शौर्य दाखवतात. पण सिंहाबरोबर लढण्यास प्रवर्तत नाहींत. जर तुझ्या समशेरींत पाणी असेल आणि तुझ्या उसळणाऱ्या घोड्यांत दम असेल, तर स्वधर्माच्या वैऱ्यावर चढाई करून इस्लामचीं पाळेंमुळें तूं खणून काढावींस हेंच तुला इष्ट आहे.

जर दारा शिकोह हा बादशाह झाला असता तर आमच्या लोकांना योग्य वागणूक मिळाली असती; पण तूं जसवंतसिंगाला धोका दिलास; भल्याबुऱ्याचा विचार केला नाहींस.

तूं कोल्ह्याचे डावपेच पुरतेपणीं खेळला नाहींस आणि आतां सिंहाशीं जंग करण्याची हिंमत करीत आहेस. ह्या धावपळीनें तुला काय मिळत आहे! तुझी प्यास तुला मृगजळ दाखवीत आहे.

तूं त्या नीच औरंगजेबाच्या मेहेरनजरेबद्दल कसल्या फुशारक्या मारतोस? झुंझारसिंहाच्या कर्तबगारीचा नतीजा तुला माहीतच आहे. कुंवर छत्रसालाभोंवतीं त्यानें कशा आपत्ति निर्माण केल्या, हेंहि तुला माहीतच आहे. दुसऱ्या अनेक हिंदूंवर त्या दुष्टानें कसकशीं संकटें आणलीं, हें तुला माहीत नाहीं

काय ? मला वाटतं, तूं औरंगजेबाशीं संबंध जोडला आहेस आणि आपल्या कुलाच्या मर्यादाहि त्याच्याकरितां सोडून दिल्या आहेस.

पण हें बंधन त्या सैतानाला काडी किंमतीचं आहे. कारण तें विजारीच्या नाडीच्या बंधनाहूनहि जास्त बळकट नाहीं. तो हैवान आपल्या स्वार्थासाठीं भावांचें रक्त आणि बापाचे प्राण ह्यांचीहि पर्वा करीत नाहीं. जर तूं स्वामिभक्तीच्या गोष्टी करशील, तर शहाजहानाबरोबरची तुझी वागणूक एकदां आठव. जर परमेश्वरानें तुला थोडीशीहि अक्कल दिली असेल आणि तूं मर्दपणा अन् मर्दुमकी ह्यांची घमेंड मारीत असशील, तर तूं आपल्या जन्मभूमीच्या सूडानें आपली समशेर तापव आणि अत्याचारानें होरपळलेल्यांच्या अश्रूंचें तिला पाणी दे.

ही वेळ आपसांत लढण्याची नाहीं. कारण हिंदूंच्या शिरावर मोठी कठीण कामगिरी येऊन पडली आहे. आमची औलाद, आमचा देश, देव, दौलत व देवळें आणि देवाचे पूजक ह्यांच्यावर औरंगजेबामुळें आपत्ति कोसळत आहे. त्यांच्या दुःखांना सीमा नाहीं. कांहीं काळपर्यंत जर असेंच चालू राहिलें, तर दुनियेंत आमची नामनिशाणीहि उरणार नाहीं.

मूठभर मुसलमानांनीं आमच्या एवढ्या मोठ्या देशावर हुकुमत चालवावी ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. बहादुरी हें त्यांच्या हुकुमतीचें मुळींच कारण नाहीं. जर एवढें समजण्यापुरती बुद्धि असेल तर पहा, तो आमच्याशीं कसें कपट करीत आहे. आपल्या चेहऱ्यावर कसकशा छटा नाचवीत आहे. आमच्याच सांखळीनें आमचेच पाय कसे बांधून टाकीत आहे. आणि आमच्याच तरवारींनीं आमचीं मस्तकें कशीं उडवीत आहे !

आम्हां लोकांना ह्या वेळीं हिंदु, हिंदुस्थान आणि हिंदुधर्म ह्यांच्या रक्षणाकरितां प्रयत्नांची कमाल केली पाहिजे. आम्हीं प्रयत्न केले पाहिजेत. एक कांहींतरी हमखास केलें पाहिजे आणि आपल्या देशाकरितां हिकमतीची शिकस्त केली पाहिजे. तरवार आणि तकदीर ह्यांना पाणी चढविलें पाहिजे आणि तुर्कांना जबाब तुर्कीतच दिला पाहिजे. जर तूं जसवंतसिंहाला जाऊन मिळशील आणि मनापासून त्या दगाबाज औरंगजेबाचा पिच्छा पुरवशील आणि उदयपूरच्या महाराण्याबरोबरहि ऐक्य करशील, तर खूपच मोठें काम होईल.

चारहि बाजूंनीं धांऊन जाऊन तुम्ही लोक युद्ध करा! ह्या सापाचें डोकें दगडांनीं ठेचून काढा!! मग तो कांहीं दिवसपर्यंत आपल्याच कृत्यांच्या परिणामांविषयीं विचार करीत राहील आणि दख्खनमध्यें आपलें कपटजाल पसरविणार नाहीं. मी इकडे हातांत चकचकीत भाले असलेल्या वीरांबरोबर विजापूरच्या आणि गोवळकोंड्याच्या बादशहांचा निःपात करीन.

अस्मानाप्रमाणें गरजणाऱ्या फौजेकडून मुसलमानांवर तलवारीच्या पाण्याची बरसात करीन. दख्खनच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत इस्लामचें नांव आणि निशाण पुसून टाकीन. आणि मग सफेजंग भालाईत स्वारांबरोबर उसळणाऱ्या आणि गंभीर गर्जना करणाऱ्या नदीप्रमाणें, दख्खनच्या पहाडांतून उत्तरेच्या मैदानांत मी उतरेन. अत्यंत जलदीनें तुम्हां लोकांच्या मदतगारीस येऊन हाजीर होईन आणि मग औरंगजेबास तुमचा हिशेब विचारीन.

मग आपण चौगीर्द युद्ध करूं आणि औरंगजेबास लढाईचें मैदान संकुचित करून टाकूं. आपण आपल्या सैन्यांच्या लाटांना दिल्लींत–त्या कोलमडत आलेल्या घरांत पोहोंचवूं. आणि मग त्याच्या नांवांत 'औरंग'हि राहणार नाहीं आणि 'झेब'हि राहणार नाहीं! त्याची अत्याचारी समशेरहि राहणार नाहीं आणि दगाबाजीहि राहणार नाहीं!!

आपण शुद्ध रक्तानें भरलेली एक नदी वहावयास लावूं आणि तिच्यांत आपल्या पितरांच्या आत्म्यांकरितां तर्पण करूं. परमेश्वराच्या मदतीनें आम्ही औरंगजेबाची जागा जमिनीच्या खालीं तयार करूं. हें काम कांहीं फार कठीण नाहीं. हृदय, डोळे आणि हात यांचीच जरूरत आहे. दोन हृदयें एक झालीं तर पहाडहि फोडूं शकतात व मोठ्या फौजेलाहि उद्ध्वस्त करूं शकतात. याविषयीं मला तुझ्याशीं खूप बोलायचं आहे. तें पत्रांत लिहिणं योग्य नाहीं. आपण दोघांनीं मिळून बातचीत करावी, अशी माझी तमन्ना आहे. म्हणजे उगीच परेशानी व तकलीफ होणार नाहीं. तूं चाहत असशील तर तुझ्याशीं बोलण्याकरितां मी येईन आणि तुझें म्हणणें ऐकून घेईन. आपण शिकस्तीचे प्रयत्न करूं आणि त्या मगरूर राक्षसावर एखादा मंत्रप्रयोग करूं. आपल्या कार्यसिद्धीकडे नेणारा एखादा रस्ता शोधून काढूं आणि जमिनीवर अन् स्वर्गांत आपलें नांव उज्ज्वल करूं.

तरवारीची शपथ, घोड्याची शपथ, देशाची शपथ आणि धर्माची शपथ मी घेतों कीं, या मनसुब्यामुळें तुझ्यावर कोणतीहि आपत्ति येणार नाहीं. अफझुलखानाच्या प्रकारानें तूं शंकित होऊं नकोस. तो माझ्या घाताकरितां बाराशें तगडे लढाऊ हबशी स्वार घेऊन आला होता. जर मी प्रथमच त्याच्यावर हात चालविला नसता तर मग तुला हे पत्र कोणीं लिहिलें असतें! पण तुझ्याविषयीं मला असली भीति वाटत नाहीं. कारण तूं माझा कोणी दुष्मन नव्हेस. जर माझ्याकडे तुझें योग्य उत्तर आलें तर मी तुझ्याकडे येईन. जर हें पत्र तुझ्या मनास न आलें तर मग माझी तीक्ष्ण धार असलेली तरवार आहे आणि तुझें सैन्य आहे.

उद्यां ज्या वेळीं सूर्य आपलें मुख संध्येच्या पदराआड लपवील त्या वेळीं माझी अर्धचंद्राकृति तलवार म्यानांतून बाहेर पडेल! बस्स, कल्याण असो!"

महाराजांचें हें तळमळीचें पत्र मिर्झा राजांकडे रवाना झालें.

* * *

**आधार** : Shivaji Souvenir : पृ. १६१ ते १७०.
शिवकालीन पत्रसार संग्रह : ले. १०४२.

# २ : : पुरंधरच्या पायथ्याशीं

पत्र मिर्झा राजांकडे रवाना झालें. राजांनीं वाचलें. महाराजांचे तळमळीचे बोल प्रत्येक ओळींत व्यक्त झाले होते. निःस्वार्थीपणें आणि निष्ठा-पूर्वक महाराज स्वराज्याचें व्रत आचरीत होते. आणि मिर्झा राजांना ह्या गंगेंत अवगाहन करण्यास बोलावीत होते. साठ वर्षांच्या उभ्या हयातींत इतक्या तळमळीचें, स्वाभिमानाचें आणि देव-देश-धर्माच्या निष्ठेचे शब्द त्यांनीं ऐकलेच नव्हते. जन्मभर गुलामगिरीच्या दुर्गंधींत त्यांनीं दिवस काढलेले. एकदम नाकासमोर आली ती कस्तुरी. अत्यंत सुगंधी पण तितकीच उष्ण. पहिला वास घेतांच रक्ताचा बुळणा फुटावा, इतकी जळजळीत. पत्र वाचून राजे कावरेबावरे झाले. पत्रांतील विचार इतके भयंकर जळजळीत व बंडखोर होते कीं, सतत बादशहांचे आणि त्यांच्या शहाजाद्यांचे हुकूम झेलीत हांजी हांजी करणाऱ्या त्यांच्या मनाला ते पेलवेनातच. पण एकदम वीज चमकावी तशी मिर्झा राजांना आपल्या दास्यवृत्तीची जाणीव होऊन गेली. महाराजांची धर्मसेवा आणि स्वातंत्र्यप्रेम अन् आपली स्वतःची लाचार गुलामवृत्ति त्यांच्या मनाच्या तागडींत जाऊन पडली आणि निमिषार्धांत त्यांचें पारडें उंच उडालें. न कळत त्यांना स्वतःबद्दल लाज वाटून गेली; महाराजांबद्दल नकळत आदर उमटूं लागला.

पण औरंगजेबाविरुद्ध बंड ? बंडाचे विचार ? छे, तें अशक्य. तें न पेलणारं होतं. जन्मभर केलं तें एकाच क्षणांत सुटणं शक्य नव्हतं. औरंगजेबाचे अन्याय, राक्षसी वृत्ति, कपटी स्वभाव, त्याच्या पापांची रास मिर्झांना दिसत होती. पण तरीहि आत्तांपर्यंत जगदीश्वर मानलेल्या दिल्लीश्वराला आयुष्याच्या सायंकाळीं विरोध करायचा, हें त्यांना न पचणारं होतं. आजपर्यंत मान मोडेतों औरंगजेबाच्या हुकुमांचें जूं मानेवर वाहिलें; निष्ठेंत कधींहि कुचर केली नाहीं आणि आतां एकदम विरोध ? अशक्य !

कांहींहि झालं तरी औरंगजेब मिर्झा राजांचा नातलग होता ! ते त्याच्या घरांत पोरीबाळी देऊन बसले होते ! औरंगजेबाचा मात्र कोणावरच विश्वास

८०६

नव्हता, मिर्झा राजांवरहि नव्हता; कारण मिर्झाराजे काफीर होते ! कदाचित् ते आणि शिवाजी परस्पर एक होतील, ह्या भयानें त्यानें दिलेरखानाचं तंगडं राजांच्या तंगडीशीं बांधून टाकलं होतं. मिर्झा राजांना हें कळत होतं; पण गुलामगिरीचे सांखळदंड तोडण्याची शारीरिक ताकद असूनहि ते तोडवत नव्हते. कारण प्रेरक मन अत्यंत दुबळं होतं. मेलेलं होतं. मनं मेलं कीं उरतं फक्त जिवंत प्रेत !

औरंगजेबाशीं निष्ठा आणि शिवाजीला सहानुभूति ह्या दोन्हीहि गोष्टी राजांच्या मनांत वावरूं लागल्या. सोडवेना धरवेना, धरवेना सोडवेना. महाराजांच्या विचारांनीं ते काळनिद्रेंतून थोडे जागे मात्र झाले.

समोरच्या पुरंधरावर दिलेरखानाचा तोफखाना गर्जत होता. किल्ल्यावर किल्लेदार नसूनहि महारारामोशांसारख्या अडाण्यांनीं किल्ला झुंजत ठेवलेला अहर्निश दिसत होता. केवढी त्यांची स्वराज्यनिष्ठा. खरोखर अडाणी कोण ? बेफाम होऊन भगव्या झेंड्याखालीं लढणारे ते महार कीं आपण ? अस्पृश्य कोण ? ते कीं आपण ?

महाराजांच्या विचारांनीं मिर्झा राजांच्या मनांत वादळ नाहीं तरी फुंकर मात्र उसळली.

औरंगजेबाशीं निष्ठा कायम ठेवून शिवाजीचं थोडंसं कल्याण करून आपल्या इतमामाला धक्का लागूं न देतां औरंगजेब आणि शिवाजी ह्या दोघांनाहि कसं सांभाळतां येईल, कशी मदत करतां येईल, याचाच विचार राजे करूं लागले ! म्हणजे दोरीवरचा डोंबाऱ्याचा नाचच !

महाराज राजगडावर प्रयत्नांची शिकस्त करीत असतांना जगदंबेची आराधना मनःपूर्वक करीत होते. तीच अधिष्ठात्री आदिशक्ति मार्ग दावील, असा त्यांना नितान्त विश्वास होता. राजकारणें चालूच होतीं. मिर्झा राजांकडून कांहींच कौल आलेला नव्हता. एक दिवस एकान्त चित्तेंकरून महाराज जगदंबा तुळजाभवानीपुढं बसले होते. देवीवर सुंदर ताज्या सुगंधी फुलांची पूजा शोभत होती. दीप तेवत होते. महाराजांच्या समीपच चिटणीस, रघुनाथपंत आदि मंडळी हात जोडून उभी होती. नितान्त शांतता होती. सुगंधी धूप जळत होता. धुरानें वातावरण धुंद झालें होते. महाराज नेत्र मिटून एकाग्र झाले होते. भवानीचरणीं एकरूप झाले होते. कितीतरी वेळ

ते असेच बसले होते. एकदम त्यांच्या अंगांत आदिशक्तीचा संचार झाला. चिटणिसांनीं पुढें झुकून कान टवकारले. अत्यंत गंभीर आणि संथ स्वरांत महाराजांच्या तोंडून शब्द बाहेर पडूं लागले : " संकट थोर ! काळ प्रतिकूल ! मुलांस सांगावें कीं, या समयीं संधि करणें प्राप्त पडतें. चिंता नसावी ! "

चिटणिसांनीं श्रीभवानीचे शब्द कानांत सांठविले. क्षणभरानें महाराज सावध झाले आणि त्यांनीं देवीच्या चरणीं मस्तक ठेवलें.

" जगदंब जगदंब ! "

महाराजांनीं वळून चिटणिसांकडे पाहिलें. पुढें झुकून सर्वांनींच नमस्कार केला आणि चिटणीस म्हणाले : " संकट थोर ! काळ प्रतिकूल ! मुलांस सांगावें कीं, या समयीं संधि करणें प्राप्त पडतें. चिंता नसावी ! "

" श्रीजगदंबेची आज्ञा ! "

खलबतखान्यांत मुत्सद्द्यांसह महाराज बसले. खूप विचारविनिमय झाला आणि तहाचीं बोलणीं करण्याकरितां मिर्झा राजांकडे हेजीब रवाना करण्याचें मुकर्रर झालें. महाराजांनीं पत्रें लिहविलीं आणि रघुनाथ बल्लाळांस महाराज म्हणाले : ' रघुनाथपंत, स्वराज्याची आणि स्वधर्माची वकिली मिर्झा राजांकडे जाऊन तुम्हीं करावयाची. हे खडकावरचे घाव आहेत; मूर्ति घडली तर नमस्कारासाठीं आमचे हात जोडलेलेच आहेत. जगदंबेच्या आज्ञेनें तहाचे मनसुबे करीत आहोंत. यश देणार ती. " थैलीचे गोंडे ओढून महाराजांनीं थैली बंद केली.

रघुनाथपंत मुजरा करीत पुढें आले.

" जय भवानी ! " महाराजांनीं थैली पंतांच्या हातांत दिली, " पंत मिर्झा राजांना सांगा कीं, तुम्ही आम्ही रजपूत आहोंत, परके नव्हे. आम्ही निःशंकपणें आपणांस भेटावयास येऊं ! "

राजगडावरून पंत रघुनाथ बल्लाळ कोरडे मिर्झा राजांकडे जाण्याकरितां निघाले. त्या दिवशीं तारीख होती २० मे १६६५.

त्याच दिवशीं पंत पुरंधरच्या पायथ्यानजीक असलेल्या मिर्झा राजांच्या छावणींत जाऊन पोहोंचले. शिवाजी राजांकडून वकिलीस हेजीब आला आहे, हें समजतांच राजांनीं रघुनाथ पंतांची लगेच भेट घेतली.

पंतांनीं कळकळीच्या शब्दांत महाराजांचें सर्व मनोगत मिर्झा राजांस निवेदन केलें. मुरारबाजींच्या पराक्रमानें, कोंडाण्याच्या अनुभवानें आणि महाराजांच्या पत्रानें मिर्झा राजांच्या डोळ्यांत अंजन पडलें होतें. ते आतां डोंबाऱ्यासारखी दोरीवरची राजकारणी कसरत करीत होते. हृदयांत असलेला सद्भाव महाराजांकडे कलत होता. हृदयांत असलेली निष्ठा औरंगजेबाचे पाय सोडायला तयार नव्हती.

"पंडितजी, आमचं सामर्थ्य तुम्ही पहात आहांत. तुमच्या दौलतींत सर्वत्र आमच्या फौजा नाच करीत राहिल्या आहेत. शिवाजी राजे आपल्या धर्माचे आणि देशाचे अभिमानी आहेत तें आम्ही जाणतों; पण भावनेच्या भरांत खडकाला टक्कर देणं हा अविचार आहे. आम्हीहि धर्मनिष्ठच आहोंत, रजपूत आहोंत राजांच्या हिताचे शब्द आम्ही सांगतों. संपूर्ण नाश टाळायचा असेल तर त्यांनीं बादशहाला शरण यावं आणि आपला बचाव करावा. ह्यांतच त्यांचें कल्याण आहे. बादशहाकडून त्यांचा मानमरातब व सर्फराजी होईल, अशी आम्ही जरूर हमी देतों. राजे जर बिनहत्यारानें बादशहापुढें जातील तर त्यांच्याकडे बादशहांच्या दयेचा ओघ वळेल."

"शिवाजी महाराज आपले राजपुत्र संभाजी राजे यांना आपल्याकडे नौकरीस पाठविण्यास तयार आहेत." पंत म्हणाले.

"केवळ संभाजी राजे येऊन चालणार नाहीं."

"महाराज आपल्याशीं तह करावयास तयार आहेत. आपल्या भेटीस ते निःशंक येतील."

शिवाजी राजे निःशंक येतील, असें पंतांनीं म्हणतांच मिर्झा राजांना अत्यंत आश्चर्य वाटलें. परंतु चेहऱ्यावर कांहींच न दिसूं देतां ते म्हणाले, "जरूर! आम्ही म्हणतों त्या गोष्टीस राजे कबूल असतील, तर राजांच्या अपराधांची क्षमा होऊन बादशहाची मेहरनजरहि प्राप्त होईल. भेटींत आमच्या गोष्टी राजास मंजूर झाल्या नाहींत, तर सुरक्षितपणें परत जाण्याची त्यांना परवानगी मिळेल. राजांनीं माझं ऐकावं. त्यांचं त्यांत कल्याण आहे."

तहाचीं बोलणीं करण्याकरितां महाराजांनीं धाडलेलें रघुनाथ पंतांबरोबरचें पत्र मिर्झा राजांनीं दिलेरखानाकडे रवाना केलें. त्याला विचारल्याशिवाय

कसं काय करायचं ? त्याच्या नकळत बादशहाशीं निष्ठावंत राहण्याची मिर्झा राजांना चोरी होती !

खानानें मोठ्या गुर्मीतच पत्र वाचलें. कदाचित् ह्या पत्राप्रमाणें तह ठरून शिवाजी शरण आल्यास पुरंधर जिंकून घेण्याची व ती ऐट मिरवण्याची संधि हातची जाईल, गेल्या अडीच महिन्यांचे श्रम फुकट जातील, आम्ही लढून पुरंधर जिंकला अशी मिजास मिरवतां येणार नाहीं म्हणून खानास काळजी लागून राहिली. त्यानें अत्यंत उर्मट भाषेंत महाराजांसाठीं पुढील पत्र मिर्झा राजांकडे रवाना केलें. खानानें महाराजांस लिहिलें होतें, ' महालदाराबरोबर तुमचें पत्र आलें तें पावलें. मजकूर कळला. तह करण्याची तुमची इच्छाहि कळून आली. लढण्याच्या पूर्वींच तुम्ही तहाचीं बोलणीं करतां हें अजब आहे ! अशा बोलण्याकडे लक्ष देणें, हें आमच्यासारख्या बादशाही अधिकाऱ्यांस शोभणार नाहीं. ( पत्रांत खानानें मिर्झा राजांनाहि वरील टोमणा जातां जातां टणकावून दिला. ) तुमच्या या डोंगराळ मुलखांत शिकार आणि नाच करण्यासाठीं आम्ही उत्तर हिंदुस्थानांतून इतके दूर आलों आहोंत. आमची एवढीच इच्छा आहे कीं, तुम्ही एकदां जातीनें येऊन आमच्याशीं सामना करावा. आम्ही तुमच्या मुलखांत पाहुणे आलों असतां, पुढें येऊन आमचा समाचार घेण्याऐवजीं तुम्ही दूर दूरच राहतां, हें ठीक नव्हे. तुमचे ते मजबूत किल्ले, गगनचुंबी पर्वत आणि पाताळास पोहोंचणारीं दरींखोरीं प्रत्यक्ष पाहण्याची आमची इच्छा असतां, तुम्ही तर कोठें दिसतच नाहीं ! आणि वर तहाचीं बोलणीं करतां ! हा तहाचा विचार तुम्हीं आधींच केला असतां तर बरं झालं असतं ! आतां तरी हा विचार सुचला हेंच चांगलं झालं. '

खानानें टोचून लिहिलेल्या भाषेंतील हें पत्र राजांकडे आलें. हें पत्र व मिर्झा राजांचा निरोप घेऊन रघुनाथपंत छावणींतून बाहेर पडले. ते राजगडावर रवाना झाले.

पुरंधर अद्याप लढतच होता. ३१ मार्चला खानाचा वेढा पडला. १६ एप्रिलला मुरारबाजी ठार झाला. एप्रिल संपला. मे संपला. तरीहि अद्याप गडावरचीं माणसं झुंजतच होतीं. खान धडका देत होता. पण व्यर्थ ! त्याच्या डोक्याला टेंगळं येत होतीं. जूनचा पहिला आठवडाहि संपला.

राजगडावर पंत आल्यावर महाराजांनीं सर्व गोष्टी ऐकून विचार ठाम केला आणि मिर्झा राजांच्या भेटीस जाण्याचें त्यांनीं ठरविलें. महाराज निघाले. रघुनाथपंत आणि अत्यंत निष्ठेचीं पण अगदीं थोडीं माणसं बरोबर घेऊन महाराजांनी राजगड सोडला. महाराज पालखींतून निघाले.

११ कोस काटून महाराज मिर्झा राजांच्या छावणीजवळ येऊन पोहोंचले आणि त्यांनीं रघुनाथपंतास आपण आल्याची खबर देण्यास पुढें पाठविलें.

एवढ्यांत राजांच्या छावणींत, शिवाजी महाराज येत असल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि एकच गडबड उडून गेली. शिवाजी ? शिवाजी ? शिवाजी ? आला ! खरच आला ! प्रत्यक्ष आला ! अरे बापरे ! आतां हा शिवाजी काय गडबड उडवितो कोणास ठाऊक ! शाएस्ताखान, खवासखान, फत्तेखान, अफझुलखान, फाझलखान, इनायतखान, रणदुल्लाखान, शेरखान, अबदुलफतेखान, कारतरफखान, सलाबतखान ह्या मंडळींची दाणादाण उडविणारा शिवाजी इथं आला ! आतां आपलं कसं व्हायचं ? तंबूतंबूतून कुतूहलानें, भीतीनें, औत्सुक्यानें धांवपळ उडाली. शिवाजी तहाकरितां येत आहे, या जाणिवेनें ते कांहींसे निर्धास्त होते. पण न जाणो—! महाराजांना पाहण्याकरितां ते हजारों हशम राजांच्या शामियान्याच्या वाटेवर दुतर्फा गर्दी करून उभे राहिले.

मिर्झा राजे आपल्या शामियान्यांत दरबार मांडून बसले होते. उग्रसेन कछवा, उदयराज मुनशी, गाझी बेग, रायसिंह सिसोदिया आणि निकोलो मनुची हा गोरा टोपीवाला हे राजांच्या दरबारांत बसले होते. रघुनाथपंत दरबारांत प्रवेशले आणि त्यांनीं मिर्झा राजांस कुर्निसात केला. ह्या वेळीं सकाळचे आठ वाजले होते. शिवाजी राजांचा वकील आलेला पाहिल्यावर मिर्झा राजे चमकले. तेवढ्यांत पंत म्हणाले, " सरकार, ठरल्याप्रमाणें महाराज शिवाजी राजे आपल्या मुलाखतीस आले आहेत ! "

" ऑं ? " मिर्झाराजे मनांतून दचकलेच. खरोखरच शिवाजी आला काय ? माझ्यावर विश्वास ठेवून माझ्यासारख्या शत्रूच्या सरदाराच्या छावणींत शिवाजी आला ? धाडस ! वाघाचं धाडस !

" किती लोक आहेत बरोबर ? " आपल्या मनांतल्या छटा चेहऱ्यावर उमटूं न देतां संयमी कठोर सुरांत राजांनीं विचारलें.

" सरकार, फारच थोडे लोक आणि सहा ब्राह्मण व पालखीचे भोई आहेत."

मिर्झा राजे लगेच सामोरे जाऊन महाराजांस भेटले. आलिंगनपूर्वक भेट झाली.

अशीच भेट सहा वर्षांपूर्वी प्रतापगडाच्या पायथ्याशीं झाली होती. पण त्या भेटींत आणि ह्या भेटींत केवढा फरक! हा फरक मिर्झा राजांना फारच जाणवला. महाराज स्मितपूर्वक नम्र व गोड शब्द बोलत होते. उभयतां राजे शामियान्यांत आले. मिर्झा राजांची सारी फौज कुतूहलानें महाराजांकडे पहात होती.

महाराज शामियान्यांत लोडाशीं बसले. शामियान्यांतूनच समोर पुरंधरावर चाललेली लढाई त्यांना दिसत होती. तोफांचे आवाज व त्यांचे प्रतिध्वनि ऐकूं येत होते. धुराचे लोट दिसत होते. मिर्झा राजे जयसिंह शेजारीच होते. पुरंधराकडे हात करून ते म्हणाले, " राजे, वज्रगड तर आम्हीं घेतलाच. पुरंधरची माची आणि बालेकिल्ला हाहि लवकरच कबजा करूं." आणि राजे हंसले.

" आम्ही आतां बादशाही नौकरींत दाखल झालों आहोंत. पुरंधर तुम्हांस देण्यास मी तयार आहें."

" पुरंधरशिवाय इतर किल्ले तुम्ही बादशहास द्या. पुरंधर तर आम्ही घेणारच."

" पुरंधरचा आत्तांच कबजा घ्या. आणि आंतील लोकांस निघून जाऊं द्या." महाराज म्हणाले.

" मंजूर!"

लगेच महाराजांनीं आपला एक हेजीब व मिर्झा राजांनीं आपला सरदार गाझीबेग या दोघांस दिलेरखानाकडे रवाना केले. या दोघांनीं खानास महाराजांची विनंती सांगितली कीं, किल्ला ताब्यांत घ्या आणि आंतील लोकांस सुखरूपपणें खालीं उतरूं द्या.

खानानें कबूल केलें. त्याला पुरंधर मिळणार होता; पण जिंकून नव्हे; महाराजांच्या हुकुमावरून. जिंकून घेण्याची हौस हवेंतच राहिली.

महाराजांनीं माणूस पाठवून पुरंधरवरच्या आपल्या लाडक्या मंडळींना गड खालीं करून देण्यास कळविलें. वरच्या मंडळींनीं केवळ महाराजांचा

हुकूम म्हणूनच किल्ला सोडला. झेंडे काढून घेतले. नौबत खालीं आणली. गडाला शेवटचा मुजरा करून लोक खालीं उतरले. खानाचा झेंडा गडावर चढला.

महाराजांचा मुक्काम मिर्झा राजांच्या शेजारच्याच तंबूंत होता. तहाचीं बोलणीं सुरू झालीं. तहाचा आराखडा मिर्झा राजांनीं आधींच तयार करून ठेवला होता. त्यांनीं महाराजांपुढें कोंडाणा, तुंग, तिकोना, लोहगड, विसागड, रोहिडा वगैरे अत्यंत बळकट व महत्त्वाच्या अशा तेवीस किल्ल्यांची यादी व त्यांखालच्या मुलखांचा तपशील टाकला.

" राजे, एवढे किल्ले व एवढा मुलूख तुम्हीं बादशहास देऊन टाकावा. तुमचे युवराज संभाजी राजे यांना बादशहा पंचहजारी मनसब देतील. तुम्ही हरवख्त बादशहांच्या मदतीस जरूर त्या त्या वेळीं दाखल झालें पाहिजे. कोंकणचा मुलूख आणि घाटावरील बारा किल्ले आणि त्याखालचा मुलूख हा तुमच्याकडे राहील. बादशहांची नौकरी संभाजी राजांनीं करावी. सख्त नौकरीची अट तुम्हांवर नाहीं. मात्र नेकीनें मदत केली पाहिजे. तुम्ही खास जातीनें राजधानींतल्या दिवाण-इ-आममध्यें बादशहांच्या भेटीसाठीं जावें ! बादशहा तुमची सन्मानपूर्वक भेट घेतील. तुमची सर्फराजी करून, तुम्हांस दौलती देऊन परत दख्खनकडे रवाना करतील. बादशहांची मोठी इच्छा आहे कीं, तुम्हांस भेटावें, तुमचा गौरव करावा, तुम्हांस दख्खनची सुभेदारी देऊन व फौज आणि पैसा पुरवून तुमच्याकडून विजापूर आणि गोवळकोंडा हीं राज्यें जिंकावींत. यांतच तुमचें कल्याण आहे. "

हाच पुरंधरचा तह.

एका मुठीनें तेवीस किल्ले आणि त्यांखालचा मुलूख देण्याचा प्रसंग आला. बोट बोट भूमि स्वतंत्र करतांना आपल्या मावळ्यांना केवढा त्याग व कष्ट करावे लागले आहेत ! आणि ती स्वतंत्र झालेली भूमि परत देऊन टाकायची ! औरंगजेबाला देऊन टाकायची ! तेवीस किल्ल्यांवरचे भगवे झेंडे खालीं घ्यायचे ! महाराजांना मरणप्राय दुःख होत होतं. पण निरुपाय होता.

आणि शिवाय औरंगजेबास भेटावयास दिल्ली-आग्र्याकडे जायचं ! म्हणजे मृत्यूच्या मुखांत ! मृत्यूच्या दाढेखालीं ! घशांतच !

शिवाजीकडून भरघोंस मुलूख व किल्ले मिळविल्याबद्दल औरंगजेबाकडून शाबासकीहि मिळवावी व औरंगजेबाकडून शिवाजीला दख्खनची सुभेदारी

द्यावी म्हणजे शिवाजीचे आत्तां काढून घेतलेले किल्ले व मुलूख सुभेदारीखालीं परत त्याला मिळतील; म्हणजे औरंगजेबहि खूष अन् नंतर औरंगजेबानें कृपा केल्यावर शिवाजीहि खूष, असा हिशेब मिर्झा राजांनीं केला. शिवाजी औरंगजेबाला भेटायला गेल्यावर व दोघांचीहि भेट झाल्यावर दोघेहि एक-मेकांबाबत निवळतील. बादशहा शिवाजीचा शहाजाद्यांप्रमाणें गौरव करील. औरंगाबाद, बीड, परिंडा, नासिक, बागलाण, कोंकण, मावळ, देश, वगैरे प्रचंड दख्खनच्या मुलखाची सुभेदारी शिवाजीला देईल. म्हणजे आजच्या स्वराज्यापेक्षां चौपट मुलूख शिवाजीच्या अंमलाखालीं येईल.—फक्त शिवाजीनें औरंगजेबाची कृपा संपादन करण्याचा अवकाश !

इतके विषारी अनुभव घेऊनहि मिर्झा राजांचा औरंगजेबावर विश्वास होता. बापास कैदेंत ठेवून विष पाठवणारा आणि सख्ख्या भावापुतण्यांचा हाल हाल करून अंत करणारा औरंगजेब शिवाजी राजांवर प्रेम करील, असा मिर्झा राजांचा विश्वास होता ! ते महाराजांना आळवून आळवून हें पटवूं लागले. महाराज सारं कांहीं पक्कं ओळखून होते. पण आज त्यांना या महाग तहाला 'हो' म्हणणं भाग होतं. सर्वच तह भयंकर होता. स्वराज्याच्या डंवरलेल्या सुंदर फांद्या सपासप छाटल्या जाणार होत्या आणि सर्वांत भयंकर म्हणजे औरंगजेबाला भेटायला जावं लागणार होतं.

औरंगजेबानें पूर्वीपासूनच मिर्झा राजांकडे लकडा लावला होता कीं, तह घडवून कांहींहि करून, शिवाजीला इकडे पाठवा. त्याला वाटेल तीं आश्वासनें द्या. तो इकडे आल्यावर भेटीनंतर मी त्याचा गौरव करून परत पाठवीन.

आणि म्हणूनच मिर्झा राजे सढळ आश्वासनांच्या व तहाच्या पेचांत महाराजांना धरून अटी कबूल करावयास भाग पाडीत होते.

"औरंगजेबाकडे भेटीस जाण्यांत किंचित्सुद्धां धोका नाहीं. ते तुमची बाइज्जत भेट घेतील; मी तुम्हांला यकीन देतों. हा यकीन राजपुताचा आहे. माझे पुत्र रामसिंग राजधानींत आहेत. ते तुम्हांला जामीन असतील. आणि तुम्ही मला रामसिंगाप्रमाणेंच आहांत." असें मिर्झा राजांनीं महाराजांना म्हटलें.

आतां कांहीं झालं तरी तहावर मंजुरीचा हात ठेवणं भाग होतं.

महाराज आणि मिर्झा राजे तहाचीं कलमें पुढें घेऊन राजकारणें करीत होते, पण तिकडे पुरंधरच्या माचीवर दिलेरखान धुसफुसत होता. मिर्झा

राजांना त्याची काळजी. प्रत्यक्ष शिवाजी राजांची आणि खानाची मुलाखत घडवून आणावी, असा मिर्झा राजांनीं बेत केला होता.

खुद्द महाराजांचा मुक्काम मिर्झा राजांच्या शेजारच्याच तंबूंत होता. तारीख ११ ते १३ जून १६६५ पर्यंत म्हणजे संपूर्ण तीन दिवस महाराज तेथें होते. एके दिवशीं रात्रीं महाराज आपल्या तंबूतून मिर्झा राजांच्या तंबूंत गेले. या वेळीं मिर्झा राजे व गोरा टोपीवाला सरदार निकोलो मनुची हे गंजिफा खेळत बसले होते. इतर कांहीं सरदार बसलेले होते. महाराज आंत येतांच सर्वजण उभे राहिले. पत्ते टाकून देऊन मिर्झा राजांनीं महाराजांचें स्वागत व सन्मान केला.

महाराज लोडाशीं बसले. त्यांना एका माणसाबद्दल मोठं कुतूहल वाटत होतं. तो माणूस म्हणजे निकोलो मनुची. हा पंचवीस वर्षांचा तरुण कोण? घारे घारे डोळे, गोरा गोरापान, सफाईनें अस्सल उर्दूत व हिंदींत बोलतो. हुन्नरबाज दिसतो. हा आहे तरी कोण?

"हें कोण?" महाराजांनीं मनुचीकडे बोट दाखवून मिर्झा राजांस विचारलें.

"हे फिरंग्यांचे राजे आहेत." मिर्झा राजांनीं मनुचींचा परिचय करून दिला.

महाराजांनीं मग अनेक प्रश्न विचारून मनुचीला त्याच्या देशांतील लोकांविषयीं, सैन्याविषयीं, युरोपांतील राजांविषयीं, राजकारभाराविषयीं माहिती विचारली. मनुचीनेंहि अगत्यानें उत्तरें दिलीं. आपल्या देशासाठीं इतर देशांकडून काय काय फायद्याची माहिती मिळते, इकडे महाराजांचें सदैव लक्ष असे.

मिर्झा राजांनीं तहाचीं कलमें मंजुरीसाठीं दिल्लीस रवाना केलीं. पण किल्ल्यांचे कबजे आतांच दिले पाहिजेत, असा आग्रह त्यांनीं धरला. महाराजांनीं ताबडतोब तें कबूल केलं. आणि तेवीस किल्ल्यांच्या किल्लेदारांना किल्ले खालीं करण्याकरितां निरोप पाठविले. रोहिडा, इंद्रमणि बुंदेल्यांच्या स्वाधीन करण्यांत आले. लोहगड, विसापूर, तुंग व तिकोना हे किल्ले कुतुबुद्दीन खानाच्या स्वाधीन करण्यांत आले. कोंडाण्याबद्दल मिर्झा राजांना फारच ओढ होती. त्यांनीं त्याबद्दल महाराजांस विचारतांच, महाराज म्हणाले, "मी स्वतःच परत जातांना कोंडाणा किल्ला खालीं करून मगच राजगडला जाईन."

महाराजांस कोंडाण्याला जाण्याची ओढ होती. ते स्वतः प्रथम जातीनें कोंडाण्यावर जाणार होते. आईसाहेब तेथें होत्या.

तारीख १३ जून रोजीं मिर्झा राजांच्या आग्रहावरून महाराज दिलेर-खानाला भेटावयास निघाले. हत्तीवर राजा रायसिंह सिसोदियाच्या समवेत मिर्झा राजांनीं महाराजांना बसवून पुरंधरच्या माचीकडे रवाना केलें.

महाराज माचीवर आले. बरोबर दोन महिन्यांपूर्वीं वज्रगड खानाच्या हातीं पडला होता. खानाची व महाराजांची भेट झाली. तेवीस किल्ले देऊन औरंगजेबास भेटावयास जाण्यास आपण तयार आहोंत, असें महाराजांनीं सांगतांच खानाला आनंद झाला.

महाराज मिर्झा राजांच्या छावणींत परत आल्यावर १४ जून रोजीं सकाळीं ते कोंडाण्याकडे जाण्यास निघाले मिर्झा राजांनीं महाराजांना एक हत्ती व दोन घोडे बक्षीस दिले व किरतसिंगास बरोबर देऊन निरोपाचे विडे दिले.

महाराज त्याच दिवशीं कोंडाण्यावर दाखल झाले. सहा महिन्यांनंतर त्यांची व आईसाहेबांची भेट होत होती. नव्या तहाचीं कलमें आईसाहेबांना सांगितल्यावर त्यांना फार फार वाईट वाटलें. पोराबाळांनीं जीव झुगारून देऊन जिंकलेले तेवीस किल्ले पुन्हा वैऱ्याच्या घशांत वैरतांना आईसाहेबांना खडतर दुःख होत होतं.

“ आणि औरंगजेबास भेटावयास दिल्ली-आग्र्याकडे आम्हीं आलं पाहिजे, असं कलम तहांत आहे ! ” महाराज म्हणाले.

“— काय ? औरंगजेबाकडे ? त्या दैत्याच्या घरीं ? नाहीं ग बाई, नाहीं नाहीं, मी जाऊं द्यायची नाहीं ! ” आईसाहेब एकदम कासावीस होऊन म्हणाल्या.

“ कठीण तर खरंच ! पण निरुपाय–अगदीं निरुपाय आहे. श्रीजगदंबेची तहाची आज्ञा आहे. ती नेणार, तीच परत आणणार ! आपण फक्त निमित्ताचे धनी ! तुम्ही चिंता करूं नका. साधल्यास राजकारणेंच साधतील.”

“ कुलस्वामिनी माझं सत्व पाहते आहे ! ”

आईसाहेबांसह आणि कबिल्यांसह महाराजांनीं त्याच दिवशीं कोंडाण्यावरून उतरून गड मोंगलांच्या स्वाधीन केला व ते राजगडावर झाले.

* * *

# : पन्हाळ्याचा प्रयत्न

मिर्झा राजांनीं पाठविलेला पुरंधरच्या तहाचा मसुदा औरंगजेबानें मंजूर करून पाठविला व महाराजांस खास फर्मान, पोषाख व प्रवासाच्या खर्चाकरितां रक्कम पाठवून दिली. पत्रांत पुढील मजकूर होता : " मुसलमानी धर्मरक्षक शिवाजी राजे यांनीं बादशाही मेहेरबानीचे उमेदवार होऊन जाणावें कीं, सांप्रत तुम्ही बहुत नरमाईनें मिर्झाराजे जयसिंह ह्यांची भेट घेऊन आपले गुन्हे माफ व्हावे म्हणून अर्ज केल्याचें पत्र आम्हांस पावलें. मजकूर ध्यानास आला. ऐसीयास तुम्हीं दूर अंदेशानं पाहतां केलेले गुन्हे माफी होण्याजोगे नाहीं. तथापि राजे जयसिंह यांनीं लिहिल्यावरून, सर्व माफ करून, तुमच्या विनंतीप्रमाणें बारा किल्ले व तळकोंकण तुमच्याकडे ठेवून, तुमचे चिरंजीव संभाजीराजे यांस पांच हजार स्वारांची मनसब देऊन, तुम्हां-करितां पोषाख व आमच्या पंजाचें फर्मान पाठविलें आहे. तरी तुम्ही आमच्या मर्जींत वागून, बादशाही लहान-मोठें कामकाज करून, त्यांतच आपलें ऊर्जित होणार आहे असें समजून वागावें. किल्ले रायगड, तोरणा, लिंगाणा, महाडगड घुसाळा, अलवारी, सरसगड, पाल, कुवारीगड, राजगड, तळेगड व उदयदुर्ग हे किल्ले तुमचे निसबतीस राहतील."

—' छ. ५ रबीलावल सन १०७७ हिजरी '

हें फर्मान व पोषाख आला. महाराजांना ह्या सोन्याच्या बेड्या सहन होत नव्हत्या; पण भोग भोगलेच पाहिजेतना !

राजगडावर महाराजांची निघण्याची तयारी सुरू झाली. आईसाहेबांचा जीव दिवसेंदिवस जास्तच कावराबावरा होत होता. कृष्ण मथुरेला जाणार होता. औरंगजेबानें महाराजांना बरोबर घेऊन येण्यासाठीं गाझीबेग नांवाच्या सरदाराची नेमणूक केली होती. मिर्झा राजे जयसिंह आणि राजे रामसिंग यांनीं महाराजांना विधिपूर्वक लेखी वचनपत्रें पाठवून दिलीं : ' तुम्ही निःशंक या. तुमच्या जीवास कोणताहि अपाय आम्ही होऊं देणार नाहीं. त्याबद्दल आम्ही पितापुत्र जामीन आहोंत. ' बरोबर कुणी कुणी यायचं, मागें आई-

साहेबांपाशीं कुणी कुणी रहायचं, राज्यकारभाराची जबाबदारी कोणावर टाकायची, कोणकोणच्या बाबतींत विशेष सावध रहायचं वगैरे मुद्द्यांचा खल बैठकींत रात्रंदिवस चालू झाला. अजून निघावयास थोडा अवकाश होता.

मिर्झा राजांनीं महाराजांचे तेवीस किल्ले कबजांत घेतले परंतु पुरंधर, कोंडाणा, लोहगड, रोहिडा वगैरे अगदीं निवडक किल्ल्यांवर त्यांनीं फौज ठेवली. बाकीच्या किल्ल्यांचें त्यांना महत्त्व न वाटून त्यांनीं ते पाडून टाकले.

महाराजांच्या ताब्यांत फक्त बाराच किल्ले राहिले. परंतु ह्या बारा किल्ल्यावरचींच माणसें जर तितक्याच निष्ठेनें व श्रद्धेनें कार्यदक्ष राहिलीं तर लवकरच गेलेले तेवीसच काय पण दोनशेंतीस किल्ले आपण परत मिळवूं, ही महाराजांची खात्री होती. बाराहि किल्ल्यांवरचीं माणसं महाराजांच्या अपेक्षा खालीं पडूं देणारीं नव्हतीं, हेंहि खासच.

औरंगजेबाकडून निघण्यासंबंधींचें फर्मान येण्याची मिर्झा राजे वाट पहात होते. ते येतांच गाझीबेगबरोबर महाराजांस आग्र्याकडे रवाना होण्यास ते सांगणार होते. मधल्या काळांत दिलेरखान व राजे जयसिंग यांनीं विजापुरावर मोहीम सुरु केली. त्या वेळीं त्यांनीं महाराजांस मदतीस पाठविलें. नऊ हजार फौज घेऊन सरनौबत नेताजी पालकरांसह महाराज ह्या मोहिमेंत दाखल झाले.

विजापूरची मोहीम सुरू झाली. फौजा विजापुरापर्यंत जाऊन थडकल्या. पण तेवढ्यांत धुमसत असलेला मत्सर आणि राग उफाळून दिलेरखान आणि मिर्झा राजे जयसिंह यांचीं आपसांतच भांडणें सुरू झालीं. महाराज गंमत पाहत होते. अखेर वैतागून मिर्झा राजे परिंड्याकडे निघाले. तेवढ्यांत महाराजांच्या डोक्यांत एक जुनी इच्छा उसळून आली —पन्हाळा किल्ला जिंकून घ्यावा— आणि लगेच त्यांनीं मिर्झा राजांस कळविलें कीं, तुमची परवानगी असेल तर मी माझा पूर्वीचा पन्हाळगड विजापूरकरांच्या ताब्यांत आहे तो परत जिंकून घेतों. मिर्झा राजांनीं ताबडतोब होकार दिला आणि महाराज पन्हाळ्यावर चालून गेले.

तारीख १६ जानेवारी १६६६ रोजीं महाराजांनीं पन्हाळ्यावर हल्ला चढविला. पन्हाळा जबरदस्त होता. हजार लोक जखमी झाले व त्यांना

माघार घ्यावी लागली. पहिल्याच हल्ल्यांत हजार जखमी ! छे, भयंकरच ! पन्हाळा जागता होता.

पन्हाळा घेण्याची महाराजांची इच्छा जबरदस्त होती. एक पन्हाळा घेतला कीं स्वराज्याची दक्षिण सरहद्द बळकट होणार होती. म्हणून त्यांच्या डोळ्यापुढं तो सारखा नाचत होता. हट्टालाच पेटलं तर समोरचा पन्हाळा लोळण घेईल ही खात्री होती. पण त्यासाठीं अनेक वीरांचं रक्त तिथं सांडायला हवं होतं.

ते वीर तयार होते. तयार नव्हते ते महाराज. कारण एक पन्हाळा घ्यायला जेवढा वेळ पाहिजे, तेवढा वेळ महाराजांपाशीं नव्हता.

यापुढचा मामला तलवारीचा नव्हता तो होता मुत्सद्देगिरीचा अन् ह्या बुद्धिबळाच्या डावांत महाराजांना लक्ष घालणं भाग होतं. तिथली नजर हालवून ती पन्हाळ्याकडं लावणं म्हणजे मुत्सद्देगिरीची दिवाळखोरी ठरली असती.

अन् म्हणूनच राजकारणाचीं पावलं ओळखून पन्हाळ्याचा नाद तूर्त सोडून महाराज आपल्या सैन्यासह आपल्या ताब्यांतील खेळण्यास परतले.

मराठी [illegible]
अनुक्रम २१००३ वि: [illegible]
क्रमांक ५४५ नों: दि: २८/१२/[illegible]

**आधार** : ( प्रकरण तीन ) :—

मराठी रिसायत – २ : पृ. १०६ ते ११५
सरकारकृत शिवाजी : पृ. १२० ते १२५
शिवकालीन पत्रसारसंग्रह : ले. १०६४ ते १०६८ व
१०७७–८८–८९
सभासद : पृ. ४४ ते ४७

---

( प्रकरण चांर )

शि. प. सं. : ले. १०८३
मराठी रियासत – २ : पृ. ११६
सरकारकृत शिवाजी : पृ. १२५ ते १३०

ऐंसवाशें तोलामोलाचे सरदार सदरेवर बसले होते, पण छाती नव्हती होत एकाचीहि मान वर करायची! महाराज रागावले होते. भिवयांच्या काळ्या काजळीखालीं त्या नेत्रज्योति भडकल्या होत्या.

महाराजांच्या हातांतलें अखबारपत्र फडफडत होतें. समोर बसलेले सारेजण भयचकित झाले होते. महाराज संतापले नसते तरच आश्चर्य होतं! कोणी भयचकित नसतं झालं तरच आश्चर्य होतं! आजच्या थैलींत आलेली बातमीच तशी भयंकर होती. अशी तशी वाऱ्यावर सुटलेली ती बातमी असती तर विश्वासच ठेवला नसता कोणी! हंसले असते लोक! पण महाराजांच्या खास अखबारनविसाकडून ती थैली आली होती.

लक्ष्मण रामाला सोडून रावणाला मिळाला असता तरीसुद्धां कदाचित् एवढं नवल नसतं वाटलं!

पण त्याहूनहि हें नवल होतं, त्याहूनहि हें आश्चर्य होतं.

खुद्द नेताजी पालकर मोंगलांना जाऊन मिळाला अशी ती बातमी होती. सूर्याचा किरणच जणूं...जणूं...अंधाराला फितूर झाला! खरोखरच लक्ष्मणानं रामाला सोडून रावणाचा पक्ष धरला!

अवघं मराठी माणूस या बातमीनं चकलं!

महाराजांच्या भिवया सरकल्या! आणिबाणीच्या प्रहराला असा मोती-मोलाचा माणूस आपल्याला टाकून गेला, म्हणून महाराजांना तीळभरसुद्धां वाईट वाटत नव्हतं. उलट त्यानं हरामखोरी केली म्हणून त्यांच्या काळजांत वणवा भडकला होता.

महाराजांच्या हातांतलं अखबारपत्र फडफडत होतं. महाराजांच्या बोटांची किंचित् चाळवाचाळव झाली आणि—!

"मंजूर नाहीं! असली बेवकुबी आम्हांला मंजूर नाहीं! आमची हुकमत डावलून दुष्मनाची संगत केली! हरामखोर! काय लपून रहातील आतां? कधींतरी सामन्याला येतीलच! आम्हींहि समशेरीच बाळगतों! बदअमलीचा नतीजा आतां त्यांच्यानं टळणार नाहीं! एतबाराचे समशेरबहाद्दर म्हणून

आम्हीं ह्यांना लाडके केले! अवध्या दौलतीची सरनौबती दिली! त्याची ही अशी इमानदारी दाखविली! आत्तां हातीं सांपडते तर टकमक टोकावरून भिरकावून दिले असते सप्तपाताळांत! बेवकूब हरामजादे!"—महाराजांच्या मुखांतून ठिणग्या तडतडत होत्या!

छेः! भयंकरच! ती लालभडक क्रुद्ध नजर—वारासुद्धां थबकला!

सारेजण माना खालीं घालून बसले होते. जणूं एका नेताजींच्या बदमाषीनं शहाण्णव कुळीच्या मराठीपणाला लाज आणली होती.

पंत पेशवे उजव्या बाजूस बसले होते. महाराजांची मान एकदम त्यांच्याकडे वळली! डोक्यावरचा मोत्याचा तुरा हेन्काळला!

"पंत!" महाराज उद्‌गारले!

"महाराज!" चटकन हात जोडून पंत किंचित् पुढें झुकले, "आत्तांच्या आत्तां स्वराज्यांतल्या कुल ठाणेदारास ताकीद फर्मावा कीं, नेताजी पालकरांना आम्हीं बडतर्फ कलं असून येथून पुढं ते मराठी दौलतीचे दुष्मन समजले जातील!—महाराज बोलले आणि एकदम उठून झपझप निघून गेले!

नेताजी पालकर स्वराज्याचा दुष्मन?

होय! दुष्मन! जो स्वराज्याचे हुकूम आणि शिस्त तंतोतंत पाळणार नाहीं, तो स्वराज्याचा दुष्मनच!

महाराजांच्या शिस्तीला अन् समशेरीला लवचिकपणा माहीतच नव्हता. कुणी वांकडा गेला कीं त्याचा तुकडा पडलाच! नेताजी पालकर म्हणजे कांहीं साधासुधा हशमप्यादा नव्हे! महाराजांचा तो उजवा हात! स्वराज्याचा सरसेनापति! पण थोडासा गुन्हा केल्याबरोबर महाराजांच्या क्रोधाग्नींत सांपडला!

आजपर्यंत नेताजीनं केवढे प्रचंड पराक्रम केले होते! अफझलखान जेव्हां महाराजांवर आला, तेव्हां महाराजांनीं अफझलखानाला एकट्यालाच मारला, पण त्याच्या हजारों सैनिकांची लाही भाजली नेताजीनेंच! महाबळेश्वराच्या जंगलांत कोंडून कोंडून कत्तल केली. खानाच्या लोकांना स्वर्गाशिवाय दुसरीकडे जायला वाटच ठेवली नाहीं त्यानें! आणि नंतर दौड मारली ती थेट लक्ष्मेश्वरपर्यंत.

शिद्दीजौहर आणि फाजलखानाच्या वेढ्यांत महाराज अडकले होते. आणि त्याच वेळीं पाऊण लाख फौज घेऊन शाएस्ताखान स्वराज्यांत घुसला होता. नेताजी जौहर आणि फाजलखानावरहि छापे घालीत होता. आणि शाएस्ताखानालाहि सतावीत होता. पन्हाळा ते नाशिक एवढ्या सुमारें दीडशें कोसांच्या पट्टींत तो शत्रूविरुद्ध धुमाकूळ घालीत होता. त्याची फौज अन् तो म्हणजे सोसाट्याचं वादळ! महाराजांनीं सुरत लुटली तेव्हां नेताजीला बरोबर घेऊनच ते गेले होते. सुरतेची माती केली ह्या नेताजीनं! स्वराज्यांत सोनं भरलं ह्या नेताजीनं! स्वराज्याला हिऱ्यामोत्यांचीं तोरणं लावलीं ह्या नेताजीनं!

राजमाता जिजाबाई आईसाहेबांचं त्याच्यावर फार प्रेम. जसं महाराजांवर तसं आणि तितकंच. कमी नाहीं. आणि महाराजांचं? तें प्रेम कशानं तुळायचं? महाराज जेव्हां अफझलखानास भेटावयास निघाले तेव्हां म्हणाले, "आम्ही निघालों! जिवंत परत आलों तर जगदंबेची कृपा! न आलों तर हें स्वराज्य नेताजीच्या स्वाधीन केलें आहे. झुंजून झुंजून सर्वांनीं राखावं!"

एवढा विश्वास अन् प्रेम महाराजांचं त्याच्यावर होतं. महाराजांचा उजवा हात होता तो. शत्रु तर त्याला प्रति शिवाजीच समजत.

—पण तोच नेताजी आज स्वराज्याचा दुष्मन झाला! तोच नेताजी महाराजांच्या हृदयकोंदणांतून निखळला!!

महाराजांनीं नेताजीची पुन्हा कोणाजवळ आठवणहि काढली नाहीं! गेला! संपला संबंध! आतां संबंध दुष्मन म्हणून!

नेताजी महाराजांपासून परस्पर फुटून निघाला तो तडक प्रथम विजापूरकरांस सामील झाला. सिंहानं कोंबडीच्या खुराड्यांत आश्रय घेण्यासारखं होतं तें!

आपण करीत असलेलं कृत्य म्हणजे कांहीं पाप आहे, असं त्याला वाटलं नाहीं आणि अजूनहि वाटत नव्हतं! महाराजांकडे असतांना तो जितका उत्साही होता, तितकाच तो अजूनहि होता. जणूं त्याला वाटत असावं कीं, आपण करतों आहों तें महाराजांची आज्ञा म्हणूनच!!! नेताजीजवळ पांच हजार स्वार होते!

लौकरच तो विजापूरकरांची बाजू सोडून मोंगलांस जाऊन मिळाला! दिलेरखानास केवढा आनंद झाला! प्रत्यक्ष शिवाजीच आपला ताबेदार झाला,

असें खानास वाटलें! आतां नेताजीच्या मदतीनें उरलेली दख्खन काबीज करूं, असें त्याला वाटलें!

नवनवीन कल्पनांचे भुइनळे खानाच्या डोक्यांत उडूं लागले! तो अनेक मनोराज्यें रंगवूं लागला. खरंच! मनोराज्यांतली मजा दुसऱ्या कश्शांत नाहीं! मनोराज्याच्या तोडीचं एक तरी राज्य या जगांत आहे का? आजपर्यंत तरी झालं आहे का? रामराज्यसुद्धां मनोराज्य पुढं फिकंच! मनोराज्य तें मनोराज्यच!

नेताजी दिलेरखानास भेटावयास गेला. खानाच्या शामियान्याची कनात वर सरकली—!

ओहोहो! केवढा मर्दानी रुबाब तो! अगदीं तश्शीच भरदार गर्दन, अगदीं तश्शीच उफाडी छाती, तस्सेच तटतटून भरलेले दंड, अगदीं तस्सेच तळपते डोळे! अगदीं थेट-थेट तस्साच-पुरंदर झुंजवतांना तो मराठा दुष्मन भेटला होता ना!-तस्साच!

— मुरारबाजी देशपांड्यासारखा!

नेताजी कनातींतून पुढें झाला. आणि-आणि अगदीं लवून त्यानें खानास मुजरा केला!! महाराजांशिवाय कोणाहीपुढं न वाकणारं तें मानी मराठी मस्तक कट्टया वैऱ्यापुढं वाकलं!!!

— मुरारबाजी आणि नेताजी पालकर!

— एकाचं मस्तक दिलेरखानापुढं तुटलं!

— आणि एकाचं मस्तक दिलेरखानापुढं झुकलं!

खानाची तबियत बेहद्द खूष झाली!

औरंगजेबाला नेताजीच्या इमानदारीची शिफारस खानानें आणि जयसिंगानें केली. औरंगजेब नेताजीची कर्तबगारी जाणून होता. नेताजी आपल्या कळपांत आलेला समजल्यावर तोहि खूष झाला. त्यानें पोषाख व पंचहजारीची मनसब नेताजीस बहाल केली.

वनराजानं ओंजळ पसरली, कोल्ह्यानं दान दिलं!

* * *

**आधार :** शि. प. सं. : ले. ११२६ सभासद बखर, पृ. ५०
शिवचरित्र साहित्य खं. ३।७६, १।५०
सरकारकृत औरंगजेब खं. ४, पृ. ११७

## ६ : : महाराज निघाले !

आग्र्यास निघण्याचा दिवस ठरला. राजगडावर गडबड उडून गेली. पण ह्या गडबडींत उत्साहापेक्षां काळजीच जास्त होती. महाराज औरंगजेबाच्या मगरमिठींत जात आहेत, ह्या जाणिवेनें जो तो चिंतावला होता. आणि आईसाहेबांच्या मनाची उलघाल तर सांगणें कठीण. म्हातारपणीं, अगदीं थकल्या-वाकल्यावर, एकुलत्या एक मुलानं एका भयंकर वैऱ्याच्या घरीं जायला निघावं, ही कल्पनाच त्यांचं काळीज कातरीत होती. अफझुलखानाच्या तडाख्यांतून सुटलेला आणि संकटांतून सूर मारून बाहेर पडलेला आपला एकुलता एक कलिजा सुसरींच्या डोहांत उडी मारायला निघाला आहे आतां. आतां भरंवसा केवळ आई भवानीवरच !

आणि महाराज आपल्याबरोबर नऊ वर्षांच्या संभाजी राजांनाहि नेणार होते. मग तर आईसाहेबांच्या हृदयांत चिंतेचा वैशाखी उन्हाळा सुरू झाला. प्रत्येकालाच अत्यंत काळजी वाटत होती. अहोरात्र महाराज प्रत्येकाशीं बोलून जपून राहून अत्यंत सावधपणें स्वराज्याचं संरक्षण करण्याबाबत कामाची वांटणी करीत होते. परोपरीनें सूचना देत होते. सर्व राज्यकारभार आईसाहेबांवर त्यांनीं सोपविला. पेशवे मोरोपंत, निळो सोनदेव मुजुमदार आणि प्रतापराव गुजर सरसेनापति यांनीं सर्व कारभारावर गरुडासारखी नजर ठेवून कारभार पहावा व आईसाहेबांच्या आज्ञेंत वागावें, असें ठरवून दिलें. किल्लेदार, ठाणेदार आणि किल्ल्यावरच्या इतर अंमलदारांनीं अत्यंत सावधपणें वागून हुकुमाचें पालन व्रताप्रमाणें करावें. डोळ्यांत तेल घालून शत्रूच्या हालचालीवर नजर ठेवावी. 'आतां स्वराज्य तुमच्या पदरांत आहे, सांभाळा !' असें महाराजांनीं सर्वांस जवळ घेऊन सांगितलें. सर्वांची विचारपूस केली. आधींच एकवार त्यांनीं सर्व किल्ल्यांवर ( म्हणजे फक्त बाराच ) जाऊन, जातीनें हिंडून किल्लेदारांसमवेत पहाणी केली होती.

आईसाहेबांपाशीं बसून महाराजांनीं त्यांना म्हटलें कीं कांहीं काळजी करूं नका. श्रींच्या कृपेनें हाहि प्रसंग निवारेल. राजकारणें साधतील. तुमचा

आशीर्वाद असल्यावर कोसळत्या वज्रांचींहि फुलें होतील. अगदीं मनांत न आणणें. श्रीजगदंबेचं छत्र आमच्या माथीं आहे."

दिवस ठरला. सोमवार फाल्गुन शुद्ध नवमी. सर्व तयारी झाली.

सोमवार उजाडला. आईसाहेबांचें चित्त उडालें. बाळ दूर देशीं जातो. राक्षसाच्या गुहेंत. आसवांनीं धार धरली. नवसाचा बाळ. एकुलता एक. चालला. कधीं येईल माघारीं? आतां मी दिवस कसे कंठूं, ही तळमळ त्यांना लागली. वासरूं चाललें.

महाराज निघाले. संभाजीराजे निघाले. बरोबर चार हजार निवडक मावळे न्यायचं ठरलं होतं. ते तयारींत होतेच. शिवाय बरोबर बाळाजी आवजी, तान्हाजी, येसाजी, बाजी जेधे, हिरोजी फर्जंद, निराजीपंत, रघुनाथ बल्लाळ कोरडे, त्र्यंबक सोनदेव डबीर, मदारी मेहतर, कवींद्र परमानंद वगैरे अत्यंत अत्यंत विश्वासाची व जिवाला जीव देणारी मंडळी घेतली होती. तीहि निघाली. सर्व गडावर वातावरण फारच गंभीर होतं. जो तो दाटल्या गळ्यानं एकमेकाला म्हणत होता, 'महाराज निघाले!'

महाराजांनीं तुळजाभवानीला साष्टांग दंडवत घातलं. डोळे मिटून हात जोडले अन् म्हटलं, "जगदंब! मातुश्री, येतो आम्ही! सांभाळा तुम्हीच! तुमच्याच हुकुमानं जातों आहें!"

सर्वांनीं दर्शन घेतलं. महाराजांनीं आईसाहेबांच्या पुढें येऊन पायांवर मस्तक ठेवलं. आईसाहेबांची स्थिति यशोदेसारखी झाली होती. पाठीवरून हात फिरवीत कातरत्या शब्दांत त्या म्हणाल्या,

"शिवबा! चाललास? जा! जपून जा राजा! लौकर ये! मी तुझी गाईसारखी वाट पहातें आहें. आतां मी म्हातारी झालें रे!"

"आईसाहेब चिंता नका करूं!—"

आईसाहेब तान्हाजीकडे, येसाजीकडे, हिरोजीकडे, टकमका पाहत होत्या. "तान्हा, येसा-बाळांनो सांभाळा! पंत —!"

"अगदीं निर्धास्त असा! अगदीं लौकर महाराज परत येतील!"

"सगळे या! मी इथं उभी आहें! लौकर या! एकमेकांना जपा! माझ्या बाळांना-कुणी मागें राहूं नका!"

खरोखर आईपण मोठं कठीण असतं. आईशिवाय त्या यातना समजणं कठीण. सहन करणं कठीण.

सर्वांनीं आईसाहेबांना मुजरे केले. दही मुखांत घातलं.

महाराज निघाले. आईपासून दूर निघाले. प्रत्येक पावलागणिक आई-पासून दूर होत चालले. थरथरत्या मानेनं आईसाहेब महाराजांच्या पाठमोऱ्या पुसट होत जाणाऱ्या आकृतीकडे पहात राहिल्या. गडावरचे लोक मुजरे करीत होते. 'सांभाळा', 'सांभाळा' म्हणत महाराज मुजरे घेत चालले होते. राजगडाच्या दरवाजाशीं महाराज पोहोंचले.

"पंत, प्रतापराव, येतो आम्ही! आतां सर्व कांहीं तुमच्या ओंजळींत! आईसाहेबांना सांभाळा! येऊं?"

मोरोपंत, निळोपंत आणि प्रतापराव यांनीं मुजरे करीत म्हटलें, "महाराज, चिंता करूंच नका! पण आमचा जीव तुमच्या वाटेकडे —!"

"जय तुळजा जगदंब!"

महाराज दरवाजाबाहेर पडले.

किल्ल्याचे दरवाजे कडडड वाजत बंद झाले. त्या दिवशीं तारीख होती ५ मार्च १६६६ सोमवार. एक म्हातारी राजगडाच्या वाड्याच्या खिडकींतून उत्तरेकडे नजर लावून बसून राहिली.

* * *

आधार : मराठी रियासत – २ : पृ. १२० ते १२२
सभासद : पृ. ४७–४८
शि. च. प्र. (जेधे शकावली) : पृ. २३

# ७ : : औरंगजेब

नऊ वर्षांपूर्वींची गोष्ट.

औरंगजेब त्या वेळीं औरंगाबाद येथें दख्खनच्या सुभ्यावर सुभेदार होता. औरंगजेबाचा बाप दिल्लीच्या तख्तावर बादशहा होता. त्याचं नांव शहाजहान. शहाजहानापाशीं औरंगजेबाचा सख्खा थोरला भाऊ दारा शुकोह हा असे. शुजा हा आणखी एक भाऊ बंगालच्या सुभेदारीवर होता. आणि तिसरा भाऊ मुराद हा गुजराथच्या सुभेदारीवर होता. शहाजहान दिवसेंदिवस थकत चालला होता. त्याची तबियतहि ढांसळत होती. आपलीं मुलें आपल्यामागून राज्याकरितां भांडतील, एकमेकांचे खून करतील, ह्या काळजीनें तो खंगत होता.

—पण ही त्याची भीति एकदम विरघळली! आपल्या मरणानंतर आपल्या मुलांचे आपसांतच खून पडतील, ही त्याची शंका साफ नाहींशी झाली! मरणानंतर नव्हे, त्याच्या हयातींतच त्याच्या एका मुलानें बाकीच्या तीन मुलांचा साफ निकाल लावला! खुद्द शहाजहानला आग्र्याच्या किल्ल्यांत कैदेंत टाकलं आणि तो स्वतःच बादशहा बनला! ह्या महान् पराक्रमी, महान् सद्‌गुणी, महान् पितृनिष्ठ, महान् बंधुप्रेमी चिरंजिवाचं नांव औरंगजेब!

औरंगजेब दख्खनचा सुभेदार असतांना सन १६५७ च्या सप्टेंबर महिन्यांत दिल्लीहून एक खास घोडेस्वार औरंगजेबाच्या छावणींत भरधांव दौडत येऊन दाखल झाला. कल्याणी येथें औरंगजेबाची छावणी होती. ह्या स्वारानें औरंगजेबाची एकांतांत भेट घेऊन एक विलक्षण बातमी त्याच्या कानांत सांगितली.

"हुजूर आलिजाके वालीदसाहब शहेनशाह शाहजहाँ बादशाह सख्त बीमार हैं। जिंदगी और मौतका खेल चल रहा है। उनका इस बीमारीसे रिहा होना मुश्किल है।"

आपल्या बापाच्या अखेरच्या दुखण्याची ही बातमी ऐकून औरंगजेब खूष झाला! आतां तडक दिल्ली गांठून इतर भावांना ठार मारून तख्त

ताब्यांत घेतलें पाहिजे. शक्यतों बाप मरायच्या आंत तिथें पोहोंचलें पाहिजे अन् समजा यातूनहि बाप जगलाच तर --? तरीहि बादशहा मीच होणार ! बापाला कैदेंत टाकूं, मारूनहि टाकूं ! औरंगजेबाचा बेत ठरला !

काय विलक्षण पितृनिष्ठा ही ! एवढी पितृनिष्ठा आमच्या शिवाजीच्या बापालासुद्धां जमली नाहीं !

पण बिचाऱ्या औरंगजेबाची कां कुचेष्टा करा ! त्याचा बाप शहाजहान ह्यानं काय केलं होतं ? हेंच. शहाजहाननें बापाविरुद्ध बंड करून अन् भावांचा निकाल लावून राज्य घेण्याचा नव्हता का प्रयत्न केला ? पण मग शहाजहानला तरी कशाकरितां दोष द्यायचा ? शहाजहानचा बाप जहांगीर ह्यानें काय केलं ? हेंच ! अकबराच्या म्हणजेच बापाच्याविरुद्ध बंड करून गादी काबीज करण्याचा त्यानें नव्हता का प्रयत्न केला ? केवढी दिव्य तेजस्वी परंपरा औरंगजेब चालवीत होता ! हें महान् व्रत अखंडपणें, अविचल मनानें आणि निःस्वार्थ बुद्धीनें चालू ठेवल्याबद्दल वास्तविक त्याचं कौतुक केलं पाहिजे ! आणि विशेष म्हणजे औरंगजेबानें ह्या आपल्या सत्कार्यांत आपला मुलगा महंमद अकबर ह्यालाहि दाखल करून घेतलं होतं. म्हणजे असं नव्हे का कीं, आपल्याविरुद्ध पुढें आपल्या मुलानंहि नेमकं कसं बंड करावं ह्याचं सप्रयोग शिक्षण औरंगजेब देत होता ! पुढच्या इतिहासांत महंमद अकबरानें आपल्या बापाची विद्या बापाच्या गळ्यांत बरोबर अडकविली !

आपला बाप शहाजहान आजारी पडला आहे, ही गोष्ट औरंगजेबानें अत्यंत गुप्त राखली. तो ताबडतोब कल्याणीहून ४ ऑक्टोबर १६५७ रोजीं निघाला व औरंगाबादेस आला. अत्यंत गुपचुप पण जंगी तयारी करून महाबतखान, नासीरीखान, मीरजुमला वगैरे सरदारांसह औरंगजेब पंचवीस जानेवारी १६५८ ह्या दिवशीं औरंगाबादेहून निघाला. दिल्लीच्या रोखानें तो झपाट्यानें जात होता; पण हातांत माळ घेऊन फकिरासारखे साधे कपडे घालून आणि तोंडानें खुदाचा जप करीत ! तयारी मात्र भावांना ठार मारण्याची !

दाराची आणि त्याची शामुगढच्या रणांगणावर ८ ऑगस्ट १६५८ रोजीं गांठ पडली. भयंकर लढाई झाली. दाराचा पराभव झाला. दारा जीव बचावण्याकारितां पळत सुटला. औरंगजेबाची दिल्लीची वाट मोकळी झाली.

दुसरा भाऊ मुराद ह्याला मेजवानींत चिक्कार दारू पाजून नंतर औरंगजेबानें ठार मारलें.

तिसरा भाऊ शुजा. ह्याचा भयंकर पराभव होऊन तो क्षितिजाच्या पलीकडे कायमचा परागंदा झाला.

दारा शुकोह पळून गेला होता. तो आपला मुलगा सुलेमान शुकोह ह्याच्यासह पकडला गेला. औरंजबानें दोघांहि बापलेकांना हाल हाल करून मारून टाकलें.

शहाजहानची ढांसळती तब्येत सुधारूं लागली. पण त्याला आग्ऱ्याच्या किल्ल्यांत औरंगजेबानें कैदेंत टाकून दिलें आणि स्वतः दिल्लीच्या तख्तावर तो आरूढ झाला. ह्या सर्व बाबतींत मिर्झा राजे जयसिंह ह्यांनीं त्याला अतिशय मनःपूर्वक अहोरात्र तन, मन व सैन्यपूर्वक मदत केली. जर मिर्झा राजे नसते तर औरंगजेबाला चंबळेच्या अलीकडे पाऊलहि टाकतां आलं नसतं.

आपल्याला विरोध करणाऱ्या व विरोध करतील कीं काय असा संशय असलेल्या एकून छत्तीस निरपराध आप्तेष्टांस त्यानें निरनिराळ्या तऱ्हेनें हालहाल करून ठार मारून टाकलं. शिवाय निरनिराळ्या किती सरदारांना व अंमलदारांना त्यानं मारलं त्याची गणतीच नाहीं. विश्वासघात करणं, कृतघ्नपणा करणं, कपट रचणं, सज्जनांचेहि बळी घेणं हा त्याच्या हातचा मळ होता. त्याचें राज्य सुरू झालें.

जबरदस्त कर, अन्याय्य लढाया, बाटवाबाटवी, धार्मिक जुलूम, खास सरकारी हिंसा, रानटी शिक्षा वगैरे गोष्टींना ऊत आला. हें सर्व रजपूत सरदारांना दिसत होतं. पण—मनोवृत्ति पडली गुलामाची.

वर्षांमागून वर्षें उलटत होतीं. कला, विद्या, वाङ्मय, शास्त्रें मरत चाललीं होतीं. संबंध देशांतील काफीर नाहींसे व्हावेत, काश्मीरपासून कोचीनपर्यंत हिरवा अम्मल असावा, एकहि मंदिर असूं नये, अशा भयंकर इच्छा त्याच्या उरांत दडलेल्या होत्या. जिवंत असलेला कैदी बाप त्याला पाहवत नव्हता. शहाजहान आतां कण्हत कुथत अखेरचे दिवस मोजीत होता. ताजमहालच्या कबरांत त्याची बायको मुमताजमहल त्याची वाट पहात होती. औरंगजेबाला पण फार घाई होतीच! औषध म्हणून एकदां त्यानें आपल्या बापाकडे विषाचा पेला पाठवून दिला! पी!!

परंतु ज्या हकिमाच्या बरोबर त्यानें तो पेला पाठविला, तो हकीम स्वामिनिष्ठ होता. आपल्याच हातानें शहाजहानला विष देण्याची कल्पनाहि त्याला सहन

होईना. तो पेला घेऊन गेला आणि त्यानें स्वतःच तें विष पिऊन टाकलें ! मरून गेला ! जरी त्यानं शहाजहानला विष दिलं असतं तरी औरंगजेबानं त्याच्यावरच खुनाचा आरोप घालून, त्यालाच हत्तीच्या पायीं देऊन पितृप्रेम व्यक्त करण्याची संधि दवडली असती काय ?

बरेच दिवस झाले. खोकतोय् कण्हतोय् तरी अजून थेरडा मरत नाहीं, असें पाहून औरंगजेबानें पुन्हा एकदां दुसऱ्या एका हकिमाबरोबर विष पाठविलें. पण त्याहि हकिमानें तें स्वतःच पिऊन टाकलें !

अखेर औरंगजेबानें ठरविलें, राहूं द्या म्हाताऱ्याला. जगून जगून मरेपर्यंत जगेल ! जास्त काय जगणार आहे ! आतां त्या गोष्टीला अनेक दिवस लोटले होते. औरंगजेब गादीवर येऊन आठ वर्षें पूर्ण झालीं होतीं. अनेक प्रकारच्या जुलमांनीं प्रजा हैराण झाली होती. अनेक सरदारांना ते निष्ठावंत असूनहि केवळ डोईजड होतील ह्या संशयानें त्यानें देशोधडीस लावलें होतें. आणि तरीहि राज्यांत बंड होत नव्हतं.

दक्षिणेंत मात्र एक ठिणगी आगीचं रूप घेऊन भडकली होती. महाराज शिवाजी राजे !

ही आग, हा वणवा मारून झोडून विझविण्याकरितां औरंगजेब फौजा पाठवीत होता. शाएस्ताखानाचा ह्या वणव्यांत चांगलाच हुरडा भाजून निघाला.

—कार्तलबखानानें भयंकर मार खाल्ला.
—शाएस्ताखानानें शिवाजी राजांची दहशत खाऊन पळ काढला.
—सुरतेची बदसूरत झाली. इनायतखान लपून बसला.
—अहमदनगरपासून औरंगाबादेपर्यंत हा वणवा पसरला.
—शहाजादा मुअज्झम घाबरूनच औरंगाबादेंत वारा घेत बसला.

औरंगजेबाला कळेना काय करावं ! अखेर मिर्झा राजे जयसिंह आणि खान वालाशान दिलेरखान दख्खनवर आले.

आणि पुरंधरचा तह झाला. महाराज आग्ऱ्यास निघाले. अशा ह्या भयंकर औरंगजेबाला भेटावयास राजगडापासून पांचशें कोस दूर असलेल्या आग्ऱ्यास महाराज निघाले.

यापूर्वी एक अत्यंत महत्त्वाची घटना घडली. तारीख २२ जानेवारी १६६६ ह्या दिवशीं आग्ऱ्याच्या किल्ल्यांत खितपत असलेला शहाजहान मृत्यु पावला. सुटला ! मुलाच्या हातून सुटला ! ! क्षितिजाच्या पार्श्वभूमीवर

उठून दिसणाऱ्या दूरवरच्या त्या— ताजमहालाकडे पहात पहात त्यानें प्राण सोडला...

औरंगजेब दिल्लींत होता. बाप जिवंत असेपर्यंत तो कधींहि आग्र्यांत आलाच नाहीं. शहाजहान जरी आतांपर्यंत कैदेंत होता, तरीहि औरंगजेबाला वाटे कीं, हा आपला बाप आपल्याविरुद्ध एखाद्या वेळीं बंड करील कीं काय?

बापाच्या मरणानंतर औरंगजेब ताबडतोब आग्र्यांत आला. बापाचें दफन ताजमहालमध्यें आपल्या आईच्या कबरीशेजारीं त्यानें केलें. बापाची एवढीच इच्छा त्यानें तंतोतंत पूर्ण केली! वास्तविक ही इच्छा पुरी करायला औरंगजेब पूर्वीपासून तयारच होता!

ताजमहालाच्या कळसावर सोन्याच्या अर्धचंद्रांत ताऱ्याप्रमाणें शहाजहाननें जगद्विख्यात कोहिनूर हिरा बसविलेला होता. आपल्या आद्वितीय तेजानें कोहिनूर जगाला दिपवीत होता. औरंगजेबानें तो पाहिल्यावर लगेच तेथून काढून शाही जामदारखान्यांत नेऊन ठेवण्याचा हुकूम केला. इतका तेजस्वी हिरा आईबापांच्या मल्यांवर कशाला मढवायला पाहिजे! औरंगजेबाची दृष्टि ही अशी होती. तो कलेचा शत्रु होता. सत्याचा शत्रु होता. सौंदर्याचा शत्रु होता. 'शिवा'चा शत्रु तर होताच होता.

तोच शिव आपल्या गणांसह आग्र्याकडे आतां येत होता.

औरंगजेबानें बापाच्या मरणानंतर आग्र्याच्या किल्ल्यांतच मुक्काम ठोकला. दिल्लींतील राजधानी हलली. आग्रा राजधानी झाली. आणि औरंगजेबानें तारीख २७ मार्च १६६६ ह्या दिवशीं आग्र्याच्या दिवाण-इ-आममध्यें अत्यंत थाटानें पहिला राज्यारोहण-समारंभ नव्या राजधानींत साजरा केला. हा वैभवाचा परमोच्च दिवस. प्रचंड वैभवाचा मोंगल साम्राज्याचा हा कळसच.

ह्या वेळीं महाराज औरंगाबादेपर्यंत येऊन पोहोंचले होते.

* * *

**आधार** : लाइफ ऑफ औरंगजेब.
स्टोरीयो डी मोगोर; औरंगजेब अँड हिज टाइम्स;
आलमगीरनामा; हाऊस ऑफ शिवाजी;
शिवाजी अँड हिज टाइम्स.

घोड्यांच्या टापा उत्तरेकडे पडत होत्या. महाराजांनीं गोदावरी ओलांडली. औरंगाबादेचा मुलूख लागला. दीड वर्षापूर्वीं ह्याच मुलखांत त्यांनीं मोंगलांना 'धरणीठाय' केलं होतं. आज ते संथपणानें चालले होते. त्यांच्याबरोबर हत्ती, पालख्या, तामझाम, सामान-वहातुकीस आमदर्फ्तीचे उंट व शिबंदीच्या रसदीचे संभार होते. त्यांच्याबरोबर हत्तीवर खाशी साहेबनौबत व दुसऱ्या एका हत्तीवर भगवा झेंडा होता. हे आग्र्याचे प्रवासी आतां औरंगाबादच्या जवळ येऊन ठेपले होते. सावल्या पुढें पुढें सरकत होत्या.

औरंगाबादेंतील जनतेस शिवाजी राजे येत असल्याची बातमी समजली. हजारों नागरिक स्त्री-पुरुष महाराजांना पाहण्यासाठीं अत्यंत उत्सुकतेनें शहराबाहेर झुंडी-झुंडींनीं येत होते. या वेळीं सफ्‌शिकन्‌खान हा शहराचा अंमलदार होता. तो मात्र मुळींच आला नाहीं. मोठा मिजासखोर होता तो! तो असं म्हणत होता कीं, शिवाजी असा कोण मोठा दख्खनचा पातशहा लागून गेला आहे? त्यानेंच मला शहरांत भेटावयास यावें. अन् तो येईलच! मी सामोरा जाणार नाहीं. या वेळीं खुद्द मिर्झा राजे जयसिंह ह्यांचाहि मुक्काम औरंगाबाद शहराबाहेर पलीकडच्या अंगास होता. राजांनीं महाराजांच्या स्वागताची आपल्या छावणींत उत्तम तयारी ठेवली होती.

वास्तविक सफ्‌शिकन्‌खानानं कोसभर सामोरें जाऊन महाराजांना इतमामानें न्यावयास हवें होतें. कारण औरंगजेबाचा प्रत्येक ठाण्यावरच्या, प्रत्येक सुभ्यावरच्या आणि प्रत्येक मुक्कामावरच्या मोंगल अंमलदारांस सक्त हुकूम आणि ताकीद होती कीं, शिवाजीचा मान आणि त्याची व्यवस्था शहाजाद्यासारखी राखली पाहिजे.

अर्थात् शिवाजी न बिचकतां न दचकतां बिनधोक मनानें आग्र्यांत यावा व अलगद आपल्या मुठींत सांपडावा, हाच औरंगजेबाचा यांत हेतु होता.

महाराज औरंगाबादच्या वेशीपर्यंत आले. हजारों जनता आली होती. अत्यंत कुतूहलानें, प्रेमानें व आदरानें ती महाराजांचें दर्शन घेत होती. पण औरंगाबादसारख्या एवढ्या मोठ्या शहराचा कोणीच अंमलदार सामोरा

आलेला नाहीं, हें पाहून महाराजांस राग आला. ते शहरांत प्रवेशले आणि आणि शहरांतून तसेच थेट मिर्झा राजांच्या छावणीवर रवाना झाले. महाराज आलेले पाहून मिर्झा राजांनीं त्यांचें अत्यंत आदरानें व प्रेमानें स्वागत केलें. पण त्यांच्याबरोबर सफ्शिकन्खान नाहीं हें दिसतांच काय प्रकार झाला असला पाहिजे, याची कल्पना मिर्झा राजांना आली. त्या वेळीं ते शांत राहिले. त्यांनीं महाराजांचा अत्यंत दिमाखांत सन्मान केला.

शहरांत आपल्या हवेलींत मोठ्या घमेंडींत सफ्शिकन्खान महाराजांची वाट पहात बसला होता: त्याचे इतर मोंगल साथीदारहि कुत्सित नजरेनें महाराजांच्या वाटेकडे डोळे लावून बसले होते. शिवाजी वेशीपर्यंत येऊन पोहोंचला, शहरांतहि प्रवेशला आहे, ह्या बातम्या खानाला भराभरा मिळाल्या होत्या व मिळत होत्या तो जाणूनबुजून महाराजांचा अपमान करीत होता. बराच वेळ गेला. खूप वेळ गेला. शिवाजीच्या येण्याची कांहींच चाहूल लागेना त्याची उत्सुकता शिवाजीची लाचारी पहाण्याकरिता शिगेला पोहोंचली होती. आगंतुकाप्रमाणें शिवाजीनें मान खालीं घालून आपल्याकडे आलं पाहिजे, असा हट्ट तो डोक्यांत घेऊन बसला होता. पण घडलं वेगळंच ! शिवाजी राजे परस्पर मिर्झा राजांच्या मुक्कामावर रवाना झाले व तेथें अत्यंत दिमाखांत त्यांचें स्वागत चालू आहे, खुद्द मिर्झा राजे अत्यंत आदरानें वागत आहेत, अशी खबर खानाला आली. आतां ? आतां आली पंचाईत ! आतां मुकाट्यानें मुठींत नाक धरून मिर्झा राजांच्या छावणीवर जाऊन शिवाजीची भेट घेणं भाग आहे. नाहीं तर भयंकर हजामत ! नाहीं तरी तें आतां चुकणार नाहींच; पण न गेलों तर त्याहून भयंकर !

खान मुकाट्यानें आपल्या सहकाऱ्यांसह चोरासारखा भीत भीत मिर्झा राजांच्या छावणींत आला. महाराजांचा तो भव्य आदरसत्कार पाहून त्याला मेल्याहून मेल्यासारखें झालें. महाराजांचा एक दिवस मुक्काम तेथें होता. ओशाळल्या नजरेनं खानानें महाराजांची भेट घेतली. पोषाख व नजर-नजराणे त्यांना देऊन त्यानें जास्तींत जास्त बहुमान केला.

महाराज नंतर मिर्झा राजांचा निरोप घेऊन पुढें रवाना झाले.

मिर्झा राजांनीं सफ्शिकन्खानाच्या या वागणुकीबद्दल त्याला चांगल्याच कानपिचक्या दिल्या. खान करायला गेला एक आणि झालं भलतंच !

महाराजांनीं तापी ओलांडली. या प्रवासाचा खर्च औरंगजेबाच्या तिजोरींतून होत होता. गाझी बेग हा औरंगजेबानें मुद्दाम नेमलेला सरदार महाराजांच्या बरोबर प्रवासांत होता. तो प्रत्येक मुक्कामावर प्रवासांतील महाराजांसंबंधींचीं बातमीपत्रें आग्र्यास बादशहाकडे पाठवीत होता. प्रत्येक मुक्कामावर त्या त्या ठिकाणचा मोंगल अंमलदार अत्यंत अदबीनें सामोरा येऊन महाराजांची व्यवस्था ठेवीत होता. महाराजांची कीर्ति आजपर्यंतच्या विलक्षण पराक्रमामुळें सर्वत्र पसरलेली होती. विलक्षण कुतूहल आणि तितकाच आदर आणि त्यांना पहाण्याची तितकीच उत्सुकता जनतेंत उर्तू जात होती. महाराज आग्र्यास औरंगजेबास भेटावयास जात आहेत ही खबर आठहि दिशांस पोहोंचली होती.

आणि बंगालच्या सुभ्यावर सुभेदार असलेल्या शाएस्ताखानासहि ती समजली ! तो दचकलाच. शिवाजी म्हणजे काय प्रकरण आहे, हें त्याला अनुभवानं कळून चुकलं होतं. त्याचीं बोटं तुटलीं होतीं. शिवाजीचं नांव आलं कीं त्याचं बोटांकडे लक्ष जायचं. आणि बोटांकडे लक्ष गेलं कीं शिवाजीची आठवण यायची ! शाएस्ताखान हा औरंगजेबाचा सख्खा मामा होता. आपल्या भाच्याला शिवाजी भेटणार आहे, हें समजतांच मामाचं हृदय काळजावलं. मामांनीं तावडतोब भाच्याला पत्र लिहून, निक्षून व कळकळीनें कळविलें कीं, तो शिवाजी अत्यंत दगाबाज आहे, केवळ सैतान आहे, त्याच्याशीं समक्ष भेटीचा प्रसंग कधींहि आणूं नये. हें पत्र मामांनीं अत्यंत गुप्तपणें औरंगजेबाचा वझीर जाफरखान याच्या नांवानें लिहिलें. हा जाफरखान शाएस्ताखानाच्या बहिणीचा नवरा होता. ही बहीण म्हणजे अर्थातच औरंगजेबाची सख्खी मावशी होती. ही मावशी खानाबरोबर पुण्यास गेली होती. तारीख ५ एप्रिल १६६३ रोजीं मध्यरात्रीं लालमहालांत घुसून महाराजांनीं जी दाणादाण उडविली व खानाचीं बोटं तोडलीं त्या समारंभाला ह्या मावशीबाई हजर होत्या. शिवाजी आग्र्यांत येत आहे, हें तिला कळल्यावर तिनें काहूर उठविलं. तिनें औरंगजेबास म्हटलें कीं, अरे तुला त्याला भेटायची नसती हौस कुठून आली? तो दगाबाज आहे ! चेटक्या आहे ! त्याला गुप्त होता येतं ! तूं त्याची भेट घेऊं नकोस. त्याचे प्रताप मीं पुण्यांत प्रत्यक्ष पाहिले आहेत.

जों जों महाराज आग्र्याच्या जवळ जवळ येऊं लागले, तों तों आग्र्यांत व किल्ल्यांतहि चुळबूळ वाढूं लागली. औरंगजेबाच्या भोंवतीं तर फारच विचित्र वातावरण निर्माण झालें. शाएस्ताखानाची बायको म्हणजे औरंगजेबाची मामी. ह्या मामीनेंहि शिवाजीबद्दल औरंगजेबाला भीतीचा इशारा भयंकर शब्दांत दिला. शिवाय लोकांत घाबरट वातावरण पसरलें होतेंच. किल्ल्यांत निःशब्द चिंता वाढत होती. एवढा मोठा कावेबाज, कपटी, पाताळयंत्री, राक्षसी काळजाचा औरंजेब—आजपर्यंत कोणालाहि भ्याला घाबरला नाहीं, पण आतां त्याला सुद्धां जरा—जरा, म्हणजे तसा तो घाबरला नाहीं!—पण जरा आपलं हेंच—!

महाराजांपासून सर्व बाबतींत सावध रहाण्याची दक्षता घेण्याचें औरंगजेबानें ठरविलेंच; पण पुढचा निकाल कसा लावायचा, हेंहि त्याच्या मनांत निश्चित ठरून गेलें. पण कसलाहि भाव त्याच्या उग्रट चेहऱ्यावर वा करड्या डोळ्यांत दिसत नव्हता. डोळ्यांची उघडझाप करीत त्याचा माळेवर जप चालूच होता, रब्बना ... रब्बना ... रब्बना ... रब्बना!

महाराजांविषयीं राजे रामसिंहांना मात्र विलक्षण काळजी वाटत होती. ते मिर्झा राजांचे पुत्र होते, दरबारांत सरदार होते व औरंगजेब आणि महाराज यांत मध्यस्थ होते. मिर्झा राजांचीं त्यांना सारखीं पत्रें येत होतीं कीं, शिवाजी महाराजांच्या जीवितास कोणत्याहि प्रकारें धोका पोहोंचणार नाहीं, याची काळजी घे. त्यांना तूं व मी जामीन आहोंत. मीं त्यांना तसें वचन दिलें आहे.

महाराजांनीं चंबळा ओलांडली.

औरंगजेबाच्या मस्तकांत हजारों विचारांचें वादळ सुरू होतें. वाढत होतें. पण त्या महाभयंकर माणसाच्या चेहऱ्यावर त्याचा तरंगहि उमटत नव्हता.

महाराज आग्र्याच्या नजिक येऊन दाखल झाले. औरंगजेबास वर्दी गेली. शिवाजी राजे शहाराच्या नजदिक आले! औरंगजेबानें राजे रामसिंह व मुखलीसखान ह्या सरदारांस राजांना आणण्यासाठीं सामोरें पाठविलें.

महाराजांस सामोरें जाऊन रामसिंहांनीं त्यांना सन्मानपूर्वक आणलें. महाराज एका भव्य घोड्यावर होते. संभाजी राजे दुसऱ्या एका लहान घोड्यावर होते. भोंवतीं तान्हाजी, येसाजी, हिरोजी, बाजी, निराजीपंत, त्र्यंबक-

पंत, दत्ताजीपंत बाळाजीपंत,रघुनाथपंत वगैरे महाराजांचे सरदार होते. रामसिंह महाराजांसह आग्र्याकडे निघाले. चित्त्यांची फौज घेऊन एक सिंह चालला आहे असा भास होत होता. प्रत्येकाच्या वागण्या-बोलण्यांत स्वतंत्रतेच्या तेजस्वी बाण्याचा आविष्कार रसरसत होता. अगदीं आघाडीवर हत्तीवर साहेबनौबत दणाणत होती. त्यामागें मराठी घोडेस्वारांच्या कांहीं तुकड्या टापा टाकीत चालल्या होत्या. त्यांच्या भाल्यांचीं पातीं खालींवर खालींवर होतांना चमकत होतीं. त्यांच्या मागें एका सुंदर भव्य हत्तीवर अत्यंत दिमाखांत भगवा झेंडा फडकत होता. त्या हत्तीवर फक्त झेंडा होता. माहुताशिवाय कोणीहि माणूस नव्हता. त्यामागोमाग पुन्हां घोडदळ व त्यामागें महाराज व संभाजी राजे चालले होते. भोंवती खाशा सरदारांचे घोडे होते. मागोमाग पुन्हां घोडदळ होतें. अगदीं साधेसुधे मावळे ते. पण अशा कांहीं दिमाखांत चालले होते कीं, प्रत्येक आईला वाटावं कीं, माझा मुलगा ना, हा असा असावा !

आग्र्याच्या बाहेर असलेल्या बागेंतील एका भव्य व सुंदर महालांत महाराजांची उतरण्याची व्यवस्था करण्यांत आली. महालाच्या नजीकच मराठी फौजेची व्यवस्था करण्यांत आली. तान्हाजी, निराजीपंत, चिटणीस वगैरे मंडळींचा मुक्काम महाराजांच्या समीपच होता. जाळ्या, कमानी, खांब, तख्तपोशी वगैरे मोंगली थाट महालाला शोभवीत होता. पलंग, गाद्या, गिरद्या, गालिचे, लोड, पडदे वगैरे फरासहि उंची होता.

अखेर औरंगजेबाच्या खास राजधानींत महाराज येऊन दाखल झाले. ह्या दिवशीं तारीख होती ९ मे १६६६.

* * *

**आधार :** सरकारकृत शिवाजी : पृ. १३१ ते १४०.
सभासद —पृ. ४८, हाऊस ऑफ शिवाजी : पृ. १५८ ते १६०.

९ : : दिवाण-इ-आम

**रा**जे रामसिंह यांनीं शिवाजी राजे येऊन दाखल झाल्याचें औरंगजेबास सांगितलें, व त्यांना भेटीस केव्हां बोलवायाचा हुकूम आहे, हें विचारलें. बादशहा त्याच विचारांत होता शिवाजीच्या डोळ्यांत आपल्या प्रचंड सामर्थ्याचा, अफाट संपत्तीचा आणि जबरदस्त कडक अंमलाचा प्रभाव भरल्याशिवाय त्याच्या बंडखोरीची आणि फाजील शहाणपणाची घमेंड उतरणार नाहीं. बाकीचा तपशील त्यानें पूर्वींच ठरवून ठेवला होता. फक्त भेटीची जागा आणि वेळ सांगायची होती.

"परसुके दिन माबदौलत की पचासवे सालगिरह का खास दरबार दिवान--आम में होगा। उस वख्त उसे दरबारमें हाजिर करो."

राजे रामसिंह कुर्निसात् करून गेले.

तेरवांच्या दिवशीं म्हणजे तारीख १२ मे १६६६ या दिवशीं बादशहाचा पन्नासावा वाढदिवस साजरा व्हावयाचा होता. वास्तविक एरव्ही अत्यंत साध्या व उपभोगशून्य वृत्तीनें राहणाऱ्या औरंगजेबानें हा समारंभ मात्र परमोच्च थाटामाटानें साजरा करावयाचें ठरविलें. पण त्याच वेळीं जास्तींत जास्त सावधपणें दरबारची व आपली व्यवस्था ठेवण्याचें त्यानें ठरविलें. हजारों सरदार, मनसबदार व मानकरी दरबारास हजर राहणार होतेच. इतर व्यवस्थेची तयारी चालू होती.

तो दिवस उजाडला!

आग्र्याच्या किल्ल्यांत दिवाण-इ-आम भरजरी पडद्यांनीं, झालरींनीं झगमगूं लागला. अत्यंत किंमतवान् गालिचे सर्वत्र अंथरले होते. मखमलीचे पडदे रेशमांच्या दोऱ्यांना जरीचे गोंडे लावून तख्ताच्या मागें असलेल्या दरवाजांना लावण्यांत आले होते. तख्त तर सोन्याचंच होतं. कोट्यवधि होन किंमतीच्या त्या सिंहासनावर तेजःपुंज हिरे लकाकत होते. हेंच तें मयूर-सिंहासन. तख्त-इ-ताऊस. शहाजहाननें हें तयार केलं. दरबारच्या तख्त-पोशीला जडावाचा चांदवा आणि मोत्याची झालर लावली होती. अत्तरांचा घमघमाट सुटला होता. सोन्याच्या धूपदाणींतून सुगंधी धुराचीं वलयें भिर-

भिरत होतीं. अत्यंत भारी किंमतीचे पोषाख व दागदागिने घालून दरबारचे सरदार, मनसबदार, बक्षी, मीरबक्षी, अर्जबेगी, मुन्शी वगैरे अधिकारी व मोंगल साम्राज्याचा मुख्य वजीर वजीरे आझम खान वालाशान बहाद्दुर जाफरखान तख्ताच्या खालीं उजव्या बाजूस उभा होता. सर्व सरदार आपापल्या जागीं आधींपासूनच येऊन उभे राहिले होते. जसवंतसिंह, यशवंतसिंह वगैरे रजपूत सरदार व शेकडों इतर मानकरी शिरपेंच, कंठे वगैरे लेऊन उभे होते. तख्ताच्या मागील बाजूस बादशहाचे खास बारदार भारी पोषाख करून हातांत मोरचेले, शहामृगाच्या पिसाचे रत्नजडित पंखे आणि इतर शाही निशाण्या घेऊन उभे होते. सबंध संगमरवरी नक्षीदार दिवाण-इ-आममध्यें हें वैभव कोऱ्या चांदीच्या ताटांत ठेवलेल्या जडावाच्या अलंकाराप्रमाणें प्रतिबिंबित होत होतें. तख्त जीमनीपासून पुरुषभर उंचीवर होतें.

दिवाण-इ-आमपुढच्या विस्तीर्ण मैदानांत हजारों लोक अदबीनें उभे होते. तख्ताच्या दोहों बाजूंस दोन गुर्झबारदार सोन्याचे गुर्झ घेऊन उभे होते. ह्या गुर्झांवर सोन्याचा अर्धचंद्र व रत्नजडित तारा बसविलेला होता. रेशमाच्या झुळझुळीत हिरव्या लहानशा शेलेवजा चादरी त्या सोन्याच्या गुर्झांना बांधलेल्या होत्या. गुर्झबारदार म्हणजे दरबारांतील बादशाचे दंडधारी चोपदार. सर्वत्र सौम्यशी कुजबुज, किलबिल चालू होती. दरबार पूर्ण भरला होता ; पण तख्त रिकामें होतें. अद्याप बादशहा दरबारांत आलेला नव्हता. तो तख्ताच्या पाठीमागें असलेल्या खोलींतून तख्तावर येऊन बसत असे. अद्याप तो आलेला नव्हता.

येवढ्यांत तख्ताच्या मागच्या दिशेनें लांबून गर्जना उठली : ‘ हुश्शार ! ’ बादशहा आपल्या महालांतून दरबारांत येण्यास निघाला, त्याची ही इशारत होती. ती कानीं पडतांच दरबारांत तख्तापाशीं उभे असलेल्या गुर्झबारदारांनीं हातांतील गुर्झ म्हणजे दंड उंचावून ललकारी दिली, “ होश्शियाऽऽर ! ”

ही ललकारी उठली, घुमली, प्रतिध्वनित झाली आणि सबंध दरबार आपले हात रुमालानें बांधून व पोटाशीं धरून अत्यंत अदबीनें खालीं मान घालून चित्रासारखा उभा राहिला. एकदम विलक्षण निःशब्द शांतता पसरली. गुर्झबारदारांच्या ललकाऱ्या सुरू झाल्या. ते बादशहाचा अलकाब गर्जत होते.

" होशियाऽऽर ! आस्ते कदम नजर बर्कदम, निगाह रखो ऽ ! हुक्मते हिंदोस्ताँ, जंग बहाद्दुर, खास उल् खास जबतन मुल्ख, नूर-ए-सल्तनत, शान-ए-वतन, हुकूमतपनाह, मुजफ्फर उल् मुमालिक, मर्तबत व हशमत, फत्ते नुशरत, रफी उश्शान शान बहाद्दुर, रसुले खिदमतगार, रस्तुमे जमा, शहेनशाह, मुघले आझम, मुहीउद्दीन, मोहम्मद औरंगझेब फर्जंदे शहेन्शाह, जहीरुद्दीन, मोहम्मद शहाजहाँ, कोह-इ-फिर्दौस, परवरदिगार, आलमगीर बादशाह-ए-गाझी ! होशियाऽऽर ! आस्ते कदम नजर बर्कदम निगाह रखो होशियाऽऽर ! "

गर्जना चालू होत्या. आवाज घुमत घुमत ढगाप्रमाणें गडगडत जात होता. कोणीहि मान वर करून पाहत नव्हता. सर्वांची नजर खालीं. गुलाम ! बादशहा तख्तावर येईपर्यंत हा अलकाब चालू होता.

कमालीचा किंमतवान, भरजरी, रत्नजडीत पोषाख पेहरून अंगावर अत्यंत मौल्यवान् अलंकार घालून, आणि कंबरेस जडावाच्या म्यानासहित तरवार लटकवून तख्तामागच्या दरवाजांतून औरंगजेब जपमाळेचे मणी ओढीत ओढीत संथ संथ पावलें टाकीत गंभीर चेहऱ्यानें दरबारांत प्रवेशला. त्याच्या मस्तकावरचा किमॉश लखलख करीत होता. रत्नांचा जेगा त्यावर बसविलेला होता व जडावाचा शिरपेंच त्याच्या प्रत्येक पावलागणिक वैभवानें हलत होता. शरीरानें शिडशिडीत पण बळकट, उंचा पुरा, पिंगट डोळ्यांचा, सरळ नाकाचा, भव्य कपाळाचा, रुबाबदार दाढी आणि मिशा असलेला तो बादशहा तख्तावरील गादीवर येऊन उभा राहिला. तो येतांच गुर्झबारदारांनीं शेवटच्या सामुदायिक जयजयकाराचा पुकार केला—" शहेनशाह—"

" झिंदाबाद ! " दरबार ओरडला.

" मोंघले आझम—"

" झिंदाबाद ! "

" आलमगीर—"

" झिंदाबाद ! "

सारं वातावरण सुगंधी धुरानें आणि त्या जयघोषानें भारावून गेलें. औरंगजेब तख्तावर उभाच होता. डावा हात तलवारीच्या मुठीवर ठेवून उजव्या हातांतील माळेसह त्यानें उजवा हात वर केला आणि गंभीर आवाजांत मोठ्यानें तो उद्गारला, " इस्लाम—"

" झिंदाबाद ! "

" खुदाकी दुआसे आज मावदौलत अपनी पचासवीं सालगिराह मना रहे हैं ! इस्लाम की खिदमत और रियासत की हिफाजत मावदौलत करते आये हैं और जीते जी करते रहेंगे ! "

" आमीन, आमीन, आमीन ! " दरबारानें संथ शब्दांत शुभेच्छा व्यक्त केली.

नंतर औरंगजेब बसला. त्यानें कमरेची समशेर काढून आपल्यापुढें ठेवली. त्याच्यामागें व सिंहासनाच्या मागें असलेल्या खोलींत सशस्त्र हशम उभे होते. बाजूलाहि हशम होते. न जाणो—! आपली तयारी असावी ! शिवाय दरबारांत हजारों निष्ठावंत गुलाम उभे होतेच. किल्ल्याचा बंदोबस्त अत्यंत कडक होता. तटावर हत्यारबंद धिप्पाड सैनिक उभे होते. केवढी तयारी ही ! शिवाजी अन् त्याचा बच्चा येणार म्हणून ही तयारी !

* * *

महाराज आपल्या मुक्कामावर दरबारास निघण्याच्या तयारींत होते. एवढ्यांत राजे रामसिंह महाराजांस न्यावयास आले. महाराज निघाले. संभाजी राजे बरोबर होते. महाराज निःशस्त्र होते. महाराज निघाले तेव्हां त्यांच्या मित्रांचा आणि मराठी फौजेचा जीव खालींवर होऊं लागला. महाराज संभाजी राजांसह आग्र्याच्या किल्ल्यापाशीं आले. त्या प्रचंड तांबड्या तटबंदीच्या वरून तोफा डोकावतांना दिसत होत्या. मोंगल हशमांचीं डोकीं आणि त्यांवर दोन दोन हात उंच चकाकणारे भाल्याचे फाळ दिसत होते. महाराज दरवाजांत जाऊन पोहोंचले. किल्ल्याच्या भोंवतीं खंदक होते, त्यांत पाणी होतें. दरवाजा अत्यंत रेखीव व बळकट बांधलेला होता. जागजागीं हत्यारबंद पहारेकरी उभे होते. आंत प्रवेशल्यानंतर दुसरा दरवाजा लागला. तेथून ते पुढें गेले. महाराजांची नजर सर्वत्र फिरत होती. रामसिंह दरबारच्या कामकाजाविषयीं महाराजांना हळूंहळू कांहीं सांगत होते. महाराज नुसतेच 'हुं हुं' करीत होते. नगारखान्याची कमानदारी ओलांडून तिघेहि पुढें गेले. लांबवर मोठा थोरला जमाव चित्रासारखा स्तब्ध उभा असलेला दिसत होता. दिवाण-इ-आमची संगमरवरी इमारत दिसत होती.

शिवाजीराजे येत असल्याबद्दलची वर्दी बादशहास देण्यांत आली. साऱ्या

मराठी ग्रंथ ... स्थळप्रत.
अनुक्रम 21003 दि: ५५
७४७ नों: दि:

दरबाराचें लक्ष तिकडे वळलें. औरंगजेब रोखून पाहूं लागला. त्याच्या छातींत धाकधूक चालूच होती. शिवाजी फार लांब उडी मारतो, मारूं शकतो, हें त्यांच्या कानांवर गेलं होतं! आपला वैरी, एक काफीर, दख्खनच्या दरवाजावर दिल्लीच्या फौजेला छातीच्या ढालीनं अडवून धरणारा आपला दुष्मन समोरून येत आहे. तो पहा! सारा वैरभाव त्या कपटी बादशहाच्या हृदयांत उसळत होता; पण चेहऱ्यावर अगदीं शांत!

महाराज संभाजीला बोटाला धरून झपझप पावलें टाकीत पुढें जात होते. त्यांच्या मस्तकावरचा तुरा, कानांतले चौकडे डोलत होते. त्यांच्या मनींचे भाव त्यांनाच माहीत. समोर उंचावर सोन्याच्या सिंहासनावर बसलेल्या औरंगजेबाकडे त्यांची तीक्ष्ण नजर लागलेली होती. जणुं न बोलत्या शब्दांत ते औरंगजेबाला म्हणत होते, 'उतर, खालीं उतर! तें सिंहासन माझें आहे! इथें पृथ्वीराज चव्हाणानं बसून राज्य केलं आहे, इथें धर्मराज युधिष्ठिरानं राज्य केलं आहे, इथें माझ्या पूर्वजांनीं बसून राज्य केलं आहे. राणा संग, राणा उदयसिंह आणि राणा प्रताप ह्या सिंहासनावर हक्क सांगत होते, त्यांचाच मी वंशज आहें! तूं खालीं उतर!'

दरबारांत रजपूत राजे नेभळटासारखे माना खालीं घालून उभे होते. महाराज रामसिंहाबरोबर पुढें गेले. औरंगजेबाला देण्यासाठीं त्यांनीं सत्का नजर आणली होती, ती पेश केली. औरंगजेब तख्तावरूनच 'आईये शिवाजी राजा' असें म्हणाला व त्यानें इशारा केला त्याबरोबर दरबारच्या गुर्झ-बारदारांनीं महाराजांना आपल्याबरोबर चलण्याची विनंती केली रामसिंह बरोबर होतेच. महाराज गेले. ते कां कोणास ठाऊक पण एकदम बेचैन झाले. उद्विग्न मनःस्थितींत ते पावलें टाकीत गेले. औरंगजेबाच्या आधींच्या हुकमाप्रमाणें बारदारानें महाराजांना तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत नेऊन तेथें उभे राहण्यास सांगितलें. महाराजांनीं आपल्या भडकलेल्या नजरेनें भोंवतीं पाहिलें आणि त्यांनीं एकदम मोठ्यानें रामसिंहास विचारलें, "राजे, ही कोणत्या सरदारांची रांग आहे?"

महाराजांच्या मोठ्या आवाजानें रामसिंह घाबरलाच. तो महाराजांना हळू आवाजांत म्हणाला, "महाराज, हौलै हौलै, आहिस्ता बोलिये! यह तीन हजारी मनसबदारोंकी कतार है!"

औरंगजेबाच्या दरबाराची शिस्त इतकी भयंकर कडक होती कीं, जरा मोठ्यानें बोललं, आवाज झाला, तरी दरबारची आदब बिघडत असे! मग हसणं, शिंकणं, खोकणं कठीणच! रागावून बोलणं तर कल्पनेंतहि बसत नसे. त्या सत्ताधीश सम्राटापुढें कोण रागावणार? होती कोणाची ताकत? सगळेच किडे, मुंग्या, झुरळें!–पण आज तहाच्या पेचांत सांपडून एक सिंह तेथें आला होता. करारांत कबूल केलेल्या शब्दाप्रमाणें न वागवतां अत्यंत दुर्लक्षानें आणि अपमानानें जाणून बुजून त्या सिंहाची अप्रतिष्ठा चालविली होती. अगदीं सुरुवातीपासूनच औरंगजेबानें हा प्रकार सुरू केला होता. ज्या दिवशीं महाराज आग्र्यांत आले, त्या दिवशीं वास्तविक त्यांच्या स्वागताकरितां निदान शहाजादे, वजीर आणि सरसेनापति ह्यांना सामोरें पाठवावयास पाहिजे होतें. पण पाठविलं कोणाला? मुखलीसखान आणि रामसिंह यांना! खान दीड हजारी सरदार होता, तर रामसिंह फक्त अडीच हजारी! म्हणजे चवथ्या-पांचव्या दर्जाच्या दोन सरदारांना औरंगजेबानें पाठवून दिलं होतं. पण महाराजांनीं तेंहि ऐकून घेतलं. परंतु आतां भर दरबारांत अपमान! तो सिंह चवताळला.

महाराजांची नजर लालावली. भिंवया वर चढल्या. कानशिलावरच्या शिरा उडूं लागल्या. महाराजांच्या पुढच्याच रांगेमध्यें महाराजांकडे पाठ करून कांहीं रजपूत सरदारहि उभे होते. महाराजांनीं त्या निःशब्द शांततेंत एकदम वीज कडाडवली. संतापून त्यांनीं रामसिंहांना विचारलं, "राजे, आमच्याकडे पाठ करून आमच्यापुढें उभे असलेले हे लोक कोण?"

महाराजांचा आवाज विजेसारखा कडाडत गेला. सबंध दरबार थरकला. केवढं धाडस! इथं कोणाला मोठ्यानें श्वासोच्छ्वास घेण्याचीहि जिथें चोरी, तिथं केवढी ही गर्जना! चोरट्या नजरेनं महाराजांकडे पाहत व लगेच औरंगजेबाकडे पाहत सरदार, 'शू ऽऽऽऽ' असा धाकाचा इशारा डोळे विस्फारून पण भीत भीत देऊं लागले.

"—कोण हे सरदार?"

"शू ऽऽऽऽ! महाराज, चुपकेसे बोलिये। दरबारकी आदब बिगड़ जा रही है! आगे की कतार, राजे जसवंतसिंह खड़े हैं।" घाबऱ्या घाबऱ्या, हळूं आवाजांत रामसिंह म्हणाले.

" काय ? हे जसवंतसिंह ? माझ्या मावळ्यांना पाठ दाखवून रणांगणांतून पळणारे हेच ते जसवंतसिंह ? आणि त्यांची पाठ पहात आम्ही येथें उभें रहावें काय ?"

पुढें उभे असलेल्या जसवंतसिंहाच्या काळजांत कांपरें भरलें !

महाराजांच्या अंगाचा तिळपापड उडाला. संतापानें ते बेहोश झाले आणि एकदम छातीवर मुठी आपटून ते ओरडले, " हा अपमान मी सहन करणार नाहीं ! करणार नाहीं ! ! "

" राजे-राजे-राजे ! " रामसिंह महाराजांचा हात धरून समजूत घालण्याचा प्रयत्न करूं लागले. घाबरगुंडीनें ते घामाघूम झाले होते.

" राजे, तहांत काय ठरलं होतं ? मिर्झा राजांनीं आम्हांला काय वचन दिलं होतं ? आणि हा अपमान ? कोण समजतात हे आम्हांला ? सहन करणार नाहीं ! " आणि मुठी आवळून चवताळून डोळे विस्फारून औरंगजेबाकडे पहात ओरडणाऱ्या महाराजांनीं एकदम रामसिंहाच्या कमरेस असलेल्या कट्यारीस खसकन् हात घातला !

" राजे-राजे-! "

" अपमाऽऽन ! " दांत करकरून महाराज ओरडत होते. त्यांनीं कट्यार ओढली. पण रामसिंह आणि इतर सरदारांनीं एकदम महाराजांस धरलें. महाराजांच्या डोळ्यांतून आग बाहेर पडत होती. मस्तकावरचा तुरा हिन्काळत होता. संतापानें ते बेहोश झाले. ते भयंकर संतापले होते. अतिशय संतापामुळें त्यांचें मस्तक बधीर झालें. त्यांना भोंवळ आली आणि ते पडले ! इतरांनीं सांवरलें. दरबारांत गडबड उडून गेली.

औरंगजेबाची छाती धडधडत होती. त्यानें मोठ्यानें विचारलें, " क्या शोर है राजा रामसिंह ?"

घाबरलेले रामसिंह कुर्निसात करीत म्हणाले, " जिल्हा आलमपनाह, यह जंगलका शेर अनोखी जगहमें आकर यहाँकी गर्मीसे बेहोश हो गया है ! इन दख्खनके लोगोंको शाही दरबारके कानून मालूम नहीं । इस वजहसे यह शोर मच गया है । परवरदिगार, हुकूमपनाह तकसीर की माफी देंगे । " बारबार कुर्निसात करीत राजे बोलत होते.

"होश की दवा करो! उनके सिरपर गुलाबपानी छिडको। और शिवाजी राजाको उनके मुकाम पर वापीस ले जाओ। दरबार खत्म होने तक इंतजारी मत करो!" औरंगजेब म्हणाला. तो अगदीं घाबरून गेला होता.

मामा, मावशी आणि मामी ह्यांचे शब्द त्याला आठवूं लागले होते. शक्य तितक्या लवकर शिवाजीला आपल्या पुढून घेऊन जाण्याचा त्यानें हुकूम केला.

गुलाबपाणी शिंपडून महाराजांना शुद्धीवर आणण्यांत आलें. ताबडतोब तामझाममधून रामसिंह त्यांना घेऊन मुक्कामावर आले. ह्या दिवशीं तारीख होती, १२ मे १६६६.

शिवाजी राजांना नेल्यावर औरंगजेबाचा जीव खालीं पडला. आतां पुन्हा कधींहि ह्याला आपल्यापुढें येऊं द्यायचं नाहीं, असें त्यानें ठरविलें. जें कांहीं करायचें तें परस्पर!

* * *

**आधार :** सभासद—पृ. ४८ ते ५०.
हाउस ऑफ शिवाजी : पृ. १६० ते १६२.
सरकारकृत शिवाजी : पृ. १४०-४१.
फॉरिन बायोग्राफीज् ऑफ शिवाजी :
मराठी रियासत : पृ. १२२ ते १२४.

महाराजांना मुक्कामावर नेण्यांत आलं. राजे रामसिंहाशिवाय मुखलीसखान वगैरे इतरहि कांहीं सरदार तेथें होते. महाराज फार बेचैन झालेले होते. चिटणीस, हिरोजी, निराजीपंत वगैरे मंडळींनीं महाराजांची ती अवस्था पाहून एकदम धास्तावून विचारलं, " काय झालं ? महाराज–"

" ह्याचं नांव दगाबाजी ! बादशहानें वचन दिलं एक आणि वागणूक मात्र दिली भलती ! वचनभंग ! "

" अपमान ! भर दरबारांत ! आमची सन्मानपूर्वक मुलाखत घेतील, आमचें म्हणणें ऐकून घेतील, दख्खनची सुभेदारी देतील, अशी आम्हांला वचनें देण्यांत आलीं होतीं ! पण ह्यांच्या शब्दांची किंमत मातीइतकी ! बादशहानें वचन देऊन आम्हांला फसविलें ! " महाराज म्हणाले......

आणि औरंगजेबाच्या तिथें असलेल्या सरदारांनीं हे महाराजांचे शब्द किल्ल्यांत जाऊन त्याला सांगितलें. तेव्हां औरंगजेबच संतापला ! शिवाजी राजांनीं आमचा विश्वास गमावला आहे, सबब त्यांना पुन्हां दरबारास आणूं नये असें त्यानें रामसिंहास बोलावून फर्माविलें.

राजे रामसिंहाच्या डोक्यावर हा तापलेला धोंडाच जणुं चढला. ते महाराजांच्या मुक्कामावर आले व त्यांनी महाराजांस, तुमचा मुक्काम आतां येथून हलवून आग्र्याबाहेर जयपूर महाल म्हणून आमचाच एक महाल आहे तेथे ठेवण्याचा शहेनशाहचा हुकूम झाला आहे, असें सांगितलें. इथं काय अन् तिथं काय, महाराजांस सारखेंच होतें. प्रश्न कोणत्या मुक्कामावर राहायचं हा नव्हताच.

महाराजांचा मुक्काम हलला. शहराबाहेर एका बाजूला जयपूर महाल होता. महाराजांच्या मंडळींसह त्यांना तेथे नेण्यांत आलें. हा महालहि सुंदर, भव्य व बळकट होता.

दरबारांतील अपमानामुळें महाराजांच्या डोक्यांत एक भयंकर संशय निर्माण झाला होता व तो अगदीं हजार टक्के बरोबर होता. हा कपटी बादशहा अखेर आपला गळा पकडणार कीं काय ?—आणि तेंच झालें.

महाराजांच्या हवेलीभोंवतीं पठाण, अरब, मोंगल वगैरे घोडेस्वार व हशमांचा गराडा पडला. महालाच्या जाळीदार संगमरवरी भव्य झरोक्यांतून हा वेढा महाराजांच्या मंडळींनीं पाहिला ! त्यांची छातीच दडपली !

" महाराज–! " त्यांनीं तो औरंगजेबाचा कावा महाराजांस दाखवला. महाराजांनीं लगबगीनें उठून पाहिलें.

" जगदंब ! जगदंब ! " महाराजांचें मस्तक थरारलें. डोळे वटारून ते पाहूं लागले. महालाच्या चौगीर्द हत्यारबंद हशमांचा गराडा पडला होता. एक धिप्पाड उग्र अंमलदार करड्या आवाजांत हुकूम सोडून नागव्या तलवारीचे व भाल्याचे पहारे उभे करीत होता. हा होता आग्रा शहराचा कोतवाल पोलादखान ! महाराजांचें काळीज भयानें ताड ताड उडूं लागलें. जाळ्यांत सांपडलेल्या सिंहासारखी त्यांची उलघाल उडाली. कैद ! भयंकर जबरदस्त कैद ! सारें भयानक भवितव्य त्यांना दिसूं लागलें. साऱ्या आशा–आकांक्षांचा चक्काचूर उडाला. आतां मरण ! झिजून पिचून मरण ! औरंगजेबाची मगरमिठी पडली ! आतां मृत्यूला सुद्धां ही मगरमिठी झटकन् सोडवतां येणार नाहीं ! कुठं येऊन पडलों ! हें काय भयंकर झालं ! आतां माझा महाराष्ट्र मला दिसणार नाहीं ! माझा सह्याद्रि ! माझी पवना, भीमा, इंद्रायणी-माझी कृष्णा गोदा ! माझी तुळजाभवानी, माझा खंडोबा, पांडुरंग ! माझा देहूचा मायबाप, माझा चिंचवडचा मोरया आतां दिसणार नाहीं ! टाळ–मृदंगांचा कल्लोळ, शाहीर–गोंधळ्यांची आरोळी आतां ऐकूं येणार नाहीं ! माझा कोंडाणा–पुरंधर, माझा तोरणा–राजगड आतां मला दिसणार नाहीं ! माझी आई–! आई–आई ! मला आतां पुन्हा–मोरोपंत, सांभाळा ! माझी आई –! तुला टाकून, ओलांडून आलो ! आतां जिवाजिवांच्या भेटी तुटल्या ! पंत सांभाळा – !

* * *

—आणि राजगडावर .........?

आईसाहेब जगदंबेच्या पायावर डोकं ठेवून विनवीत होत्या, " आई, आतां बाळाला आण माझ्या ! केव्हां येईल ? तूं पाठराखणी गेली आहेस, मला चिंता नाहीं. पण लौकर आण ! आतां मी म्हातारी झालें — ! "

मोरोपंत सतत पाठीशीं उभे. सावलीसारखे. ते अगदीं आईसाहेबांचेहि आई झाले होते.

महाराज कैदेंत पडले आहेत, ही बातमी अद्याप आईसाहेबांस समजलेली नव्हती ! राजगडावर पोहोंचलीच नव्हती.

* * *

—आणि आग्र्यांत........

महाराजांनीं संभाजीराजांना हृदयाशीं घट्ट धरून दाटलेल्या अंतःकरणानें शोक केला. शेषाहूनहि खंबीरपणानं वागणाऱ्या महाराजांची मनःस्थिति अशी झाली. भोंवतींच्या मंडळींच्या मनाची गत काय सांगावी ? सर्वांनींच काळजी करावी. सर्वांनीच एकमेकांना धीर द्यावा. आतां सर्वांना आधार तुळजाभवानीचा !

सक्त कैद सुरू झाली महाराज कैद झाल्याची बातमी आग्र्यांत, दिल्लींत पसरली. अष्टदिशांस पसरत चालली.

रामसिंह भेटायला आले. ते काय बोलणार ? त्यांना अत्यंत वाईट वाटत होतं. गुलामगिरी पत्करली कीं सज्जनपणा आणि सद्भाव हाहि वापरतां येत नाहीं. एकेक दिवस उलटूं लागला.

महाराज अत्यंत गंभीर बनले. तास तास शून्य नजरेनें विचार करीत बसत. आतां ह्या पोलादी मिठींतून सुटायचं कसं ? महाराजांचे वकील म्हणून रघुनाथपंत कोरडे हे औरंगजेबाच्या दरबारांत अजून जाऊं येऊं शकत होते. त्यांना दरबार मना नव्हता. महाराजांनीं पंतांबरोबर बोलून औरंगजेबाकडे अर्ज करण्याचें ठरविलें. पंत फार तळमळीचे होते. हुशारहि तसेच. त्यांनीं महाराजांस सल्ला दिला कीं, ' औरंगजेबास विजापूर व गोवळकोंडा जिंकण्याची फार फार इच्छा आहे, तर ' तीं राज्यें जिंकून देतो, मला फौज व पैसा देऊन दक्षिणेंत पाठवा ', असा औरंगजेबास अर्ज करावा. महाराज म्हणाले, " ठीक आहे. "

लगेच रघुनाथपंत किल्ल्यांत गेले. त्यांनीं अर्जबेगीच्या मार्फत बादशहास अर्ज पेश केला. औरंगजेबानें अर्ज ऐकला ! !

पण थोड्या दिवसांनंतर महाराजांच्या अर्जासकट महाराजांचाच निकाल लावण्याचा भयंकर बेत औरंगजेब आंखीत होता.

एक भयंकर बातमी एके दिवशीं राजे रामसिंहांना समजली. त्यांच्या काळजाचं पाणी पाणी झालं. बातमी भयंकर होती.

ता. १६ मे १६६६ रोजीं किल्ल्यांत खास सरदारांची मजलीस भरली होती. अगदीं मोजकेच लोक त्यांत होते. जाफरखान वजीर, शहाजादी झेबुन्निसा, आग्र्यांतील इमाम, मौलवी व इतर कांहीं सरदार ह्यांत होते. पण त्यांत रजपूत मात्र एकहि नव्हता. औरंगजेबानें ह्या सर्वांना सल्ला विचारला कीं, हा शिवाजी माझ्या हातांत सांपडला आहे, मीं त्याचं काय करावं? सर्वांनींच सल्ला दिला कीं, त्याला मुसलमान करावं! पण त्यांतल्या त्यांत दोन सल्ले जरा वेगळे होते. वझीर जाफरखानानें म्हटलं कीं, शिवाजीला मुसलमान करावं, पण तो होत नसल्यास हट्ट किंवा जबरदस्ती न करतां त्याला काबूल कंदाहारकडे पठाणांशीं लढण्याकरितां रवाना करावें. बरा जोरदार आदमी हातीं सांपडला. खैबरखिंडीत पठाणांशीं झुंजतां झुंजतां मिर्झा राजांसारखे वीरहि थकले. आतां ह्याला तिकडेच गुंतवावें. एकदां तिकडे अडकला कीं, त्याला प्राणपणानें पठाणांशीं लढावेंच लागेल. आपलें दुहेरी काम होईल पठाणांना रोखूनहि धरतां येईल, आणि शिवाजीलाहि अडकवून टाकतां येईल. शिवाजीला कैदेंत कुजत टाकण्यापेक्षां किंवा ठार मारण्यापेक्षां हाच उत्तम रस्ता आहे!

औरंगजेबानें सर्वांचेंच म्हणणें ऐकून घेतलें. अनेकांनीं सांगितलं कीं, जर शिवाजी धर्म बदलावयास तयार नसेल तर त्याची गर्दन उडवा.

आतां औरंगजेबानें झेबुन्निसेकडे नजर वळविली, "क्यँव शहेजादीसाहिबा? आपकी सलाह?

"आब्बाजान! इस दिलेर मरेठेको कत्ल न करो! हो सके उसे मुसलमाँ बनाओ! गर यह मुमकीन नहीं तो उसे मुघल सल्तनतकी तरक्की और हिफाजतके काममें बखूबी उल्झाओ!" शहेजादीनें समंजस सल्ला दिला.

ह्या मजलीसमध्यें घडलं असं. पण औरंगजेबानें शेवटीं ठरविलं वेगळंच. त्यानें साफ सांगितलं कीं, शिवाजीला मी ठार करणार आहें!

—ही ती भयंकर बातमी! राजे रामसिंहांना आश्चर्य वाटलं नाहींच. भीति वाटली, दुःख वाटलं. औरंगजेबाचा निर्णय! आतां यमपुरीच्या यातनाहि फिक्या पडतील! महाराज मरणाच्या मुखांत जाणार!

राजे रामसिंहांचं काळीज विरघळलं. आपल्या वडिलांच्या शब्दाला हा राक्षस काळोखी फासणार ! सुरक्षिततेचं वचन देऊन ही दगाबाजी ! राजांना राहवेना. त्यांनीं लगेच औरंगजेबाला अर्ज पाठविला कीं, ' आपण शिवाजीराजांना ठार मारायचं ठरवलं आहे असं समजतं. आपण सर्वसत्ताधीश आहांत. आम्ही गुलाम आहों. आपल्या इच्छेविरुद्ध कोण काय करूं शकेल ? परंतु शिवाजीराजांना ठार मारण्यापूर्वीं आपण मला ठार मारा ! मी व माझे वडील मिर्झा राजे ह्यांनीं शिवाजीराजांना जपण्याचं पूर्वीच वचन दिलं आहे. कृपा करून प्रथम मला ठार मारा ! '

हा अर्ज ऐकतांच औरंगजेब किंचित् चमकला. ही शिवाजीला ठार करणार असल्याची बातमी सर्वत्र पसरली होती. थिवेनो नांवाच्या फरांसीस मुशाफिरालाहि ही समजली तिथं इतर जनतेचं काय ! लोक हळहळले. अशा स्थितींत जर शिवाजीला ठार केलं तर हे हरामजादे रजपूत कदाचित् बिघडतील, ही भीति औरंगजेबाला वाटूं लागली. आणि त्यानें हा बेत एकदम अंमलांत आणण्याचें तहकूब केलें. पण रद्द मात्र केला नाहीं ! त्याच्या मनांतल्या आंतल्या कप्प्यांत ही विषाची कढई कढत होतीच.

औरंगजेबाची मामी, म्हणजे शाएस्ताखानाची बायको, हिचा फार हट्ट होता कीं, शिवाजीला ठारच मारावा. शिवाय इतर अनेक भाजलेल्या मंडळींची ही मागणी होती.

आपल्या एका अर्जाचा निकाल उडाल्यावर महाराजांनीं रघुनाथपंतांमार्फत औरंगजेबाकडे एक विलक्षणच अर्ज पाठविला. महाराजांनीं कळविलें कीं, " मला एकवार बादशहांची प्रत्यक्ष भेट घ्यावयाची इच्छा आहे ! प्रत्यक्ष मुलाखतींत बादशहांच्या अत्यंत फायद्याच्या खूप गोष्टी सांगायच्या आहेत ! "
— अफज़ुलखानाचा केवढा प्रचंड फायदा झाला, हें औरंगजेबाला माहीत असल्यामुळें औरंगजेबानें हा अर्ज ह्या कानानें ऐकला व त्या कानानें सोडून दिला !

आपल्या सुटकेसाठीं फट शोधायचा महाराज रात्रंदिवस प्रयत्न करीत होते. त्यांनीं आणखी एक प्रयत्न करून पाहिला. बादशहाचा वजीर जाफरखान यालाच मुलाखतीला बोलावून त्याच्याशीं वाटाघाटी कराव्यांत व त्याच्यामार्फत औरंगजेबाशीं बोलणीं लावावींत, असें त्यांच्या मनांत आलें. त्यांनीं

## ११ : : सुटका

महाराजांना चिंता जाळूं लागली. अहोरात्र सुटकेसाठीं ते विचार करीत होते. पाहुण्याला दगाबाजीनें कैद करायचं आणि त्याला ठार कसं कराचयं अन् केव्हां करायचं याचे मनसुबे आखायचे ही तर औरंगजेबाची संस्कृति होती! आश्चर्य त्यांत कांहींच नव्हतें. त्याला दोष देण्यांत शब्द खर्चायची आतां मनस्थितीहि राहिली नव्हती. ते चिंता करीत होते कार्याची आणि त्यासाठीं सुटकेची. सनदशीर मार्ग सर्व संपले होते. आतां दुसराच कांहीं तरी उपाय शोधला पाहिजे, हें त्यांना स्पष्ट दिसूं लागलें होतें.

अहोरात्र एकच चिंता. महालांत शतपावली करतांना, जेवतांना, पलंगावर पडल्या पडल्या, इतकंच काय, पण प्रत्येक व्यवहार करतांना महाराज चिंताक्रांत होते. झोंप लागत नव्हती. तासन्‌तास शून्यांत कुठेंतरी नजर लावून महाराज बसत. दुसरा विचार नाहीं. सुटका! ह्या पिंजऱ्यांतून सुटका कशी? शुक्राचार्य आणि बृहस्पति यांच्याहि मेंदूला झिणझिण्या आल्या असत्या असं हें संकट. आतां ह्यांतून सुटका कशी?

दक्षिणेंत मिर्झा राजांना हें समजलं कीं, दगाबाजी करून औरंगजेबानें शिवाजी राजांना कैदेंत टाकलें. त्यांना धक्काच बसला. पण त्यांच्या हातांत आतां काय होतं? कांहींच नाहीं! आपल्या शब्दाला बळी पडून एक महान् वंदनीय पुरुष आग्र्याच्या खाटिकखान्यांत कोंडला गेला याचं त्यांना मनस्वी दुःख झालं. त्यांनीं औरंगजेबाला मोठ्या विनवणीनें लिहिलें कीं, 'शिवाजीला कैदेंत ठेवून किंवा ठार मारून कांहींहि फायदा होणार नाहीं. शिवाजीनें दक्षिणेंतून निघण्यापूर्वीं आपल्या राज्याची इतकी उत्कृष्ट व्यवस्था करून ठेवली आहे कीं, शिवाजीला ठार मारून शिवाजी नाहींसा होईल, पण त्याचें राज्य मोडणें अशक्य. तुम्हीं शिवाजीची मर्जी सांभाळूनच आपला दक्षिणेंतील डाव सुधारावा. मुख्य गोष्ट म्हणजे औरंगजेब बादशहा स्वतःचा शब्द पवित्र समजून योग्य रीतीनें पाळतात, ही गोष्ट एकदां जगाला समजूं द्या. शिवाजीची त्वरित सुटका करा!'

पालथ्या घड्यावर पाणी! मिर्झा राजांच्या ह्या पत्राचा औरंगजेबावर काडीइतकाहि परिणाम झाला नाहीं.

जाफरखानास तसें कळविलें. आणि विशेष म्हणजे त्यानेंहि मुलाखतीचें आश्वासन दिलें. पण व्हायचा तो घोटाळा झालाच ! ह्या जाफरखानाची बायको औरंगजेबाची मावशी होती ! शाएस्ताखानावरच्या हल्ल्याच्या वेळीं तिनें महाराजांचा प्रताप प्रत्यक्ष पाहिला होता. शिवाजी म्हटलं कीं ती भीतीनें तीन हात उडायची ! आतां तिचा नवराच शिवाजीला भेटावयाला चालला. तिला तें कळलं ! काय म्हणावं ह्या नवऱ्याला ! शिवाजीच्या भुताटकीबद्दल गेलीं तीन वर्षं ह्यांच्या कानींकपाळीं ओरडते आहे तरी ह्यांच्या डोक्यांत शिरेना कसें ? त्या सैतानाला प्रत्यक्ष भेटायची ही नसती आक्काबाई ह्यांना कुठून आठवली ? तिनें नवऱ्याचे चांगलेच कान उपटले. पण मीं फार वेळ अजीबात थांबणार नाहीं असें जाफरखानानें वचन देऊन तिची परवानगी कशी तरी काढली.

अखेर कबूल केल्याप्रमाणें जाफरखान भीत भीत मुलाखतीला आला. महाराज फार आदरानें वागले. महाराज म्हणाले कीं, बादशहांचें मन वळवून आपण मला दक्षिणेंत परत पाठवा ! शाही फौज व पैसा माझ्याबरोबर द्या ! मी दक्षिणेंत बादशहांसाठीं खूप मोठें राज्य जिंकून देतों.

पण तेवढ्यांत जाफरखानानें म्हटलें, ‘ठीक आहे, तुमचें म्हणणें मी बादशहांच्या कानावर घालतों ! ’ अन् लगेच तो निघून गेला !--कारण त्याला बायकोनें बजावलें होतें !

जाफरखानानें कांहींहि केलं नाहीं. हाहि प्रयत्न वायां गेला. दिवसेंदिवस महाराजांच्या महालाभोवतीं बंदोबस्त कडक होऊं लागला. महालावर तोफा रोखून ठेवण्यांत आल्या !

आतां सुटकेच्या आशेचा किंचितसा किरणहि दिसेनासा झाला.

* * *

**आधार :** सभासद : पृ. ५०–५१.
मराठी रियासत–२ : पृ. १२५ ते १२७.
हाउस ऑफ शिवाजी : पृ. १६२–१६९.
सरकारकृत शिवाजी : पृ. १४२–१४७.

# ११ : : सुटका

महाराजांना चिंता जाळूं लागली. अहोरात्र सुटकेसाठीं ते विचार करीत होते. पाहुण्याला दगाबाजीनें कैद करायचं आणि त्याला ठार कसं कराचयं अन् केव्हां करायचं याचे मनसुबे आखायचे ही तर औरंगजेबाची संस्कृति होती ! आश्चर्य त्यांत कांहींच नव्हतें. त्याला दोष देण्यांत शब्द खर्चायची आतां मनस्थितीहि राहिली नव्हती. ते चिंता करीत होते कार्याची आणि त्यासाठीं सुटकेची. सनदशीर मार्ग सर्व संपले होते. आतां दुसराच कांहीं तरी उपाय शोधला पाहिजे, हें त्यांना स्पष्ट दिसूं लागलें होतें.

अहोरात्र एकच चिंता. महालांत शतपावली करतांना, जेवतांना, पलंगावर पडल्या पडल्या, इतकंच काय, पण प्रत्येक व्यवहार करतांना महाराज चिंताक्रांत होते. झोंप लागत नव्हती. तासन्तास शून्यांत कुठेंतरी नजर लावून महाराज बसत. दुसरा विचार नाहीं. सुटका ! ह्या पिंजऱ्यांतून सुटका कशी ? शुक्राचार्य आणि बृहस्पति यांच्याहि मेंदूला झिणझिण्या आल्या असत्या असं हें संकट. आतां ह्यांतून सुटका कशी ?

दक्षिणेंत मिर्झा राजांना हें समजलं कीं, दगाबाजी करून औरंगजेबानें शिवाजी राजांना कैदेंत टाकलें. त्यांना धक्काच बसला. पण त्यांच्या हातांत आतां काय होतं ? कांहींच नाहीं ! आपल्या शब्दाला बळी पडून एक महान् वंदनीय पुरुष आग्र्याच्या खाटिकखान्यांत कोंडला गेला याचं त्यांना मनस्वी दुःख झालं. त्यांनीं औरंगजेबाला मोठ्या विनवणीनें लिहिलें कीं, ' शिवाजीला कैदेंत ठेवून किंवा ठार मारून काहींहि फायदा होणार नाहीं. शिवाजीनें दक्षिणेंतून निघण्यापूर्वीं आपल्या राज्याची इतकी उत्कृष्ट व्यवस्था करून ठेवली आहे कीं, शिवाजीला ठार मारून शिवाजी नाहींसा होईल, पण त्याचें राज्य मोडणें अशक्य. तुम्हीं शिवाजीची मर्जी सांभाळूनच आपला दक्षिणेंतील डाव सुधारावा. मुख्य गोष्ट म्हणजे औरंगजेब बादशहा स्वतःचा शब्द पवित्र समजून योग्य रीतीनें पाळतात, ही गोष्ट एकदां जगाला समजूं द्या. शिवाजीची त्वरित सुटका करा ! '

पालथ्या घड्यावर पाणी ! मिर्झा राजांच्या ह्या पत्राचा औरंगजेबावर काडीइतकाहि परिणाम झाला नाहीं.

मिर्झा राजांनीं आपले चिरंजीव राजे रामसिंह ह्यांना विशेष कसोशीनें व तळमळीनें लिहिलें कीं, कसेंहि करून शिवाजी राजांस अपाय न होतां ते सुखरूपपणें परत येतील, अशी खटपट करा. रामसिंह काय करणार ? ते तर गुलाम. महाराजांच्या भोंवती पांच हजार पोलादखानी फौजेचा गराडा पडलेला होता. त्यांचं औरंगजेबापाशीं काडीइतकंहि वजन नव्हतं. कोणाच्चंच नव्हतं. फक्त यमदूतांचं मात्र होतं !

महाराज अटकेंत पडले ही बातमी महाराष्ट्रांत येऊन थडकली. गांवागांवांत आणि किल्ल्याठाण्यांवर ही दुःखाची आणि चिंतेची बातमी पोहोंचली. सर्वत्र काळवंडलेले दुःखी चेहरे दिसूं लागले. आतां कसें होणार ? आपले महाराज गेले, या सैतानानं कोंडून धरले. आतां पुन्हां कधीं दिसतील ? उभा महाराष्ट्र शोकमग्न झाला. साऱ्यांचं लक्ष उत्तर दिशेला खिळलं. त्या दिशेला पांखरूं ओरडलं तरी कान टवकारले जात होते. आमचा राजा असेल कसा ? आमचा राजा सुटेल कसा ?

आणि राजगडच्या राजवाड्यांत ही बातमी धडकली ! आईसाहेबांना हें समजलं ! आणि त्या गाईनें हंबरडा फोडला. मान लटलटूं लागली, ओठ थरथरूं लागले; डोळ्यांतून कृष्णा-कोयना घळघळूं लागल्या. म्हातारी मटकन् बसलीच. तिनें अंबाभवानीच्या पायांना मिठी मारली. आकान्त मांडला. "माझा मुलगा दे ! तूं नेलास ; तूं आणून दे ! सांग, मी आतां काय करूं ? राक्षसाच्या हातीं माझं लेकरूं सांपडलं. तूं सोडवून आण ! सांग केव्हां माझ्या ओटींत त्याला आणून घालणार ? सोडणार नाहीं आतां पाय तुझे ! अन्न घेणार नाहीं आतां !"

ढसढसा रडून आईसाहेबांनीं निधान मांडलें. स्वतःचं दुःख गिळून मोरोपंत आईसाहेबांची समजूत घालायचा प्रयत्न करीत तर त्यांचेच डोळे त्यांना दगा देत. ते फार जपत होते. आतां त्यांनीं आईसाहेबांची पाठ सावलीसारखी धरली.

आईसाहेबांनीं अन्न टाकलें ! केवळ दूध आणि निराहार अळेंबळें घेऊं लागल्या. त्या खंगत चालल्या.

* * *

— आणि आग्र्याच्या कैदेंत महाराज हनुवटीखालीं मूठ धरून गंभीर मुद्रेनें विचार करीत होते. भोंवतीची मंडळी वेडीपिशी झाली होती.

मेच्या पहिल्या आठवड्यांत महाराज आग्ऱ्यांत आले. सारा प्रकार दुसऱ्या आठवड्यांत घडला. आणि आतां जूनचा महिनाहि संपून गेला. आणि रोज अजूनहि पोलादखानाचे पहारे जास्त जास्तच कडक होत होते.

आणि एक दिवस एकाग्र चित्तानें विचार करीत बसलेल्या महाराजांच्या अत्यंत गंभीर मुद्रेवर एकदम, अगदीं आकस्मिक, अगदीं न कळत स्मिताची छटा उमटली. उमटून गेली. महाराजांच्या डोक्यांत कांहीं तरी विलक्षण विचार उमटला. विचारांच्या मोत्यांचीं शिंपलीं अहोरात्र समुद्राच्या तळाशीं बुड्या मारून महाराजांनीं अखेर बाहेर काढलीं असावींत असें भासूं लागलें.

" जगदंब ! जगदंब ! " महाराजांनीं नेत्र मिटले.

भोंवतींच्या मंडळींनीं अत्यंत उत्सुकतेनें भिवया उंचावल्या. त्यांच्या मनांतून आनंदाची एक लहर उगीचच आशेनें गर्हिवरून गेली.

पोलादखान, मुखलीसखान, रामसिंह व बादशहाचे इतर कांहीं कानाळू लोक मधून अधून उगीचच महाराजांकडे येऊन बसून जात असत. यांत खऱ्या मायेचा — दुबळा असेना का — फक्त रामसिंह होता. बाकीचे सगळे एकजात चोर ! आतांपर्यंत महाराज उगीच इकडच्या तिकडच्या गोष्टी त्यांच्याशीं बोलत. हे लोक कोण आहेत आणि आपला प्रत्येक शब्द औरंगजेबापाशीं कुठून कसा पोहोंचतो, हें महाराजांनीं पक्कें ओळखलें होतें. आतां मात्र त्यांनीं ह्या रिकामटेकड्या दरबारी टोळभैरवांना हळूंहळूं बादशहाबद्दल प्रेम, निष्ठा, स्तुति, आदर, श्रद्धा इत्यादि इत्यादि राखीव सद्गुणांची चंची सोडून चिमुट चिमुट तंबाखू द्यायला सुरुवात केली. ' आपण ' आतां कायमचेच आग्ऱ्यास राहणार ! बादशहांच्या शब्दाबाहेर मी नाहीं. त्यांच्याशिवाय मला आतां दुसरा आधारच नाहीं. बादशहा सांगतील तसें वागण्यास आपण तयार आहोंत. दक्षिणेंतील बायका माणसेंहि इकडे घेऊन यावीं असा माझा विचार आहे ! ...........'

हे विचार रोज चढत्या वाढत्या प्रमाणांत अगदीं तंबाखूसारखेच चोळून चोळून ह्या लोकांपुढें महाराज बोलूं लागले. सरदारांना वाटलं कीं, शिवाजी नरमत चालला, मऊ होत चालला. हें आंबट ढाण कैरीचं लोणचं बादशाही मसाल्यामुळें मुरत चाललं ! औरंगजेबाच्याहि कानांवर महाराजांचा हा पालट रोज जाऊं लागला.

भोंवतीची मंडळी समजून चुकली ! पण त्यांच्या वागण्यांत बोलण्यांत आणि दिसण्यांत पूर्वीचाच मोळाभाबडा भाव कायम होता.

आणि एक दिवस रघुनाथपंतांच्या मार्फत महाराजांनीं एक विचित्रच अर्ज बादशहाकडे रवाना केला. ' माझ्याबरोबर मीं आणलेली फौज आहे. त्या फौजेची आतां येथें कांहींच गरज नाहीं. ह्या लोकांना इकडची हवाहि मानवत नाहीं. मी केवळ बादशहांच्या हुकुमांत राहणार आहें. ही फौज मला आतां येथें नको. ती परत दक्षिणेंत पाठवून द्यावी असा माझा विचार निश्चित झाला आहे. तरी बादशहांनीं मेहेरबानी करून परवानगी द्यावी. '—

" मंजूर. बिल्कुल मंजूर है । "

औरंगजेबानें हा मात्र अर्ज एकदम मंजूर केला ! बरी ब्याद जाते आहे, असें वाटून त्यानें मंजुरी दिली. फौजेची थोडी तरी धास्ती होती. आतां काम आटोपशीर झालं !

महाराजांनीं आपल्या कडकडीत निष्ठेच्या त्या कडकडीत फौजेला तान्हाजी, त्र्यंबकपंत, हिरोजी, चिटणीस वगैरे लोकांमार्फत दक्षिणेंत निघून जाण्याचा हुकूम दिला. त्या मंडळींना हें कससंच वाटलं. महाराजांना टाकून रिकामेंच निघून जायचें ? तिकडे लोक विचारतील, महाराज कुठें आहेत ? काय सांगायचं त्यांना ? आईसाहेबांच्या पुढें रिकामं जायचं ?

पण तान्हाजी, पंत वगैरे मंडळींनी डाळ मिचकावले. मुकाट फौज टोळ्या-टोळ्यांनीं दख्खनच्या मार्गाला लागली.

जुलैचा महिना ऐन मध्यावर आला. पावसाच्या सरीवर सरी सरसरू लागल्या. यमुना भरली. सरदार व पोलादखान वगैरे रोज महाराजांच्या महालांत डोकावून जातच असत. पावसाळा सुरू झाला होता. तरी पहारा ढिला पडलेला नव्हता. महाराजांची फौज निघून गेलेली होती. तरी तोफा आणि पांच हजार हशम महालाभोंवती चोवीस तास उभेच होते.

आणि एक दिवस महाराज खोकूं लागले ! प्रकृति बिघडली ! किरकोळ ! फार नाहीं ! येणाऱ्या मंडळींना महाराजांनीं आपलं किरकोळ दुखणं जरूर तेवढं कण्हून, खोकून दाखविलं ! त्यांनीं चौकशी केली, "तबियत ठीक नहीं ?"

" कुछ कुछ ! "

" आराम करो ! "

वास्तविक महाराजांना कांऽऽहीं झालेलं नव्हतं! राजगडच्या बालेकिल्ल्यासारखीच त्यांची तब्येत ठणठणीत होती. पण हे सगळे शिंपल्यांतले मोती आतां एक एक बाहेर पडत होते. रामसिंह आले. चौकशी करून गेले. 'कांहीं औषध वगैरे?'–'छे. छे. औषध कशाला? किरकोळ दुखणं! आपोआप होईल बरं!'

बादशहाच्या कानांवर महाराजांचं पडसं, खोकला गेला.

दोन दिवस उलटले. किंचित् दुखणं जास्तच झालं!

चार दिवस उलटले. दुखणं वाढतच चाललं!

भोंवतीची मंडळी मनांतल्या मनांत फिदी फिदी हंसत होती. पण चेहऱ्यावर मात्र महाराजांच्यापेक्षां दुखण्याच्या कळा ह्यांच्याच जास्त! महा इब्लिस होते एक एक जण.

खरोखर खोटं आजारी पडणं ही सुद्धां एक कलाच आहे! साधते त्यालाच साधते!

महाराजांच्या दुखण्याची वार्ता पोलादखानाच्या फौजेंत पसरली. रामसिंह अन् इतर कोणीहि आलं कीं महाराज काळजीपूर्वक कण्हत! अन् बाकीचे आठवण ठेवून आपले चेहरे गंभीर करीत!

औषध सुरू झालें! औषधाच्या कुप्या, मात्रा, सुंठी, मोरावळे गोळा होऊं लागले. ह्यांपैकीं औषधाशिवाय बाकीचे पदार्थ पोटांत जाऊं लागले! दुखणें वाढतच चाललें. औरंगजेबानें हकीम, वैद्य, औषधी वगैरे बाबतींत मात्र रामसिंहांना मोकळीक दिली.

वैद्य हकीम रोज प्रकृति तपासून जाऊं लागले. पण कोणालाच कळेना कीं शिवाजी राजांना कोणता विकार झाला आहे? विकार कळेना, औषध तरी काणच द्यायचं? मोठ्यांचीं दुखणींहि मोठींच!

महाराज जरा आजारी आहेत अशी बातमी गांवांत पसरली; त्यांना आग्र्याची हवा सोसवत नाव्हती.

महाराजांना इतकं बरं नव्हतं तरी जेवणखाण व्यवस्थित होतं! महालांत चार पावलं कशीबशी ते येरझाराहि करीत होते. पोलादखान व त्याचे दुय्यम अधिकारी अधूनमधून आंत डोकावून जात.

दुखणें सारखें वाढतच चाललें. अगदीं उतार नाहीं. काय उपाय करावा हें हकीम वैद्यांना कळेना. शंभर औषधं बदलून पाहिलीं. पण औषधागणिक दुखणं वाढतच होतं. परंतु हकीम वैद्यांच्या बाबतींत मात्र महाराजांची तक्रार नव्हती.

जुलैचा तिसरा आठवडा सुरू झाला. महाराजांनीं अंथरूण धरलें. आतां आंतल्या आंत हिंडणें-फिरणेंहि थांबलें. भोंवतीची मंडळी चिंतेनें डोक्याला हात लावून बसूं लागली. दक्षतेनें शुश्रुषा सुरू झाली. मदारी मेहतर पाय चेपूं लागला.

महाराजांचीच मंडळी एकदमच मधून औषध आणण्याकरितां किंवा घाबऱ्या झालेल्या महाराजांना तांतडीनें पाठविण्यासाठीं वैद्य हकीमांकडे धावूं लागली.

ओकाऱ्या, खोकला, कण्हणें, बरळणें फारच वाढलें, रात्र रात्र झोंप लागेनाशी झाली.

—मुळांत झालं नव्हतं कांहींहि. डावी पापणीसुद्धां फडफडत नव्हती !

महाराजांच्या गंभीर दुखण्याची वार्ता सर्वत्र झपाट्यानें पसरत होती. कोणाला कांहींच वाटत नव्हतं. कोणाला बरं वाटत होतं, आणि असंख्यांना वाईट वाटत होतं.

महाराजांची तबियत इतकी बिघडली होती तरी पोलादखानाचा बंदोबस्त पोलादीच होता. त्यांत बदल करावा अशी किंचित्‌शींहि इच्छा वा जरूरी औरंगजेबाला वाटत नव्हती. उलट त्याची योजना दुसरीच व भयंकर चालू होती. महाराजांना कायमचं कैदेंत सडत ठेवण्यासाठीं एका वेगळ्याच बळकट इमारतीची त्यानें निवड केली होती. ही इमारत म्हणजे त्याचा एक सरदार फिदाइ हुसेन ह्याचा वाडा. ह्या वाड्याचें बांधकाम चालू होतें. बहुतेक वाडा पूर्ण झाला होता. औरंगजेबाच्या खास हुकुमावरून ह्या वाड्याचें बांधकाम निकडीनें चालू होतें. लवकरच बादशहा महाराजांना त्या भयंकर काळदरींत आणून टाकणार होता. मग तोंपर्यंत ते बरे होवोत वा न होवोत.

आणि एक दिवस ही बातमी महाराजांच्या कानीं पुटपुटली गेली. आणि मग महाराजांचें दुखणें फारच वाढलें. त्यांचें कण्हणें दारावरच्या पहारेकऱ्यांना

ऐकूं येऊं लागलें. पोलादखान व इतर आंत डोकावत तों दुखण्यानें हैराण झालेले महाराज त्यांना दिसत.

महाराज दुखण्यापेक्षां शुश्रूषेनेंच हैराण होत होते! कारण ही अकारण शुश्रूषा करून घेणं भाग होतं. कांहींहि करून दुखण्यास उतार पडेना. दुखणें सारखें वाढतच आहे, शिवाजी राजे खंगत चालले, कोणत्याहि औषधांनीं उतार पडत नाहीं, अशा बातम्या औरंगजेबाच्या कानीं रोज जात होत्या. त्याला त्याचं कांहींच नव्हतं.लोकांना तर असें वाटूं लागलें कीं, हा शिवाजी ह्या दुखण्यांतून उठत नाहीं. मरणार!

रामसिंह, मुखलीसखान, पोलादखान वगैरे लोक भेटावयास आले असतांना एक दिवस श्वास लागलेल्या महाराजांनीं कण्हत कण्हत तारवटलेल्या डोळ्यांनीं त्यांच्याकडे पहात पहात व अडखळत अडखळत म्हटलें कीं, ‘ आमची अवस्था आतां कठीण झाली! औषधांचे उपाय हरले! आम्ही उदास झालों–’ ह्यावर त्या मंडळींनीं महाराजांना धीर दिला.

त्यावर महाराज म्हणाले, ‘ आतां कठीण. आतां निदान दानधर्म करून तरी पहावा अशी इच्छा आहे. साधुफकीरांना मेवा-मिठाई वाटावी अशी इच्छा आहे. त्यांच्या दुआईनें तरी गुण येईलसें वाटतें! आम्ही पापी. बादशहांचे गुन्हे केले. त्याचीं फळं भोगतों आहोंत. पण बादशहा ह्या दान-धर्माला परवानगी देतील काय?’

आलेल्या मंडळींनीं होकारार्थी धीर दिला. महाराज म्हणाले, ‘ फार मेहेरबानी होईल. बादशहा रहेमदिल आहेत. मी अर्ज करतों. पंत!—’

महाराजांना मधून मधून पण योग्य वेळीं खोकल्याची हुकमी उबळ येत असे.

रघुनाथपंतांच्यामार्फत लगेच महाराजांनीं बादशहाकडे दानधर्म करण्या-साठीं परवानगी मागणारा अर्ज पाठविला.

बादशहांनीं तो एकदम मंजूर केला. पंत ही खुशीची खबर चिंतेच्या चेहऱ्याखालीं झांकून महाराजांकडे घेऊन आले.

सर्वच मंडळी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत जन्मभर उनाडलेली होती. आतांपर्यंत फत्तेखानापासून तों शाएस्ताखानापर्यंत अनेक सरदारांची त्यांनीं चांगलीच टिंगल उडविलेली होती. खट्याळपणा आणि वात्रटपणा त्यांच्या

रोमरोमांत भिनला होता. पण महाराजांच्या ह्या विलक्षण दुखण्यांत मात्र त्यांनीं आणलेला गंभीरपणाचा आव एकमेकांनाच लाजवणारा होता! वातावरण फार छान करून ठेवलं होतं!

मिठाईचे पेटारे पहिल्यांदाच महालांत आले. कावडीप्रमाणें बळकट दांडीला दोऱ्यांत बांधलेले व मिठाईनें भरलेले वेळूचे पेटारे हेलकावे घेत घेत भोयांनीं एक एक करून महालांत आणलेले. अनेक पेटारे आंत आले. महाराजांनीं निजल्या निजल्या त्यांना हस्तस्पर्श केला. पेटारे नंतर गांवांत रवाना झाले. महालांतून बाहेर पडतांना पोलादखानाच्या लोकांनीं व स्वतः खानानें पेटारे तपासून पाहिले.

त्यांतील भरगच्च प्रसाद त्यांनाहि मिळूं लागला.

पेटारे नित्य जाऊं लागले, नित्य तपासलेहि जाऊं लागले. मंडळींना नित्य खाऊहि मिळूं लागला.

असेच दिवसांमागून दिवस उलटत गेले. पेटारे चालू होते. तरी तब्येत ढासळतच होती. काय करावं?

पेटारे तपासून पहातांना किंबहुना पाहण्यापूर्वींच पोलादखानाची खात्री पटूं लागली कीं, यांत फक्त मिठाईच आहे. अनेक दिवसानंतर त्यानें अधून-मधूनच एखादा पेटारा तपासून बाकीचे पेटारे सरळ जाऊं देण्यांस सुरुवात केली. यांतल्या कित्येक मिठाईच्या डाली निरनिराळ्या सरदारांकडे रवाना होऊं लागल्या. इतर लोकांचीं तोंडें गोड होत होतीं; पण महालांतल्या मंडळींच्या तोंडचं मात्र पाणी दिवसेंदिवस आटत चाललं. कारण प्रकृति आतां अगदीं कड्याच्या कांठावर येऊन ठेपली. अहोरात्र जागरणें सुरू झालीं. महाराजांच्या डोक्याभोंवतीं कोंडाळीं करून मंडळी आपसांत कुजबुजून 'शेवटचे' उपाय, इच्छा, आकांक्षा, आज्ञा, सूचना, हळुहळु विचारून घेऊं लागली. मंडळींची ही शेवटची धांवपळ फारच जागरूकतेनें, काळजीनें, चिंतेनें चालली होती. सगळेजण रात्रभर जागे! वैद्य-हकिमांची तशीच धांवपळ! रामसिंह वारंवार येऊन जात. पोलादखानाच्या छावणींत तर खात्रीच झाली कीं, हा शिवाजी आतां दोन तीन दिवसांपेक्षां जास्त टिकत नाहीं! हा जाणार!! शहरांतहि लोकांना हेंच वाटूं लागलें. दरबारांत चर्चा ह्याचीच.

तरीहि पोलादखानाचा करडा पहारा कायम होता. आणि औरंगजेबाचा गुप्त निर्णय निश्चित होता.

महाराजांचे लोक औषध आणायला वा वैद्याकडे धांवपळ करीत तीहि वांझोटी नव्हे. तेवढ्यांत बातम्या मिळवीत. 'पुढची' सर्व तयारी कशी करायची तें ठरलेलं होतं. त्याची योजना हे लोक करीत.

महाराजांच्या भयंकर कोसळलेल्या तबियतीच्याच दिवशीं त्यांच्या कानांत एक बातमी येऊन घाबऱ्या घाबऱ्या शिरली. क्षणभर कण्हणं थांबलं!

"परवाचे दिवशीं तुम्हांला बादशहा येथून काढून फिदाइ हुसेनच्या वाड्यांत नेऊन टाकणार आहे!"

—आणि मग महाराजांचं कण्हणं वाढलं!

आतां फक्त पंचवीस किंवा तीस तासांचाच अवधि हाताशीं होता. त्यानंतर सावली औरंगजेबाची! मृत्यूची!! डोक्याला डोकीं लागलीं. कुजबुज झाली. ठरलं! ती रात्र भयंकर गेली! पोलादखान किंवा कोणीहि आंत आला कीं महाराजांचे लोक आवाज करूं नका, अशी खूण करीत.

तारीख १८ ऑगस्ट १६६६ ह्या दिवशीं महाराजांना फिदाइ हुसेनच्या वाड्यांत नेऊन टाकायचं, असा औरंगजेबाचा बेत ठरला. पण अत्यंत गुप्त!

१६ ऑगस्टची रात्र कशीबशी मृत्यूशीं आट्यापाट्या खेळत महाराजांनीं पार पाडली! दारावरच्या पहारेकऱ्यांनाहि त्यांच्या त्या शेवटच्या वेदना पाहवत नव्हत्या!

१७ ऑगस्टचा दिवस उजाडला. सकाळपासून मंडळींचे चेहरे खरोखरच अत्यंत चिंताक्रांत दिसत होते. कसं होईल? काय होईल? कसं होईल? काय होईल? एवढा 'जीव' सुखानं 'गेला' म्हणजे मिळवली. खानाचे लोक व खानहि आंत येऊन विचारत, 'कैसा है?' ही मंडळी रडवे चेहरे करून खुणेनेंच सांगत, 'आतां कसचं काय! कांहीं तासांचे सोबती!'

दुपार झाली. दुपारचे साडे तीन वाजले. मिठाईचे पेटारे महालांत आले. परमेश्वरा! आतां हे शेवटचेच पेटारे बरं! एवढ्या पुण्याईवर कांहीं जमव!

मंडळींची चुळबुळ चालली होती. महाराज निश्चेष्ट पडले होते. संभाजी राजे शेजारीं बसले होते. नऊ वर्षांचा पोरगा तो; पण अगदीं मोठ्या

माणसारखा गंभीर वागत होता. दोन पेटारे रिकामे होते. रघुनाथपंत, चिटणीस, निराजीपंत, तान्हाजी, येसाजी वगैरे सर्वांचीच नजर महालाच्या झरोक्याकडे आणि दरवाजाकडे टकमका भिरभिरत होती. भयंकर काळजी, भयंकर धास्ती ! छाताडं धडधडत होतीं. हिरोजी फर्जंद महाराजांच्या जवळ गेला. त्यानें छातीजवळ डोकें नेलें. महाराजांनीं हळू आवाजांत पुटपुट केली. आंतल्या आंत आपल्या उजव्या हातांतील सोन्याचं कडं व बोटांतील आंगठी काढून हिरोजीच्या हातीं दिली. मदारी मेहतर पाय चेपीत होता. सारं सारं चोख तयार होतं. सर्व सांगून झालेलं होतं. सर्व ठरलेलं होतं. दोन पेटारे पलंगाजवळ सरकले ! त्या छोट्या शंभू राजांनाहि सारं शिकवून ठेवलं होतं. सर्वांच्या नजरा चौफेर टकाकत होत्या. कोणी येत नाहीं ना ? कोणी पहात नाहीं ना ? जर कुणीं पाहिलं तर ?

नको नको ! जगदंबे, आई भवानी, आतां अंत पाहूं नको ! तिकडे महाराष्ट्र वाट पहातोय् ! तिकडे घरोघरचीं लेकरं-माणसं ह्या महादेवाची वाट पहात आहेत ! आईसाहेब वाट पहात आहेत ! ती माउली डोळ्यांत प्राण आणून बसली असेल--आतां सोडव. जाऊं दे !

महाराजांनीं मान वर करून पाहिलं. मंडळींनीं मानेनं खूण केली. महाराज झटकन् पांघरुणांतून बाहेर आले. संभाजी राजे एका पेटाऱ्यांत बेडकीसारखे पटकन् जाऊन बसले. महाराजहि पेटाऱ्यांत बसले. भयंकर दिव्य ! ! !

" जय भवानी ! "

पेटारे बंद झाले !

महाराज पलंगावरून उतरतांक्षणींच हिरोजी फर्जंद त्याच पांघरुणांत घुसला. आणि अंगावर पांघरूण घेऊन हळूहळू कण्हूं लागला ! हिरोजी दिसण्यांत हुबेहूब महाराजांसारखा दिसत असे. मदारी हिरोजीचे पूर्ववत् तितक्याच गंभीर चेहऱ्यानें पाय चेपीत राहिला.

पेटारे निघाले. सर्वांचीं छाताडं भीतीनं ताडताड उडत होतीं. दरवाजांतून पेटारे बाहेर पडूं लागले. पेटाऱ्यामागून पेटारे कर्रकर्र करीत चालले होते. " ठैरो ! " पोलादखानानें पेटारे थांबवले. सर्वांच्या काळजाचं पाणी पाणी झालं. अंगाला घाम सुटला. जिव्हा टाळ्याला चिकटल्या. आतां ?

पोलादखानानें एकदोन पेटारे तपासले आणि तो ओरडला, "जाने दोऽऽ!"

जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी, प्रतापगडची जगदंबा, पंढरीचा विठुराया, मोरगांवचा मोरया, शिंगणापूरचा महादेव, कोल्हापूरचा ज्योतिबा एकदम धावले! नवसाला एकदम पावले!! महाराज निसटले! महाराष्ट्राचं स्वातंत्र्य सुखरूप सहीसलामत औरंगजेबाच्या मगरमिठींतून निसटलं! कुलूप न फोडतां निसटलं! कुलपांतून निसटलं! किल्लींतून निसटलं!

* * *

आधार : सरकारकृत शिवाजी : पृ. १४७–१४९.
हाउस ऑफ शिवाजी : पृ. १६९–१७२.
{ शि. चि. प्र. ( जेधे शकावली ) पृ. २३–२४.
{ व जेधे करिना पृ. ४७.
सभासद : पृ. ५१–५२.
मराठी रियासत–२ पृ. १२९–१३०.

# १२ :



पेटारे गेले. दूर गेले. गोसाव्या-फकिरांसाठीं, दरबारच्या कोणा सरदारा-साठीं ज्या डाल्या होत्या, त्या तिकडे रवाना झाल्या. आजची ही शेवटची मिठाई. सुटल्याबद्दलची ! नेमके दोन पेटारे गांवाबाहेर नेमक्या ठरलेल्या जागीं रवाना झाले. महाराजांची कांहीं मंडळी तेथें अधीरतेनें वाट पहातच होती. त्यांनीं घोडे आणून तयार ठेवले होते. लांबून दोन पेटारे येत असलेले दिसूं लागतांच त्यांना केवढा आनंद झाला म्हणून सांगावं ! पेटारे तेथें येऊन उतरले. महाराज व संभाजी राजे बाहेर पडले. नवा प्रकाश, नवी हवा ! गेले चार दिवस-अगदीं एक तासापूर्वींपर्यंत अत्यवस्थ आजारी असलेले महाराज तडखडीत बरे झाले होते ! आतां प्रत्येक निमिष मोलाचं होतं. महाराज व संभाजी राजे ताबडतोब घोड्यावर बसले. इतर मंडळींचेहि घोडे होतेच. त्यांना टांच मारतांच ते भरधांव सुटले. पण दक्षिणेकडे नव्हे. उत्तरेकडे. ह्या दिशेला ! मथुरेकडे. कारण, लक्षांत आल्यानंतर औरंगजेब आपल्या तपासासाठीं फौजा पाठवील त्या नक्की दक्षिणेकडेच. त्या फौजा शोध-शोधून दमल्या म्हणजे सावकाश आपण दक्षिणेकडे जाऊं. तोंपर्यंत काशी, प्रयाग वगैरे यात्रा करून घेऊं, असा महाराजांचा बेत होता. मागें राहिलेल्या मंडळींना त्यांनीं मथुरेस येण्याबद्दल आधींच सूचना देऊन ठेवल्या होत्या. मथुरेंत मोरोपंत पिंगळ्यांचे मेव्हणे कृष्णाजी त्र्यंबक मथुरे हे राहत होते. काशीपंत व विसाजीपंत असे त्यांना आणखी भाऊ होते. महाराज मथुरेकडे दौडत गेले.

ह्या वेळीं सायंकाळची वेळ झाली होती. अंधार दाटत चालला होता. महिना श्रावणाचा होता.

इकडे महाराजांचे पेटारे गेल्यानंतर हिरोजी फर्जंद पलंगावर कण्हत पडला होता. मदारी त्याचे पाय चेपीत होता. भोंवतीं चार-पांच मंडळीच उरली होती. निराजीपंत, दत्ताजीपंत, राघो मित्र वगैरे लोक ह्या ना त्या निमित्तानें महाराजांच्या आधींच पसार झाले होते. उरलेल्या मंडळींच्या मुद्रा आतां मात्र खरोखरच काळजीनें व्यास झाल्या होत्या. महाराज गेले. अगदीं सुखरूप

मराठा ग्रंथ सं । म. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........ : ७७
क्रमांक ........................ नों: दि: ................



ठरल्या जागीं पोहोंचले असतील ना ? आतां मथुरेच्या वाटेवर असतील नाहीं ? दिवस हे असे पावसाळ्याचे. श्रावणसरी कोसळताहेत. रात्रीची वेळ. कसं होणार ?

मधून मधून पोलादखान वगैरे लोक आंत डोकावून जात होते. छातींत कसं चर्र होत होतं. हिरोजी मात्र सोन्याचं कडं व अंगठी असलेला हात मुद्दाम पांघरुणाच्या वर ठेवून कण्हत होता. बिचाऱ्या औरंगजेबाला शत्रु तरी काय इरसाल भेटले पहा ! सह्याद्रीच्या दऱ्यांत वावरणारे हे खेडवळ मावळे, औरंगजेबाच्या खास राजधानींत जाऊन त्याला बेमालूमपणें बनवीत होते.

सूर्य मावळला. काळवंडत चाललं. हिरोजीच्या-नव्हे चुकलोंच–महाराजांच्या पलंगापुढें सुतकी चेहरे करून बसलेल्या त्या चौघा–पांच जणांनीं एकमेकांना खुणावलं. महाराज तर आतां जगत नाहींत हें सगळ्यांना कळून चुकलं होतं. पोलादखानाचीहि खात्री झाली होती. चालले होते ते शेवटचे उपाय. हे चौघे-पांच जण उठले आणि तितक्याच गंभीर मुद्रेनें बाहेर पडले. जातांना त्यांनीं सांगितलं कीं, ‘ वैद्याकडं जाऊन औषध घेऊन येतों. महाराजांकडे जरा लक्ष ठेवा ! ’ पोलादखान म्हणाला, ‘ बरं ! ’

ही मंडळी जी पसार झाली ती पुन्हा कशाला येताहेत ! गेली ती गेलींच. आतां उरली फक्त दोन. हिरोजी ‘ महाराज ’ आणि मदारी मेहेतर. आतां ह्या दोघांना मात्र एकेक क्षण युगायुगासारखा जड जाऊं लागला. सगळे निघून गेले. बाहेर पांच हजार राक्षसांचा पहारा.

एक तास गेला. चटकन् हिरोजीनें मदारीला खूण केली. बाहेर पुरता अंधार नव्हता, पुरता उजेड नव्हता. महालांत दिवा मंद मंद होता. हिरोजी उठला आणि दोघांनींहि पलंगावरच्या लोडावर पांघरूण पांघरलं आणि बाहेर निघाले. केवढं कठीण कर्म हें ! पण न बिचकतां, बावरतां करीत होते. दारावरच्या पहारेकऱ्यांना व खानाला त्यांनीं हलक्या आवाजांत सांगितलं, ‘ अब्बीच डोळा लगा है महाराजकू ! तखलफि मत देव ! हम अभी वापस आयेंगे ! वो हमारे आदमी दवा लानेकू गये है, वो अबतक किंव नहीं आये, ते हम देखता हूं ! ’

‘ अच्छा अच्छा ! जाव ! ’

—आणि हे दोघेहि जण पार पसार झाले ! महाल रिकामा !

" होश की दवा करो! उनके सिरपर गुलाबपानी छिडको। और शिवाजी राजाको उनके मुकाम पर वापीस ले जाओ। दरबार खत्म होने तक इंतजारी मत करो!" औरंगजेब म्हणाला. तो अगदीं घाबरून गेला होता.

मामा, मावशी आणि मामी ह्यांचे शब्द त्याला आठवूं लागले होते. शक्य तितक्या लवकर शिवाजीला आपल्या पुढून घेऊन जाण्याचा त्यानें हुकूम केला.

गुलाबपाणी शिंपडून महाराजांना शुद्धीवर आणण्यांत आलें. ताबडतोब तामझाममधून रामसिंह त्यांना घेऊन मुक्कामावर आले. ह्या दिवशीं तारीख होती, १२ मे १६६६.

शिवाजी राजांना नेल्यावर औरंगजेबाचा जीव खालीं पडला. आतां पुन्हा कधींहि ह्याला आपल्यापुढें येऊं द्यायचं नाहीं, असें त्यानें ठरविलें. जें कांहीं करायचें तें परस्पर!

* * *

**आधार :** सभासद—पृ. ४८ ते ५०.
हाउस ऑफ शिवाजी : पृ. १६० ते १६२.
सरकारकृत शिवाजी : पृ. १४०–४१.
फॉरिन बायोग्राफीज् ऑफ शिवाजी :
मराठी रियासत : पृ. १२२ ते १२४.

महाराजांना मुक्कामावर नेण्यांत आलं. राजे रामसिंहाशिवाय मुखलीसखान वगैरे इतरहि कांहीं सरदार तेथें होते. महाराज फार बेचैन झालेले होते. चिटणीस, हिरोजी, निराजीपंत वगैरे मंडळींनीं महाराजांची ती अवस्था पाहून एकदम धास्तावून विचारलं, “ काय झालं ? महाराज–”

“ ह्याचं नांव दगाबाजी ! बादशहानें वचन दिलं एक आणि वागणूक मात्र दिली भलती ! वचनभंग ! ”

“ अपमान ! भर दरबारांत ! आमची सन्मानपूर्वक मुलाखत घेतील, आमचें म्हणणें ऐकून घेतील, दख्खनची सुभेदारी देतील, अशी आम्हांला वचनें देण्यांत आलीं होतीं ! पण ह्यांच्या शब्दांची किंमत मातीइतकी ! बादशहानें वचन देऊन आम्हांला फसविलें ! ” महाराज म्हणाले......

आणि औरंगजेबाच्या तिथें असलेल्या सरदारांनीं हे महाराजांचे शब्द किल्ल्यांत जाऊन त्याला सांगितलें. तेव्हां औरंगजेबच संतापला ! शिवाजी राजांनीं आमचा विश्वास गमावला आहे, सबब त्यांना पुन्हां दरबारास आणूं नये असें त्यानें रामसिंहास बोलावून फर्माविलें.

राजे रामसिंहाच्या डोक्यावर हा तापलेला धोंडाच जणुं चढला. ते महाराजांच्या मुक्कामावर आले व त्यांनी महाराजांस, तुमचा मुक्काम आतां येथून हलवून आग्र्याबाहेर जयपूर महाल म्हणून आमचाच एक महाल आहे तेथे ठेवण्याचा शहेनशाहचा हुकूम झाला आहे, असें सांगितलें. इथं काय अन् तिथं काय, महाराजांस सारखेंच होतें. प्रश्न कोणत्या मुक्कामावर राहायचं हा नव्हताच.

महाराजांचा मुक्काम हलला. शहराबाहेर एका बाजूला जयपूर महाल होता. महाराजांच्या मंडळींसह त्यांना तेथे नेण्यांत आलें. हा महालहि सुंदर, भव्य व बळकट होता.

दरबारांतील अपमानामुळें महाराजांच्या डोक्यांत एक भयंकर संशय निर्माण झाला होता व तो अगदीं हजार टक्के बरोबर होता. हा कपटी बादशहा अखेर आपला गळा पकडणार कीं काय ?—आणि तेंच झालें.

महाराजांच्या हवेलीभोंवतीं पठाण, अरब, मोंगल वगैरे घोडेस्वार व हशमांचा गराडा पडला. महालाच्या जाळीदार संगमरवरी भव्य झरोक्यांतून हा वेढा महाराजांच्या मंडळींनीं पाहिला! त्यांची छातीच दडपली!

" महाराज-! " त्यांनीं तो औरंगजेबाचा कावा महाराजांस दाखवला. महाराजांनीं लगबगीनें उठून पाहिलें.

" जगदंब! जगदंब! " महाराजांचें मस्तक थरारलें. डोळे वटारून ते पाहूं लागले. महालाच्या चौगीर्द हत्यारबंद हशमांचा गराडा पडला होता. एक धिप्पाड उग्र अंमलदार करड्या आवाजांत हुकूम सोडून नागव्या तलवारीचे व भाल्याचे पहारे उभे करीत होता. हा होता आग्रा शहराचा कोतवाल पोलादखान! महाराजांचें काळीज भयानें ताड ताड उडूं लागलें. जाळ्यांत सांपडलेल्या सिंहासारखी त्यांची उलघाल उडाली. कैद! भयंकर जबरदस्त कैद! सारें भयानक भवितव्य त्यांना दिसूं लागलें. साऱ्या आशा-आकांक्षांचा चक्काचूर उडाला. आतां मरण! झिजून पिचून मरण! औरंगजेबाची मगरमिठी पडली! आतां मृत्यूला सुद्धां ही मगरमिठी झटकन् सोडवतां येणार नाहीं! कुठं येऊन पडलों! हें काय भयंकर झालं! आतां माझा महाराष्ट्र मला दिसणार नाहीं! माझा सह्याद्रि! माझी पवना, भीमा, इंद्रायणी-माझी कृष्णा गोदा! माझी तुळजाभवानी, माझा खंडोबा, पांडुरंग! माझा देहूचा मायबाप, माझा चिंचवडचा मोरया आतां दिसणार नाहीं! टाळ-मृदंगांचा कल्लोळ, शाहीर-गोंधळ्यांची आरोळी आतां ऐकूं येणार नाहीं! माझा कोंडाणा-पुरंधर, माझा तोरणा-राजगड आतां मला दिसणार नाहीं! माझी आई-! आई-आई! मला आतां पुन्हा-मोरोपंत, सांभाळा! माझी आई-! तुला टाकून, ओलांडून आलो! आतां जिवाजिवांच्या भेटी तुटल्या! पंत सांभाळा-!

* * *

—आणि राजगडावर .........?

आईसाहेब जगदंबेच्या पायावर डोकं ठेवून विनवीत होत्या, " आई, आतां बाळाला आण माझ्या! केव्हां येईल? तूं पाठराखणी गेली आहेस, मला चिंता नाहीं. पण लौकर आण! आतां मी म्हातारी झालें—! "

मोरोपंत सतत पाठीशीं उभे. सावलीसारखे. ते अगदीं आईसाहेबांचेहि आई झाले होते.

महाराज कैदेंत पडले आहेत, ही बातमी अद्याप आईसाहेबांस समजलेली नव्हती! राजगडावर पोहोंचलीच नव्हती.

* * *

—आणि आग्र्यांत.........

महाराजांनीं संभाजीराजांना हृदयाशीं घट्ट धरून दाटलेल्या अंतःकरणानें शोक केला. शेषाहूनहि खंबीरपणानं वागणाऱ्या महाराजांची मनःस्थिति अशी झाली. भोंवतींच्या मंडळींच्या मनाची गत काय सांगावी? सर्वांनींच काळजी करावी. सर्वांनीच एकमेकांना धीर द्यावा. आतां सर्वांना आधार तुळजाभवानीचा!

सक्त कैद सुरू झाली. महाराज कैद झाल्याची बातमी आग्र्यांत, दिल्लींत पसरली. अष्टदिशांस पसरत चालली.

रामसिंह भेटायला आले. ते काय बोलणार? त्यांना अत्यंत वाईट वाटत होतं. गुलामगिरी पत्करली कीं सज्जनपणा आणि सद्भाव हाहि वापरतां येत नाहीं. एकेक दिवस उलटूं लागला.

महाराज अत्यंत गंभीर बनले. तास तास शून्य नजरेनें विचार करीत बसत. आतां ह्या पोलादी मिठींतून सुटायचं कसं? महाराजांचे वकील म्हणून रघुनाथपंत कोरडे हे औरंगजेबाच्या दरबारांत अजून जाऊं येऊं शकत होते. त्यांना दरबार मना नव्हता. महाराजांनीं पंतांबरोबर बोलून औरंगजेबाकडे अर्ज करण्याचें ठरविलें. पंत फार तळमळीचे होते. हुशारहि तसेच. त्यांनीं महाराजांस सल्ला दिला कीं, 'औरंगजेबास विजापूर व गोवळकोंडा जिंकण्याची फार फार इच्छा आहे, तर 'तीं राज्यें जिंकून देतो, मला फौज व पैसा देऊन दक्षिणेंत पाठवा', असा औरंगजेबास अर्ज करावा. महाराज म्हणाले, "ठीक आहे."

लगेच रघुनाथपंत किल्ल्यांत गेले. त्यांनीं अर्जबेगीच्या मार्फत बादशहास अर्ज पेश केला. औरंगजेबानें अर्ज ऐकला!!

पण थोड्या दिवसांनंतर महाराजांच्या अर्जासकट महाराजांचाच निकाल लावण्याचा भयंकर बेत औरंगजेब आंखीत होता.

एक भयंकर बातमी एके दिवशीं राजे रामसिंहांना समजली. त्यांच्या काळजाचं पाणी पाणी झालं. बातमी भयंकर होती.

ता. १६ मे १६६६ रोजीं किल्ल्यांत खास सरदारांची मजलीस भरली होती. अगदीं मोजकेच्च लोक त्यांत होते. जाफरखान वजीर, शहाजादी झेबुन्निसा, आग्र्यांतील इमाम, मौलवी व इतर कांहीं सरदार ह्यांत होते. पण त्यांत रजपूत मात्र एकहि नव्हता. औरंगजेबानें ह्या सर्वांना सल्ला विचारला कीं, हा शिवाजी माझ्या हातांत सांपडला आहे, मीं त्याचं काय करावं? सर्वांनींच सल्ला दिला कीं, त्याला मुसलमान करावं! पण त्यांतल्या त्यांत दोन सल्ले जरा वेगळे होते. वझीर जाफरखानानें म्हटलं कीं, शिवाजीला मुसलमान करावं, पण तो होत नसल्यास हट्ट किंवा जबरदस्ती न करतां त्याला काबूल कंदाहारकडे पठाणांशीं लढण्याकरितां रवाना करावें. बरा जोरदार आदमी हातीं सांपडला. खैबरखिंडीत पठाणांशीं झुंजतां झुंजतां मिर्झा राजां-सारखे वीरहि थकले. आतां ह्याला तिकडेच्च गुंतवावें. एकदां तिकडे अडकला कीं, त्याला प्राणपणानें पठाणांशीं लढावेंच लागेल. आपलें दुहेरी काम होईल पठाणांना रोखूनहि धरतां येईल, आणि शिवाजीलाहि अडकवून टाकतां येईल. शिवाजीला कैदेंत कुजत टाकण्यापेक्षां किंवा ठार मारण्यापेक्षां हाच्च उत्तम रस्ता आहे!

औरंगजेबानें सर्वांचेंच म्हणणें ऐकून घेतलें. अनेकांनीं सांगितलं कीं, जर शिवाजी धर्म बदलावयास तयार नसेल तर त्याची गर्दन उडवा.

आतां औरंगजेबानें झेबुन्निसेकडे नजर वळविली, "क्यॅव शहेजादी-साहिबा? आपकी सलाह?

"आब्बाजान! इस दिलेर मरेठेको कत्ल न करो! हो सके उसे मुसलमाँ बनाओ! गर यह मुमकीन नहीं तो उसे मुघल सल्तनतकी तरक्की और हिफाजतके काममें बखूबी उल्झाओ!" शहेजादीनें समंजस सल्ला दिला.

ह्या मजलीसमध्यें घडलं असं. पण औरंगजेबानें शेवटीं ठरविलं वेगळंच. त्यानें साफ सांगितलं कीं, शिवाजीला मी ठार करणार आहें!

—ही ती भयंकर बातमी! राजे रामसिंहांना आश्चर्य वाटलं नाहींच. भीति वाटली, दुःख वाटलं. औरंगजेबाचा निर्णय! आतां यमपुरीच्या यातनाहि फिक्या पडतील! महाराज मरणाच्या मुखांत जाणार!

राजे रामसिंहांचं काळीज विरघळलं. आपल्या वडिलांच्या शब्दाला हा राक्षस काळोखी फासणार! सुरक्षिततेचं वचन देऊन ही दगाबाजी! राजांना राहवेना. त्यांनीं लगेच औरंगजेबाला अर्ज पाठविला कीं, ' आपण शिवाजी-राजांना ठार मारायचं ठरवलं आहे असं समजतं. आपण सर्वसत्ताधीश आहांत. आम्ही गुलाम आहों. आपल्या इच्छेविरुद्ध कोण काय करूं शकेल? परंतु शिवाजीराजांना ठार मारण्यापूर्वीं आपण मला ठार मारा! मी व माझे वडील मिर्झा राजे ह्यांनीं शिवाजीराजांना जपण्याचं पूर्वींच वचन दिलं आहे. कृपा करून प्रथम मला ठार मारा!'

हा अर्ज ऐकतांच औरंगजेब किंचित् चमकला. ही शिवाजीला ठार करणार असल्याची बातमी सर्वत्र पसरली होती. थिवेनो नांवाच्या फरांसीस मुशाफिरालाहि ही समजली तिथं इतर जनतेचं काय! लोक हळहळले. अशा स्थितींत जर शिवाजीला ठार केलं तर हे हरामजादे रजपूत कदाचित् बिघडतील, ही भीति औरंगजेबाला वाटूं लागली. आणि त्यानें हा बेत एकदम अंमलांत आणण्याचें तहकूब केलें. पण रद्द मात्र केला नाहीं! त्याच्या मनां-तल्या आंतल्या कप्प्यांत ही विषाची कढई कढत होतीच.

औरंगजेबाची मामी, म्हणजे शाएस्ताखानाची बायको, हिचा फार हट्ट होता कीं, शिवाजीला ठारच मारावा. शिवाय इतर अनेक भाजलेल्या मंडळींची ही मागणी होती.

आपल्या एका अर्जाचा निकाल उडाल्यावर महाराजांनीं रघुनाथपंतांमार्फत औरंगजेबाकडे एक विलक्षणच अर्ज पाठविला. महाराजांनीं कळविलें कीं, "मला एकवार बादशहांची प्रत्यक्ष भेट घ्यावयाची इच्छा आहे! प्रत्यक्ष मुलाखतींत बादशहांच्या अत्यंत फायद्याच्या खूप गोष्टी सांगायच्या आहेत!"

—अफज़लखानाचा केवढा प्रचंड फायदा झाला, हें औरंगजेबाला माहीत असल्यामुळें औरंगजेबानें हा अर्ज ह्या कानानें ऐकला व त्या कानानें सोडून दिला!

आपल्या सुटकेसाठीं फट शोधायचा महाराज रात्रंदिवस प्रयत्न करीत होते. त्यांनीं आणखी एक प्रयत्न करून पाहिला. बादशहाचा वजीर जाफरखान यालाच मुलाखतीला बोलावून त्याच्याशीं वाटाघाटी कराव्यांत व त्याच्या-मार्फत औरंगजेबाशीं बोलणीं लावावींत, असें त्यांच्या मनांत आलें. त्यांनीं

जाफरखानास तसें कळविलें. आणि विशेष म्हणजे त्यानेंहि मुलाखतीचें आश्वासन दिलें. पण व्हायचा तो घोटाळा झालाच ! ह्या जाफरखानाची बायको औरंगजेबाची मावशी होती ! शाएस्ताखानावरच्या हल्ल्याच्या वेळीं तिनें महाराजांचा प्रताप प्रत्यक्ष पाहिला होता. शिवाजी म्हटलं कीं ती भीतीनें तीन हात उडायची ! आतां तिचा नवराच शिवाजीला भेटावयाला चालला. तिला तें कळलं ! काय म्हणावं ह्या नवऱ्याला ! शिवाजीच्या भुताटकीबद्दल गेलीं तीन वर्षं ह्यांच्या कानींकपाळीं ओरडते आहे तरी ह्यांच्या डोक्यांत शिरेना कसें ? त्या सैतानाला प्रत्यक्ष भेटायची ही नसती आक्काबाई ह्यांना कुठून आठवली ? तिनें नवऱ्याचे चांगलेच कान उपटले. पण मीं फार वेळ अजीबात थांबणार नाहीं असें जाफरखानानें वचन देऊन तिची परवानगी कशी तरी काढली.

अखेर कबूल केल्याप्रमाणें जाफरखान भीत भीत मुलाखतीला आला. महाराज फार आदरानें वागले. महाराज म्हणाले कीं, बादशहांचें मन वळवून आपण मला दक्षिणेंत परत पाठवा ! शाही फौज व पैसा माझ्याबरोबर द्या ! मी दक्षिणेंत बादशहांसाठीं खूप मोठें राज्य जिंकून देतों.

पण तेवढ्यांत जाफरखानानें म्हटलें, 'ठीक आहे, तुमचें म्हणणें मी बादशहांच्या कानावर घालतों !' अन् लगेच तो निघून गेला !--कारण त्याला बायकोनें बजावलें होतें !

जाफरखानानें कांहींहि केलं नाहीं. हाहि प्रयत्न वायां गेला. दिवसेंदिवस महाराजांच्या महालाभोवतीं बंदोबस्त कडक होऊं लागला. महालावर तोफा रोखून ठेवण्यांत आल्या !

आतां सुटकेच्या आशेचा किंचितसा किरणहि दिसेनासा झाला.

* * *

**आधार :** सभासद : पृ. ५०-५१.
मराठी रियासत-२ : पृ. १२५ ते १२७.
हाउस ऑफ शिवाजी : पृ. १६२-१६९.
सरकारकृत शिवाजी : पृ. १४२-१४७.

# ११ : : सुटका

महाराजांना चिंता जाळूं लागली. अहोरात्र सुटकेसाठीं ते विचार करीत होते. पाहुण्याला दगाबाजीनें कैद करायचं आणि त्याला ठार कसं करायचं अन् केव्हां करायचं याचे मनसुबे आखायचे ही तर औरंगजेबाची संस्कृति होती ! आश्चर्य त्यांत कांहींच नव्हतें. त्याला दोष देण्यांत शब्द खर्चायची आतां मनस्थितीहि राहिली नव्हती. ते चिंता करीत होते कार्याची आणि त्यासाठीं सुटकेची. सनदशीर मार्ग सर्व संपले होते. आतां दुसराच कांहीं तरी उपाय शोधला पाहिजे, हें त्यांना स्पष्ट दिसूं लागलें होतें.

अहोरात्र एकच चिंता. महालांत शतपावली करतांना, जेवतांना, पलंगावर पडल्या पडल्या, इतकंच काय, पण प्रत्येक व्यवहार करतांना महाराज चिंताक्रांत होते. झोंप लागत नव्हती. तासन्तास शून्यांत कुठेंतरी नजर लावून महाराज बसत. दुसरा विचार नाहीं. सुटका ! ह्या पिंजऱ्यांतून सुटका कशी ? शुक्राचार्य आणि बृहस्पति यांच्याहि मेंदूला झिणझिण्या आल्या असत्या असं हें संकट. आतां ह्यांतून सुटका कशी ?

दक्षिणेंत मिर्झा राजांना हें समजलं कीं, दगाबाजी करून औरंगजेबानें शिवाजी राजांना कैदेंत टाकलें. त्यांना धक्काच बसला. पण त्यांच्या हातांत आतां काय होतं ? कांहींच नाहीं ! आपल्या शब्दाला बळी पडून एक महान् वंदनीय पुरुष आग्र्याच्या खाटिकखान्यांत कोंडला गेला याचं त्यांना मनस्वी दुःख झालं. त्यांनीं औरंगजेबाला मोठ्या विनवणीनें लिहिलें कीं, 'शिवाजीला कैदेंत ठेवून किंवा ठार मारून काहींहि फायदा होणार नाहीं. शिवाजीनें दक्षिणेंतून निघण्यापूर्वीं आपल्या राज्याची इतकी उत्कृष्ट व्यवस्था करून ठेवली आहे कीं, शिवाजीला ठार मारून शिवाजी नाहींसा होईल, पण त्याचें राज्य मोडणें अशक्य. तुम्हीं शिवाजीची मर्जी सांभाळूनच आपला दक्षिणेंतील डाव सुधारावा. मुख्य गोष्ट म्हणजे औरंगजेब बादशहा स्वतःचा शब्द पवित्र समजून योग्य रीतीनें पाळतात, ही गोष्ट एकदां जगाला समजूं द्या. शिवाजीची त्वरित सुटका करा !'

पालथ्या घड्यावर पाणी ! मिर्झा राजांच्या ह्या पत्राचा औरंगजेबावर काडीइतकाहि परिणाम झाला नाहीं.

जाफरखानास तसें कळविलें. आणि विशेष म्हणजे त्यानेंहि मुलाखतीचें आश्वासन दिलें. पण व्हायचा तो घोटाळा झालाच ! ह्या जाफरखानाची बायको औरंगजेबाची मावशी होती ! शाएस्ताखानावरच्या हल्ल्याच्या वेळीं तिनें महाराजांचा प्रताप प्रत्यक्ष पाहिला होता. शिवाजी म्हटलं कीं ती भीतीनें तीन हात उडायची ! आतां तिचा नवराच शिवाजीला भेटावयाला चालला. तिला तें कळलं ! काय म्हणावं ह्या नवऱ्याला ! शिवाजीच्या भुताटकीबद्दल गेलीं तीन वर्षं ह्यांच्या कानींकपाळीं ओरडते आहे तरी ह्यांच्या डोक्यांत शिरेना कसें ? त्या सैतानाला प्रत्यक्ष भेटायची ही नसती आफ्काबाई ह्यांना कुठून आठवली ? तिनें नवऱ्याचे चांगलेच कान उपटले. पण मीं फार वेळ अजीबात थांबणार नाहीं असें जाफरखानानें वचन देऊन तिची परवानगी कशी तरी काढली.

अखेर कबूल केल्याप्रमाणें जाफरखान भीत भीत मुलाखतीला आला. महाराज फार आदरानें वागले. महाराज म्हणाले कीं, बादशहांचें मन वळवून आपण मला दक्षिणेंत परत पाठवा ! शाही फौज व पैसा माझ्याबरोबर द्या ! मी दक्षिणेंत बादशहांसाठीं खूप मोठें राज्य जिंकून देतों.

पण तेवढ्यांत जाफरखानानें म्हटलें, 'ठीक आहे, तुमचें म्हणणें मी बादशहांच्या कानावर घालतों !' अन् लगेच तो निघून गेला !--कारण त्याला बायकोनें बजावलें होतें !

जाफरखानानें कांहींहि केलं नाहीं. हाहि प्रयत्न वायां गेला. दिवसेंदिवस महाराजांच्या महालाभोवतीं बंदोबस्त कडक होऊं लागला. महालावर तोफा रोखून ठेवण्यांत आल्या !

आतां सुटकेच्या आशेचा किंचितसा किरणहि दिसेनासा झाला.

★ ★ ★

**आधार :** सभासद : पृ. ५०–५१.
मराठी रियासत–२ : पृ. १२५ ते १२७.
हाउस ऑफ शिवाजी : पृ. १६२–१६९.
सरकारकृत शिवाजी : पृ. १४२–१४७.

# ११ : : सुटका

महाराजांना चिंता जाळूं लागली. अहोरात्र सुटकेसाठीं ते विचार करीत होते. पाहुण्याला दगाबाजीनें कैद करायचं आणि त्याला ठार कसं कराचयं अन् केव्हां करायचं याचे मनसुबे आखायचे ही तर औरंगजेबाची संस्कृति होती ! आश्चर्य त्यांत कांहींच नव्हतें. त्याला दोष देण्यांत शब्द खर्चायची आतां मनस्थितीहि राहिली नव्हती. ते चिंता करीत होते कार्याची आणि त्यासाठीं सुटकेची. सनदशीर मार्ग सर्व संपले होते. आतां दुसराच कांहीं तरी उपाय शोधला पाहिजे, हें त्यांना स्पष्ट दिसूं लागलें होतें.

अहोरात्र एकच चिंता. महालांत शतपावली करतांना, जेवतांना, पलंगावर पडल्या पडल्या, इतकंच काय, पण प्रत्येक व्यवहार करतांना महाराज चिंताक्रांत होते. झोंप लागत नव्हती. तासन्तास शून्यांत कुठेंतरी नजर लावून महाराज बसत. दुसरा विचार नाहीं. सुटका ! ह्या पिंजऱ्यांतून सुटका कशी ? शुक्राचार्य आणि बृहस्पति यांच्याहि मेंदूला झिणझिण्या आल्या असत्या असं हें संकट. आतां ह्यांतून सुटका कशी ?

दक्षिणेंत मिर्झा राजांना हें समजलं कीं, दगाबाजी करून औरंगजेबानें शिवाजी राजांना कैदेंत टाकलें. त्यांना धक्काच बसला. पण त्यांच्या हातांत आतां काय होतं ? कांहींच नाहीं ! आपल्या शब्दाला बळी पडून एक महान् वंदनीय पुरुष आग्र्याच्या खाटिकखान्यांत कोंडला गेला याचं त्यांना मनस्वी दुःख झालं. त्यांनीं औरंगजेबाला मोठ्या विनवणीनें लिहिलें कीं, ' शिवाजीला कैदेंत ठेवून किंवा ठार मारून काहींहि फायदा होणार नाहीं. शिवाजीनें दक्षिणेंतून निघण्यापूर्वीं आपल्या राज्याची इतकी उत्कृष्ट व्यवस्था करून ठेवली आहे कीं, शिवाजीला ठार मारून शिवाजी नाहींसा होईल, पण त्याचें राज्य मोडणें अशक्य. तुम्हीं शिवाजीची मर्जी सांभाळूनच आपला दक्षिणेंतील डाव सुधारावा. मुख्य गोष्ट म्हणजे औरंगजेब बादशहा स्वतःचा शब्द पवित्र समजून योग्य रीतीनें पाळतात, ही गोष्ट एकदां जगाला समजूं द्या. शिवाजीची त्वरित सुटका करा ! '

पालथ्या घड्यावर पाणी ! मिर्झा राजांच्या ह्या पत्राचा औरंगजेबावर काडीइतकाहि परिणाम झाला नाहीं.

मिर्झा राजांनीं आपले चिरंजीव राजे रामसिंह ह्यांना विशेष कसोशीनें व तळमळीनें लिहिलें कीं, कसेंहि करून शिवाजी राजांस अपाय न होतां ते सुखरूपपणें परत येतील, अशी खटपट करा. रामसिंह काय करणार ? ते तर गुलाम. महाराजांच्या भोंवती पांच हजार पोलादखानी फौजेचा गराडा पडलेला होता. त्यांचं औरंगजेबापाशीं काडीइतकंहि वजन नव्हतं. कोणाचंच नव्हतं. फक्त यमदूतांचं मात्र होतं !

महाराज अटकेंत पडले ही बातमी महाराष्ट्रांत येऊन थडकली. गांवागांवांत आणि किल्ल्याठाण्यांवर ही दुःखाची आणि चिंतेची बातमी पोहोंचली. सर्वत्र काळवंडलेले दुःखी चेहरे दिसूं लागले. आतां कसें होणार ? आपले महाराज गेले, या सैतानानं कोंडून धरले. आतां पुन्हां कधीं दिसतील ? उभा महाराष्ट्र शोकमग्न झाला. साऱ्यांचं लक्ष उत्तर दिशेला खिळलं. त्या दिशेला पांखरूं ओरडलं तरी कान टवकारले जात होते. आमचा राजा असेल कसा ? आमचा राजा सुटेल कसा ?

आणि राजगडच्या राजवाड्यांत ही बातमी धडकली ! आईसाहेबांना हें समजलं ! आणि त्या गाईनें हंबरडा फोडला. मान लटलटूं लागली, ओठ थरथरूं लागले; डोळ्यांतून कृष्णा-कोयना घळघळूं लागल्या. म्हातारी मटकन् बसलीच. तिनें अंबाभवानीच्या पायांना मिठी मारली. आकान्त मांडला. “ माझा मुलगा दे ! तूं नेलास ; तूं आणून दे ! सांग, मी आतां काय करूं ? राक्षसाच्या हातीं माझं लेकरूं सांपडलं. तूं सोडवून आण ! सांग केव्हां माझ्या ओटींत त्याला आणून घालणार ? सोडणार नाहीं आतां पाय तुझे ! अन्न घेणार नाहीं आतां ! ”

ढसढसा रडून आईसाहेबांनीं निधान मांडलें. स्वतःचं दुःख गिळून मोरोपंत आईसाहेबांची समजूत घालायचा प्रयत्न करीत तर त्यांचेच डोळे त्यांना दगा देत. ते फार जपत होते. आतां त्यांनीं आईसाहेबांची पाठ सावलीसारखी धरली.

आईसाहेबांनीं अन्न टाकलें ! केवळ दूध आणि निराहार अळेंबळें घेऊं लागल्या. त्या खंगत चालल्या.

* * *

— आणि आग्र्याच्या कैदेंत महाराज हनुवटीखालीं मूठ धरून गंभीर मुद्रेनें विचार करीत होते. भोंवतीची मंडळी वेडीपिशी झाली होती.

मेच्या पहिल्या आठवड्यांत महाराज आग्र्यांत आले. सारा प्रकार दुसऱ्या आठवड्यांत घडला. आणि आतां जूनचा महिनाहि संपून गेला. आणि रोज अजूनहि पोलादखानाचे पहारे जास्त जास्तच कडक होत होते.

आणि एक दिवस एकाग्र चित्तानें विचार करीत बसलेल्या महाराजांच्या अत्यंत गंभीर मुद्रेवर एकदम, अगदीं आकस्मिक, अगदीं न कळत स्मिताची छटा उमटली. उमटून गेली. महाराजांच्या डोक्यांत कांहीं तरी विलक्षण विचार उमटला. विचारांच्या मोत्यांचीं शिंपलीं अहोरात्र समुद्राच्या तळाशीं बुड्या मारून महाराजांनीं अखेर बाहेर काढलीं असावींत असें भासूं लागलें.

" जगदंब ! जगदंब ! " महाराजांनीं नेत्र मिटले.

भोंवतींच्या मंडळींनीं अत्यंत उत्सुकतेनें भिवया उंचावल्या. त्यांच्या मनांतून आनंदाची एक लहर उगीचच आशेनें गहिंवरून गेली.

पोलादखान, मुखलीसखान, रामसिंह व बादशहाचे इतर कांहीं कानाळू लोक मधून अधून उगीचच महाराजांकडे येऊन बसून जात असत. यांत खऱ्या मायेचा — दुबळा असेना का — फक्त रामसिंह होता. बाकीचे सगळे एकजात चोर ! आतांपर्यंत महाराज उगीच इकडच्या तिकडच्या गोष्टी त्यांच्याशीं बोलत. हे लोक कोण आहेत आणि आपला प्रत्येक शब्द औरंगजेबापाशीं कुठून कसा पोहोंचतो, हें महाराजांनीं पक्कें ओळखलें होतें. आतां मात्र त्यांनीं ह्या रिकामटेकड्या दरबारी टोळभैरवांना हळूंहळूं बादशहाबद्दल प्रेम, निष्ठा, स्तुति, आदर, श्रद्धा इत्यादि इत्यादि राखीव सद्गुणांची चंची सोडून चिमुट चिमुट तंबाखू द्यायला सुरुवात केली. 'आपण आतां कायमचेच आग्र्यास राहणार ! बादशहांच्या शब्दाबाहेर मी नाहीं. त्यांच्याशिवाय मला आतां दुसरा आधारच नाहीं. बादशहा सांगतील तसें वागण्यास आपण तयार आहोंत. दक्षिणेंतील बायका माणसेंहि इकडे घेऊन यावीं असा माझा विचार आहे ! ..............'

हे विचार रोज चढत्या वाढत्या प्रमाणांत अगदीं तंबाखूसारखेच चोळून चोळून ह्या लोकांपुढें महाराज बोलूं लागले. सरदारांना वाटलं कीं, शिवाजी नरमत चालला, मऊ होत चालला. हें आंबट ढाण कैरीचं लोणचं बादशाही मसाल्यामुळें मुरत चाललं ! औरंगजेबाच्याहि कानांवर महाराजांचा हा पालट रोज जाऊं लागला.

भोंवतीची मंडळी समजून चुकली ! पण त्यांच्या वागण्यांत बोलण्यांत आणि दिसण्यांत पूर्वीचाच भोळाभाबडा भाव कायम होता.

आणि एक दिवस रघुनाथपंतांच्या मार्फत महाराजांनीं एक विचित्रच अर्ज बादशहाकडे रवाना केला. 'माझ्याबरोबर मीं आणलेली फौज आहे. त्या फौजेची आतां येथें कांहींच गरज नाहीं. ह्या लोकांना इकडची हवाहि मानवत नाहीं. मी केवळ बादशहांच्या हुकुमांत राहणार आहें. ही फौज मला आतां येथें नको. ती परत दक्षिणेंत पाठवून द्यावी असा माझा विचार निश्चित झाला आहे. तरी बादशहांनीं मेहेरबानी करून परवानगी द्यावी.'—

"मंजूर. बिल्कुल मंजूर है।"

औरंगजेबानें हा मात्र अर्ज एकदम मंजूर केला ! बरी ब्याद जाते आहे, असें वाटून त्यानें मंजुरी दिली. फौजेची थोडी तरी धास्ती होती. आतां काम आटोपशीर झालं !

महाराजांनीं आपल्या कडकडीत निष्ठेच्या त्या कडकडीत फौजेला तान्हाजी, त्र्यंबकपंत, हिरोजी, चिटणीस वगैरे लोकांमार्फत दक्षिणेंत निघून जाण्याचा हुकूम दिला. त्या मंडळींना हें कससंच वाटलं. महाराजांना टाकून रिकामेंच निघून जायचें ? तिकडे लोक विचारतील, महाराज कुठें आहेत ? काय सांगायचं त्यांना ? आईसाहेबांच्या पुढें रिकामं जायचं ?

पण तान्हाजी, पंत वगैरे मंडळींनी डाळ मिचकावले. मुकाट फौज टोळ्या-टोळ्यांनीं दख्खनच्या मार्गाला लागली.

जुलैचा महिना ऐन मध्यावर आला. पावसाच्या सरीवर सरी सरसरू लागल्या. यमुना भरली. सरदार व पोलादखान वगैरे रोज महाराजांच्या महालांत डोकावून जातच असत. पावसाळा सुरू झाला होता. तरी पहारा ढिला पडलेला नव्हता. महाराजांची फौज निघून गेलेली होती. तरी तोफा आणि पांच हजार हशम महालाभोंवती चोवीस तास उभेच होते.

आणि एक दिवस महाराज खोकूं लागले ! प्रकृति बिघडली ! किरकोळ ! फार नाहीं ! येणाऱ्या मंडळींना महाराजांनीं आपलं किरकोळ दुखणं जरूर तेवढं कण्हून, खोकून दाखविलं ! त्यांनीं चौकशी केली, "तबियत ठीक नहीं ?"

"कुछ कुछ !"

"आराम करो !"

वास्तविक महाराजांना कांऽऽहीं झालेलं नव्हतं! राजगडच्या बालेकिल्ल्या-सारखीच त्यांची तब्येत ठणठणीत होती. पण हे सगळे शिंपल्यांतले मोती आतां एक एक बाहेर पडत होते. रामसिंह आले. चौकशी करून गेले. 'कांहीं औषध वगैरे?'–'छे. छे. औषध कशाला? किरकोळ दुखणं! आपोआप होईल बरं!'

बादशहाच्या कानांवर महाराजांचं पडसं, खोकला गेला.

दोन दिवस उलटले. किंचित् दुखणं जास्तच झालं!

चार दिवस उलटले. दुखणं वाढतच चाललं!

भोंवतीची मंडळी मनांतल्या मनांत फिदी फिदी हंसत होती. पण चेहऱ्या-वर मात्र महाराजांच्यापेक्षां दुखण्याच्या कळा ह्यांच्याच जास्त! महा इब्लिस होते एक एक जण.

खरोखर खोटं आजारी पडणं ही सुद्धां एक कलाच आहे! साधते त्यालाच साधते!

महाराजांच्या दुखण्याची वार्ता पोलादखानाच्या फौजेंत पसरली. रामसिंह अन् इतर कोणीहि आलं कीं महाराज काळजीपूर्वक कण्हत! अन् बाकीचे आठवण ठेवून आपले चेहरे गंभीर करीत!

औषध सुरू झालें! औषधाच्या कुप्या, मात्रा, सुंठी, मोरावळे गोळा होऊं लागले. ह्यांपैकीं औषधाशिवाय बाकीचे पदार्थ पोटांत जाऊं लागले! दुखणें वाढतच चाललें. औरंगजेबानें हकीम, वैद्य, औषधी वगैरे बाबतींत मात्र रामसिंहांना मोकळीक दिली.

वैद्य हकीम रोज प्रकृति तपासून जाऊं लागले. पण कोणालाच कळेना कीं शिवाजी राजांना कोणता विकार झाला आहे? विकार कळेना, औषध तरी काणच द्यायचं? मोठ्यांचीं दुखणींहि मोठींच!

महाराज जरा आजारी आहेत अशी बातमी गांवांत पसरली; त्यांना आग्र्याची हवा सोसवत नाव्हती.

महाराजांना इतकं बरं नव्हतं तरी जेवणखाण व्यवस्थित होतं! महालांत चार पावलं कशीबशी ते येरझाराहि करीत होते. पोलादखान व त्याचे दुय्यम अधिकारी अधूनमधून आंत डोकावून जात.

दुखणें सारखें वाढतच चाललें. अगदीं उतार नाहीं. काय उपाय करावा हें हकीम वैद्यांना कळेना. शंभर औषधं बदलून पाहिलीं. पण औषधागणिक दुखणं वाढतच होतं. परंतु हकीम वैद्यांच्या बाबतींत मात्र महाराजांची तक्रार नव्हती.

जुलैचा तिसरा आठवडा सुरू झाला. महाराजांनीं अंथरूण धरलें. आतां आंतल्या आंत हिंडणें-फिरणेंहि थांबलें. भोंवतीची मंडळी चिंतेनें डोक्याला हात लावून बसूं लागली. दक्षतेनें शुश्रुषा सुरू झाली. मदारी मेहतर पाय चेपूं लागला.

महाराजांचीच मंडळी एकदमच मधून औषध आणण्याकरितां किंवा घाबऱ्या झालेल्या महाराजांना तांतडीनें पाठविण्यासाठीं वैद्य हकीमांकडे धावूं लागली.

ओकाऱ्या, खोकला, कण्हणें, बरळणें फारच वाढलें, रात्र रात्र झोंप लागेनाशी झाली.

— मुळांत झालं नव्हतं कांहींहि. डावी पापणसुद्धां फडफडत नव्हती !

महाराजांच्या गंभीर दुखण्याची वार्ता सर्वत्र झपाट्यानें पसरत होती. कोणाला कांहींच वाटत नव्हतं. कोणाला बरं वाटत होतं, आणि असंख्यांना वाईट वाटत होतं.

महाराजांची तबियत इतकी बिघडली होती तरी पोलादखानाचा बंदोबस्त पोलादीच होता. त्यांत बदल करावा अशी किंचित्शींहि इच्छा वा जरूरी औरंगजेबाला वाटत नव्हती. उलट त्याची योजना दुसरीच व भयंकर चालू होती. महाराजांना कायमचं कैदेंत सडत ठेवण्यासाठीं एका वेगळ्याच बळकट इमारतीची त्यानें निवड केली होती. ही इमारत म्हणजे त्याचा एक सरदार फिदाइ हुसेन ह्याचा वाडा. ह्या वाड्याचें बांधकाम चालू होतें. बहुतेक वाडा पूर्ण झाला होता. औरंगजेबाच्या खास हुकुमावरून ह्या वाड्याचें बांधकाम निकडीनें चालू होतें. लवकरच बादशहा महाराजांना त्या भयंकर काळदरींत आणून टाकणार होता. मग तोंपर्यंत ते बरे होवोत वा न होवोत.

आणि एक दिवस ही बातमी महाराजांच्या कानीं पुटपुटली गेली. आणि मग महाराजांचें दुखणें फारच वाढलें. त्यांचें कण्हणें दारावरच्या पहारेकऱ्यांना

ऐकूं येऊं लागलें. पोलादखान व इतर आंत डोकावत तों दुखण्यानें हैराण झालेले महाराज त्यांना दिसत.

महाराज दुखण्यापेक्षां शुश्रूषेनेंच हैराण होत होते ! कारण ही अकारण शुश्रूषा करून घेणं भाग होतं. कांहींहि करून दुखण्यास उतार पडेना. दुखणें सारखें वाढतच आहे, शिवाजी राजे खंगत चालले, कोणत्याहि औषधांनीं उतार पडत नाहीं, अशा बातम्या औरंगजेबाच्या कानीं रोज जात होत्या. त्याला त्याचं कांहींच नव्हतं.लोकांना तर असें वाटूं लागलें कीं, हा शिवाजी ह्या दुखण्यांतून उठत नाहीं. मरणार !

रामसिंह, मुखलीसखान, पोलादखान वगैरे लोक भेटावयास आले असतांना एक दिवस श्वास लागलेल्या महाराजांनीं कण्हत कण्हत तारवटलेल्या डोळ्यांनीं त्यांच्याकडे पहात पहात व अडखळत अडखळत म्हटलें कीं, ‘ आमची अवस्था आतां कठीण झाली ! औषधांचे उपाय हरले ! आम्ही उदास झालों–’ ह्यावर त्या मंडळींनीं महाराजांना धीर दिला.

त्यावर महाराज म्हणाले, ‘ आतां कठीण. आतां निदान दानधर्म करून तरी पहावा अशी इच्छा आहे. साधुफकीरांना मेवा-मिठाई वाटावी अशी इच्छा आहे. त्यांच्या दुआईनें तरी गुण येईलसें वाटतें ! आम्ही पापी. बादशहांचे गुन्हे केले. त्याचीं फळं भोगतों आहोंत. पण बादशहा ह्या दान-धर्माला परवानगी देतील काय ? ’

आलेल्या मंडळींनीं होकारार्थी धीर दिला. महाराज म्हणाले, ‘ फार मेहेरबानी होईल. बादशहा रहेमदिल आहेत. मी अर्ज करतों. पंत !—’

महाराजांना मधून मधून पण योग्य वेळीं खोकल्याची हुकमी उबळ येत असे.

रघुनाथपंतांच्यामार्फत लगेच महाराजांनीं बादशहाकडे दानधर्म करण्या-साठीं परवानगी मागणारा अर्ज पाठविला.

बादशहांनीं तो एकदम मंजूर केला. पंत ही खुशीची खबर चिंतेच्या चेहऱ्याखालीं झांकून महाराजांकडे घेऊन आले.

सर्वच मंडळी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत जन्मभर उनाडलेली होती. आतांपर्यंत फत्तेखानापासून तों शाएस्ताखानापर्यंत अनेक सरदारांची त्यांनीं चांगलीच टिंगल उडविलेली होती. खट्याळपणा आणि वात्रटपणा त्यांच्या

रोमरोमांत भिनला होता. पण महाराजांच्या ह्या विलक्षण दुखण्यांत मात्र त्यांनीं आणलेला गंभीरपणाचा आव एकमेकांनाच लाजवणारा होता! वातावरण फार छान करून ठेवलं होतं!

मिठाईचे पेटारे पहिल्यांदाच महालांत आले. कावडीप्रमाणें बळकट दांडीला दोऱ्यांत बांधलेले व मिठाईनें भरलेले वेळूचे पेटारे हेलकावे घेत घेत भोयांनीं एक एक करून महालांत आणलेले. अनेक पेटारे आंत आले. महाराजांनीं निजल्या निजल्या त्यांना हस्तस्पर्श केला. पेटारे नंतर गांवांत रवाना झाले. महालांतून बाहेर पडतांना पोलादखानाच्या लोकांनीं व स्वतः खानानें पेटारे तपासून पाहिले.

त्यांतील भरगच्च प्रसाद त्यांनाहि मिळूं लागला.

पेटारे नित्य जाऊं लागले, नित्य तपासलेहि जाऊं लागले. मंडळींना नित्य खाऊहि मिळूं लागला.

असेच दिवसांमागून दिवस उलटत गेले. पेटारे चालू होते. तरी तब्येत ढासळतच होती. काय करावं?

पेटारे तपासून पहातांना किंबहुना पाहण्यापूर्वींच पोलादखानाची खात्री पटूं लागली कीं, यांत फक्त मिठाईच आहे. अनेक दिवसानंतर त्यानें अधून-मधूनच एखादा पेटारा तपासून बाकीचे पेटारे सरळ जाऊं देण्यास सुरुवात केली. यांतल्या कित्येक मिठाईच्या डाली निरनिराळ्या सरदारांकडे रवाना होऊं लागल्या. इतर लोकांचीं तोंडें गोड होत होतीं; पण महालांतल्या मंडळींच्या तोंडचं मात्र पाणी दिवसेंदिवस आटत चाललं. कारण प्रकृति आतां अगदीं कड्याच्या कांठावर येऊन ठेपली. अहोरात्र जागरणें सुरू झालीं. महाराजांच्या डोक्याभोंवतीं कोंडाळीं करून मंडळी आपसांत कुजबुजून 'शेवटचे' उपाय, इच्छा, आकांक्षा, आज्ञा, सूचना, हळुहळु विचारून घेऊं लागली. मंडळींची ही शेवटची धांवपळ फारच जागरूकतेनें, काळजीनें, चिंतेनें चालली होती. सगळेजण रात्रभर जागे! वैद्य-हकिमांची तशीच धांवपळ! रामसिंह वारंवार येऊन जात. पोलादखानाच्या छावणींत तर खात्रीच झाली कीं, हा शिवाजी आतां दोन तीन दिवसांपेक्षां जास्त टिकत नाहीं! हा जाणार!! शहरांतहि लोकांना हेंच वाटूं लागलें. दरबारांत चर्चा ह्याचीच.

तरीहि पोलादखानाचा करडा पहारा कायम होता. आणि औरंजेबाचा गुप्त निर्णय निश्चित होता.

महाराजांचे लोक औषध आणायला वा वैद्याकडे धांवपळ करीत तीहि वांझोटी नव्हे. तेवढ्यांत बातम्या मिळवीत. ' पुढची ' सर्व तयारी कशी करायची तें ठरलेलं होतं. त्याची योजना हे लोक करीत.

महाराजांच्या भयंकर कोसळलेल्या तबियतीच्याच दिवशीं त्यांच्या कानांत एक बातमी येऊन घाबऱ्या घाबऱ्या शिरली. क्षणभर कण्हणं थांबलं !

" परवाचे दिवशीं तुम्हांला बादशहा येथून काढून फिदाइ हुसेनच्या वाड्यांत नेऊन टाकणार आहे ! "

— आणि मग महाराजांचं कण्हणं वाढलं !

आतां फक्त पंचवीस किंवा तीस तासांचाच अवधि हाताशीं होता. त्यानंतर सावली औरंगजेबाची ! मृत्यूची ! ! डोक्याला डोकीं लागलीं. कुजबुज झाली. ठरलं ! ती रात्र भयंकर गेली ! पोलादखान किंवा कोणीहि आंत आला कीं महाराजांचे लोक आवाज करूं नका, अशी खूण करीत.

तारीख १८ ऑगस्ट १६६६ ह्या दिवशीं महाराजांना फिदाइ हुसेनच्या वाड्यांत नेऊन टाकायचं, असा औरंगजेबाचा बेत ठरला. पण अत्यंत गुप्त !

१६ ऑगस्टची रात्र कशीबशी मृत्यूशीं आट्यापाट्या खेळत महाराजांनीं पार पाडली ! दारावरच्या पहारेकऱ्यांनाहि त्यांच्या त्या शेवटच्या वेदना पाहवत नव्हत्या !

१७ ऑगस्टचा दिवस उजाडला. सकाळपासून मंडळींचे चेहरे खरोखरच अत्यंत चिंताक्रांत दिसत होते. कसं होईल ? काय होईल ? कसं होईल ? काय होईल ? एवढा ' जीव ' सुखानं ' गेला ' म्हणजे मिळवली. खानाचे लोक व खानहि आंत येऊन विचारत, ' कैसा है ?' ही मंडळी रडवे चेहरे करून खुणेनेंच सांगत, ' आतां कसचं काय ! कांहीं तासांचे सोबती ! '

दुपार झाली. दुपारचे साडे तीन वाजले. मिठाईचे पेटारे महालांत आले. परमेश्वरा ! आतां हे शेवटचेच पेटारे बरं ! एवढ्या पुण्याईवर कांहीं जमव !

मंडळींची चुळबुळ चालली होती. महाराज निश्चेष्ट पडले होते. संभाजी राजे शेजारीं बसले होते. नऊ वर्षांचा पोरगा तो; पण अगदीं मोठ्या

माणसारखा गंभीर वागत होता. दोन पेटारे रिकामे होते. रघुनाथपंत, चिटणीस, निराजीपंत, तान्हाजी, येसाजी वगैरे सर्वांचीच नजर महालाच्या झरोक्याकडे आणि दरवाजाकडे टकमका भिरभिरत होती. भयंकर काळजी, भयंकर धास्ती ! छाताडं धडधडत होतीं. हिरोजी फर्जंद महाराजांच्या जवळ गेला. त्यानें छातीजवळ डोकें नेलें. महाराजांनीं हळू आवाजांत पुटपुट केली. आंतल्या आंत आपल्या उजव्या हातांतील सोन्याचं कडं व बोटांतील आंगठी काढून हिरोजीच्या हातीं दिली. मदारी मेहतर पाय चेपीत होता. सारं सारं चोख तयार होतं. सर्व सांगून झालेलं होतं. सर्व ठरलेलं होतं. दोन पेटारे पलंगाजवळ सरकले ! त्या छोट्या शंभू राजांनाहि सारं शिकवून ठेवलं होतं. सर्वांच्या नजरा चौफेर टकाकत होत्या. कोणी येत नाहीं ना ? कोणी पहात नाहीं ना ? जर कुणीं पाहिलं तर ?

नको नको ! जगदंबे, आई भवानी, आतां अंत पाहूं नको ! तिकडे महाराष्ट्र वाट पहातोय् ! तिकडे घरोघरचीं लेकरं-माणसं ह्या महादेवाची वाट पहात आहेत ! आईसाहेब वाट पहात आहेत ! ती माउली डोळ्यांत प्राण आणून बसली असेल--आतां सोडव. जाऊं दे !

महाराजांनीं मान वर करून पाहिलं. मंडळींनीं मानेनं खूण केली. महाराज झटकन् पांघरुणांतून बाहेर आले. संभाजी राजे एका पेटाऱ्यांत बेडकीसारखे पटकन् जाऊन बसले. महाराजहि पेटाऱ्यांत बसले. भयंकर दिव्य ! ! !

" जय भवानी ! "

पेटारे बंद झाले !

महाराज पलंगावरून उतरतांक्षणींच हिरोजी फर्जंद त्याच पांघरुणांत घुसला. आणि अंगावर पांघरूण घेऊन हळूहळू कण्हूं लागला ! हिरोजी दिसण्यांत हुबेहूब महाराजांसारखा दिसत असे. मदारी हिरोजीचे पूर्ववत् तितक्याच गंभीर चेहऱ्यानें पाय चेपीत राहिला.

पेटारे निघाले. सर्वांचीं छाताडं भीतीनं ताडताड उडत होतीं. दरवाजांतून पेटारे बाहेर पडूं लागले. पेटाऱ्यामागून पेटारे कर्रकर्र करीत चालले होते. " ठैरो ! " पोलादखानानें पेटारे थांबवले. सर्वांच्या काळजाचं पाणी पाणी झालं. अंगाला घाम सुटला. जिह्वा टाळ्याला चिकटल्या. आतां ?

पोलादखानानें एकदोन पेटारे तपासले आणि तो ओरडला, " जाने दोऽऽ ! "

जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी, प्रतापगडची जगदंबा, पंढरीचा विठुराया, मोरगांवचा मोरया, शिंगणापूरचा महादेव, कोल्हापूरचा ज्योतिबा एकदम धावले ! नवसाला एकदम पावले ! ! महाराज निसटले ! महाराष्ट्राचं स्वातंत्र्य सुखरूप सहीसलामत औरंगजेबाच्या मगरमिठींतून निसटलं ! कुलूप न फोडतां निसटलं ! कुलपांतून निसटलं ! किल्लींतून निसटलं !

* * *

आधार : सरकारकृत शिवाजी : पृ. १४७–१४९.
हाउस ऑफ शिवाजी : पृ. १६९–१७२.
{ शि. चि. प्र. ( जेधे शकावली ) पृ. २३–२४.
{ व जेधे करिना पृ. ४७.
सभासद : पृ. ५१–५२.
मराठी रियासत–२ पृ. १२९–१३०.

पेटारे गेले. दूर गेले. गोसाव्या-फकिरांसाठीं, दरबारच्या कोणा सरदारांसाठीं ज्या डाल्या होत्या, त्या तिकडे रवाना झाल्या. आजची ही शेवटची मिठाई. सुटल्याबद्दलची ! नेमके दोन पेटारे गांवाबाहेर नेमक्या ठरलेल्या जागीं रवाना झाले. महाराजांची कांहीं मंडळी तेथें अधीरतेनें वाट पहातच होती. त्यांनीं घोडे आणून तयार ठेवले होते. लांबून दोन पेटारे येत असलेले दिसूं लागतांच त्यांना केवढा आनंद झाला म्हणून सांगावं ! पेटारे तेथें येऊन उतरले. महाराज व संभाजी राजे बाहेर पडले. नवा प्रकाश, नवी हवा ! गेले चार दिवस–अगदीं एक तासापूर्वीपर्यंत अत्यवस्थ आजारी असलेले महाराज तडखडीत बरे झाले होते ! आतां प्रत्येक निमिष मोलाचं होतं. महाराज व संभाजी राजे तावडतोब घोड्यावर बसले. इतर मंडळींचेहि घोडे होतेच. घोड्यांना टांच मारतांच ते भरधांव सुटले. पण दक्षिणेकडे नव्हे. उत्तरेकडे. त्या दिशेला ! मथुरेकडे. कारण, लक्षांत आल्यानंतर औरंगजेब आपल्या पाठलागासाठीं फौजा पाठवील त्या नक्की दक्षिणेकडेच. त्या फौजा शोधशोधून दमल्या म्हणजे सावकाश आपण दक्षिणेकडे जाऊं. तोंपर्यंत काशी, प्रयाग वगैरे यात्रा करून घेऊं, असा महाराजांचा बेत होता. मागें राहिलेल्या मंडळींना त्यांनीं मथुरेस येण्याबद्दल आधींच सूचना देऊन ठेवल्या होत्या. मथुरेंत मोरोपंत पिंगळ्यांचे मेव्हणे कृष्णाजी त्र्यंबक मथुरे हे राहत होते. काशीपंत व विसाजीपंत असे त्यांना आणखी भाऊ होते. महाराज मथुरेकडे दौडत गेले.

ह्या वेळीं सायंकाळची वेळ झाली होती. अंधार दाटत चालला होता. महिना श्रावणाचा होता.

इकडे महाराजांचे पेटारे गेल्यानंतर हिरोजी फर्जंद पलंगावर कण्हत पडला होता. मदारी त्याचे पाय चेपीत होता. भोंवतीं चार-पांच मंडळीच उरली होती. निराजीपंत, दत्ताजीपंत, राघो मित्र वगैरे लोक ह्या ना त्या निमित्तानें महाराजांच्या आधींच पसार झाले होते. उरलेल्या मंडळींच्या मुद्रा आतां मात्र खरोखरच काळजीनें व्यास झाल्या होत्या. महाराज गेले. अगदीं सुखरूप

... ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..... वि: ..........
क्रमांक .......................... नों: दि: ..............


ठरल्या जागीं पोहोंचले असतील ना ? आतां मथुरेच्या वाटेवर असतील नाहीं ? दिवस हे असे पावसाळ्याचे. श्रावणसरी कोसळताहेत. रात्रीची वेळ.. कसं होणार ?

मधून मधून पोलादखान वगैरे लोक आंत डोकावून जात होते. छातींत कसं चर्र होत होतं. हिरोजी मात्र सोन्याचं कडं व अंगठी असलेला हात मुद्दाम पांघरुणाच्या वर ठेवून कण्हत होता. बिचाऱ्या औरंगजेबाला शत्रु तरी काय इरसाल भेटले पहा ! सह्याद्रीच्या दऱ्यांत वावरणारे हे खेडवळ मावळे, औरंगजेबाच्या खास राजधानींत जाऊन त्याला बेमालूमपणें बनवीत होते.

सूर्य मावळला. काळवंडत चाललं. हिरोजीच्या-नव्हे चुकलोंच–महाराजांच्या पलंगापुढें सुतकी चेहरे करून बसलेल्या त्या चौघा–पांच जणांनीं एकमेकांना खुणावलं. महाराज तर आतां जगत नाहींत हें सगळ्यांना कळून चुकलं होतं. पोलादखानाचीहि खात्री झाली होती. चालले होते ते शेवटचे उपाय. हे चौघे-पांच जण उठले आणि तितक्याच गंभीर मुद्रेनें बाहेर पडले. जातांना त्यांनीं सांगितलं कीं, ‘ वैद्याकडं जाऊन औषध घेऊन येतों. महाराजांकडे जरा लक्ष ठेवा ! ’ पोलादखान म्हणाला, ‘ बरं ! ’

ही मंडळी जी पसार झाली ती पुन्हा कशाला येताहेत ! गेली ती गेलींच. आतां उरली फक्त दोन. हिरोजी ‘ महाराज ’ आणि मदारी मेहेतर. आतां ह्या दोघांना मात्र एकेक क्षण युगायुगासारखा जड जाऊं लागला. सगळे निघून गेले. बाहेर पांच हजार राक्षसांचा पहारा.

एक तास गेला. चटकन् हिरोजीनें मदारीला खूण केली. बाहेर पुरता अंधार नव्हता, पुरता उजेड नव्हता. महालांत दिवा मंद मंद होता. हिरोजी उठला आणि दोघांनींहि पलंगावरच्या लोडावर पांघरूण पांघरलं आणि बाहेर निघाले. केवढं कठीण कर्म हें ! पण न बिचकतां, बावरतां करीत होते. दारावरच्या पहारेकऱ्यांना व खानाला त्यांनीं हलक्या आवाजांत सांगितलं, ‘ अब्बीच डोळा लगा है महाराजकू ! तखलफि मत देव ! हम अभी वापस आयेंगे ! वो हमारे आदमी दवा लानेकू गये है, वो अबतक किंव नहीं आये, ते हम देखता हूं ! ’

‘ अच्छा अच्छा ! जाव ! ’

—आणि हे दोघेहि जण पार पसार झाले ! महाल रिकामा !

रात्र झाली. महालांत महाराज शांत झोंपले आहेत, अशीच सर्वांची खात्री होती. सबंध रात्र अशीच गेली. तोंपर्यंत सगळीं पोहोंचलीं सुद्धां होतीं मथुरेंत. पुढचे बेत सुरू झाले होते.

दुसरा दिवस उजाडला. १८ ऑगस्ट १६६६. आंतली सामसूम पहारेकऱ्यांना टोचूं लागली. अगदींच शांतता कशी ? एकहि माणूस दिसत नाहीं! पहारेकऱ्यांनीं घाबऱ्या घाबऱ्या पोलादखानाला जाऊन हळूच सांगितलं !

" आऽऽऽऽऽऽ!" त्याचे डोळे पांढरे झाले. तो महालांत गेला. पलंगावर जाडजूड होतं. वर शाल होती. खानानें हांका मारल्या, ' राजे ! राजे ! ' पण राजे ओ देईनात. खानाच्या पायांना कापरं भरलं. त्यानें एकदम ओरडून शाल ओढली ! तों काय ! खानाची काय भयंकर तारांबळ ! शिवाजी – शिवाजी – शिवाजी ! सबंध छावणींत गोंधळ उडाला. शिवाजी गेला–पळाला, उडाला, गुप्त झाला ! औरंगजेबाला बातमी गेली.

आग्र्यांत ही बातमी पसरली. प्रत्येकाच्या तोंडीं हाच विषय. औरंगजेबाचा संताप ज्वालामुखीसारखा भडकला. त्यानें संतापाच्या भरांत ताबडतोब आग्रा शहराला लष्करी गराडा घालून झडती घेण्याचा हुकूम सोडला. शिवाजी आग्र्यांतच लपला असला पाहिजे, अशी त्याची खात्री होती. वास्तविक महाराज ह्या वेळीं आग्र्यापासून अठरा कोस दूर होते. त्यानें अत्यंत कडक शब्दांत पोलादखानाला जाब विचारला. पोलादखानाचं डोकं ह्या प्रकारानें भ्रमिष्टाहून भ्रमिष्ट झालं होतं. खरोखर गेले तीन महिने तो डोळ्यांत तेल घालून करडी नजर ठेवीत होता. त्यानें स्वतःकडून थोडीसुद्धां कसूर केली नव्हती. नशीब त्याचं असं. त्याला कोण काय करणार ! त्यानें औरंगजेबाला जो जबाब दिला, तो मात्र मोठा मासलेवाईक होता. त्यानें सांगितलें, ' मी काय करणार ? शिवाजी नक्कीच चेटूक करून पळाला असला पाहिजे ! आमची त्याच्यावर सतत नजर होती. आमच्या डोळ्यांदेखत तर खासच तो गेलेला नाहीं. दहा हजार डोळे जागे होते. अहोरात्र ! तो नक्की खोलींतच गडप झाला त्याच्या ! ! ! '

औरंगजेबानें ताबडतोब शोधासाठीं फौजा पिटाळल्या. सर्व फौजा दक्षिणेच्या वाटेवर शोधाशोध करीत दौडत होत्या. ह्या वेळीं महाराजांचा उत्तरेकडे प्रवास सुरू झाला होता !

महाराज कृष्णाजीपंतांच्या घरीं जाऊन पोहोंचले. बाकीची मंडळीहि तेथें येऊन पोहोंचली. सगळे सुखरूप आले. फक्त हिरोजी व मदारी लपत छपत परस्पर दक्षिडेकडे जाणार होते, त्याप्रमाणें ते गेले. पुढच्या योजनांचे निकडीनें व तांतडीनें निर्णय ठरले. संभाजी राजे फार लहान असल्यामुळें त्यांना धांवपळ करवणार नाहीं, म्हणून त्यांना कृष्णाजीपंतांच्या घरींच मथुरेंत ठेवायचं ठरलं. नंतर सावकाशपणें विसाजीपंतांनीं त्यांना राजगडावर घेऊन यावं, अशी योजना ठरवून पुढच्या प्रवासाची तयारी सुरू झाली. प्रथम महाराजांनीं व तान्हाजी, येसाजी वगैरेंनीं आपल्या मस्तकावरचे केंस साफ काढून टाकले. दाढीमिशा गेल्या. सर्वांचेच अवतार बदलले! एकमेकांना ओळखूं येईनासे झाले. लुंग्या, छाट्या, कमंडलू, कुबड्या, खडावा, रुद्राक्षाच्या माळा, राख, भस्म, भोपळे, जपमाळा वगैरे साहित्यानें सर्व मंडळी नखशिखान्त नटली. महाराजांनीं डोक्याला धाबळी गुंडाळली. गळ्यांत झोळ्या घालून व हातांत कुबडी-कमंडलू घेऊन महाराज तयार झाले. इतर मंडळींचा थाटहि असाच. अगदीं ओळखूं येईनाशी झाली सारी मंडळी. आतां त्यांना त्यांच्या बायकांनीं सुद्धां ओळखलं नसतं! कृष्णाजीपंतांना प्रवासाच्या वाटा माहीत होत्या, म्हणून त्यांना बरोबर घेऊन मंडळी निघाली. मुखानें राम राम म्हणत सर्वजण निघाले. निराजीपंत मोठे विद्वान् महापंडित होते. संस्कृत भाषेवर त्यांचं प्रभुत्व होतं. अर्थात् पाठ-पाठांतर विपुल होतंच. महाराजांनीं व इतर मंडळींनीं निराजीपंतांना आपल्या टोळीचे गुरु केलें. आपण चेले बनले. ही गुरुशिष्यांची टोळी यात्रेस निघाली. संपूर्ण प्रवास औरंगजेबाच्या राज्यांतूनच होणार होता.

प्रवास चालू झाला. एकेका पवित्र स्थानीं स्नान, दर्शन, भजन, पूजन करीत निराजीपंतांच्या व कृष्णाजीपंतांच्या मागोमाग मंडळी चालली होती. ह्यांत एक राजा आहे, एक सेनापति आहे, एक मंत्री आहे, एक न्यायाधीश आहे आणि एक राजाचा खास चिटणीस आहे अन् इतर त्या राजाचे सरदार आहेत, ही कल्पनासुद्धां त्यांच्या दिव्य अवताराकडे पाहून कोणाला येणं शक्य नव्हतं.

—काशीयात्रा झाली.

—प्रयाग-स्नान झालं.

—श्रीजगन्नाथ-दर्शन झालं.

दिवस, आठवडे अन् महिने उलटत होते.

औरंगजेबाच्या फौजा शोधून शोधून थकल्या. हात हालवीत माघारी एकेक सरदार येऊं लागला. औरंगजेब फारच चडफडत होता. अगदीं मुठींत घट्ट पकडलेला हा उंदीर अखेर पळाला अं! एवढ्या फौजा, एवढे सरदार, एवढा पहारा– व्यर्थ व्यर्थ !

हातावर तुरी देऊन पळणारे अनेक असतात ! पण हातावर मिठाई देऊन पळणारा हा पहिलाच कैदी !

* * *

**आधार :** मराठी रियासत–२ : पृ. १३१–१३२.
हाउस ऑफ शिवाजी : पृ. १७५.
सरकारकृत शिवाजी : पृ. १४९ ते १५१.
सभासद : पृ. ५४–५५.

# १३ : : नेताजीची कैद

**मन** चुकचुकलं कीं फार वाईट !

कां कोण जाणे, पण नेताजीचं मन असंच गेले कांहीं दिवस चुकचुकत होतं–नव्हे चुकचुकणं दिवसेंदिवस वाढतच होतं.

म्हणजे आपलं कांहीं चुकलं तर नाहीं ना ? नाहीं...नक्कीच नाहीं ! मग मन कां चुकचुकतं ! कांहीं वाईट-साइट तर होणार नाहीं ? या विचारानं नेताजी बेचैन होई. नव्हे, या विचारानं त्याची झोंपहि आजकाल उडवून लावली होती.

—असाच एक दिवस तो आपल्या शामियान्यांत बसला होता. एकटाच ! अगदीं विचारमग्न ! अगदीं थैमान मांडलें होतें विचारांनीं त्याच्या डोक्यांत ! औरंगजेब – आग्रा – महाराज – कैद–स्वराज्य – कारस्थान – यश – अपयश – आपण – आईसाहेब —! एक कीं दोन ? असंख्य गोष्टींच्या विचारांनीं डोकं भणाणलं होतं त्याचं !

इतक्यांत —! साखळदंडाचा आवाज त्याच्या कानीं आला. शामियान्याच्या प्रवेशद्वाराशीं कांहीं चाहूल ऐकूं आली. त्यानें वळून एकदम तिकडे पाहिलं !

खुद्द दिलेरखान कनात वर करून आंत आला.

नेताजी चकित होउन उभा राहिला. खानाच्या मागोमागच सहासात हशम आंत आले. खानाची आत्तांची नजर अगदीं वेगळीच होती. हशमांकडे पहात तो उद्गारला —

" जल्दी करो ! "

नेताजीला समजेचना कांहीं !

चार हशम साखळदंड घेऊन एकदम पुढें झाले. त्याच्याहिपेक्षां जल्दीनें इतर हशम समशेरी उपसून व त्या नेताजीवर रोखून त्याच्यासभोंवतीं उभे राहिले.

नेताजी हतबुद्ध झाला ! खान त्याच्याकडे रोखून पहात होता ! नेताजीला हालचाल करणेंहि अशक्य होतं. हशम त्याला सांखळदंडांनीं जखडीत होते.

" हें काय म्हणून ? " नेताजीनें चिडून विचारलें.

" शहेनशाह आलमगीर बादशाहके हुक्मसे "—खान उत्तरला.

" आजपर्यंत आम्ही पंचहजारी मनसबदार होतों—!"

" शहेनशाह आलमगीर बादशाहके हुक्मसे !"

" आणि आज लगेच गिरफदार ?"

" शहेनशाह आलमगीर बादशाहके हुक्मसे !!" खानाचें उत्तर तेंच !

नेताजी गिरफदार झाला !

" चलो !" खानानें फर्मावलें !

नेताजीला या कशाचाच अर्थ कळेना. तो मुकाट्यानें समशेरींच्या वेढ्यांत खानामागोमाग चालूं लागला !

शामियान्याच्या बाहेर येतांच त्यानें वळून पाहिलें. शेंकडों अरबांनीं नागव्या समशेरींनिशीं त्याच्या शामियान्याला वेढा घातला होता !

एका रिकाम्या तंबूंत नेताजीची रवानगी झाली. भोंवतीं कडक पहारा ठेवण्यांत आला. मोठ्यामोठ्यांना हरवणारा नेताजी एका कापडाच्या खोलींत जेरबंद होऊन पडला.

तो दिवस गेला; पण प्रत्येक क्षणाला नेताजीला निरनिराळ्या शंका आणि कुशंका टोचीत होत्या. इतक्या अचानकपणें बादशहानें आपल्याला कैद काय म्हणून केलं ? आपलं पुढं होणार आहे तरी काय ? अशाच ह्या बेड्यांत रात्रंदिवस पडावं लागणार का ? फुकट तें शौर्य, धाडस, ताकद अन् चपळाई !

रात्र झाली. जखडलेल्या बंधनांतली ती पहिली रात्र ! इतकी भयंकर रात्र त्यानें कधींच पाहिली नव्हती. प्रत्येक क्षण त्याला तासाएवढा अन् प्रत्येक तास दिवसायेवढा वाटत होता. जरा किंचितहि हालचाल केली तरी ते साखळदंड खळकन् वाजत ! जणुं ते नेताजींस बजावीत कीं, तूं आतां कैदी आहेस !

रात्र लोटली. सकाळ झाली. आणि तरीहि चार घटका तशाच त्या एकांतांत गेल्या. तो आंत एकटा होता, पण बाहेरून मात्र साऱ्या रात्रभरसुद्धां नागव्या समशेरींचा तंबूभोंवतीं गराडा होता. वाऱ्यानें कनात खालींवर होई आणि सूर्याचीं किरणें आंत डोकावत आणि लगेच अदृश्य होत. त्याच्या डोक्यांत विचाराचं गिरमिट चालूच होतं. आपलं काय होणार ? असंच जर रात्रंदिवस

अशा अवजड साखळदंडांत आपल्याला जखडून ठेवलं तर आपली सुटका करून घेण्याची थोडीतरी शक्यता आहे का? आणि हे कपटी मोंगल आपलं करणार आहेत तरी काय? इतक्या तडकाफडकीं आपल्याला गिरफदार करण्याइतकं झालं तरी काय?

एवढ्यांत तंबूबाहेरच्या पहारेकऱ्यांत एकदम कसली तरी दाट कुजबुज सुरू झाली. शंकाकुल आणि आश्चर्यानें दिङ्मूढ झालेल्या नजरेनें ते पहारेकरी क्षणाक्षणाला कनात वर करून नेताजीकडे पाहूं लागले. जणुं खात्री करून घेत होते कीं, नेताजी पळाला नाहीं ना! नेताजीला कांहींच उमज पडेना! पहारेकऱ्यांतील कुजबुज वाढतच होती. छावणींत इतरत्रहि विशेष गडबड उडत असल्याची चाहूल त्याला येतच होती! निमिषा-निमिषाला ते पहारेकरी कनात वर करून नेताजीकडे पहात होते. त्या सर्वांचे चेहरे आश्चर्यानें अगदीं उभट बनले होते. काय, झालं तरी काय? नेताजीला राहवेना. कुतूहलाचे थरावर थर त्याच्या मनांत चढत होते. कनात वर सरकतांच त्यानें एकदम ओरडून विचारलें—

"काय झालं?"

"कुछ नहीं! आप दिल्ली चलो!" खुद्द दिलेरखान आंत येत येत उद्गारला!

"दिल्लीला? तें काय म्हणून?" कांहींसें चिडून नेताजीनें विचारलें.

"शहेनशाह आलमगीर बादशहाके हुक्मसे!" अगदीं कुत्सित निर्विकारता खानाच्या मुखावर दाटली होती.

मागोमाग एक मोगल सरदार आंत आला. दिलेरखानानें त्या सरदारास नेताजीस ताब्यांत घेण्यास सांगितलें. आणि हुकमाची तामिली कसोशीनें करण्यास सुचवून खान निघून गेला.

त्या सरदारानें आपण लौकरच दिल्लीस निघणार असल्याची सूचना नेताजीस दिली.

छावणींत नेताजीच्या रवानगीची तयारी होऊं लागली. पांच-सहाशें कझाकांची फौज तयार झाली. प्रवासांतील सामानानें लादलेल्या उंटांचा तांडाहि तयार झाला. नेताजीला दिल्लीस नेण्याची जोखीम त्या मोंगल सरदारावर

दिलेरखानानें टाकली होती. नेताजी म्हणजे एक अत्यंत बडा राजकीय कैदी बनला होता.

नेताजीला तंबूच्या बाहेर आणलें. सगळ्या छावणींत घोळक्या घोळक्यानें मोंगल हशम कुजबुजत आणि त्याच्याकडे कुतूहलानें पहात उभे राहत. कसलं तरी चमत्कारिक गूढ वातावरण आज छावणींत पसरलं होतं.

चहूं बाजूंनीं बंद असलेल्या एका मोंगली गाडींत नेताजीला बसविण्यांत आलं आणि लगेच गाडीचीं दारें बंद करण्यांत आलीं.

— महाराज सुटले ! ऐन राजधानींतून सुटले आणि नेताजी मात्र औरंगजेबाच्या दाढेखालीं चालला होता.

— औरंगजेब आपल्यावर काय आरोप ठेवील ?

— तो लगेच ठार मारील का ?

— भयंकर कपटी आहे तो ! प्रत्यक्ष बापाची अन् भावा-पुतण्यांची काय तऱ्हा केली त्यानें !

आपण तर वैरीच ! काय करील तो ?

नेताजीच्या डोक्यांत सारखे हेच विचार भिरभिरत होते.

हशमांनीं भराभर घोड्यांवर टांगा टाकल्या आणि लगेच कूचाची इशारत झाली. अडीचशें स्वार पुढें चालले होते. मागोमाग नेताजीची गाडी चालूं लागली. गाडीच्या चारी बाजूंनीं नागव्या समशेरी घेतलेले हबशी व कझाक हशम चालले. त्यामागोमाग आणखी अडीचशें स्वार व त्यांमागें सामान वाहणारीं उंट, खेचरें वगैरे जनावरें चालूं लागलीं. नेताजीचा जेरबंद देह दिल्लीच्या मार्गाला लागला.

* * *

जास्तींत जास्त जल्दीनें नेताजीची रवानगी दिल्लीला करावयाची होती. औरंगजेबाचा तसा सक्त हुकूमच होता — कारण महाराज निसटले होते.

— आणि ह्याच वेळीं औरंगजेबास एकदम नेताजीची आठवण झाली ! त्याचें मस्तक जास्तच भडकलें ! हा नेताजीहि बदमाशच असला पाहिजे ! कसला तरी भयंकर डाव साधण्यासाठींच ह्यानें आपल्या फौजेंत नोकरी

धरली असली पाहिजे. शिवाजीनेंच त्याला मुद्दाम धाडला असला पाहिजे! अन् आपल्याच फौजेंत एखाददिवशीं–नव्हे आत्तांच, ही शिवाजी सुटल्याची बातमी कळतांच, हा नेताजी एकदम आपल्या फौजेची कत्तल उडवायला सुद्धां कमी करणार नाहीं! हरामखोर! – औरंगज़ेबाची खात्रीच झाली! आणि ताबडतोब त्यानें फर्मान देऊन स्वार दक्षिणेंत रवाना केले! फर्मान दिलेरखान अन्. जयसिंगाच्या नांवचें होतें.

" नेताजीस ताबडतोब गिरफदार करून दिल्लीस बंदोबस्तानें रवाना करा! अखेर त्या हरामखोर शिवाजीनें दगा दिलाच! शिवाजी कैदेंतून पळून गेला! खबरदारीनें नेताजीस ताबडतोड रवाना करा!"

— हें बादशहाचें फर्मान घेऊन दिल्लीहून स्वार निघाले. वाऱ्याच्या वेगानें ते अंतर काटीत होते. शिवाजी सुटल्याची बातमी दक्षिणेस पोहोंचायच्या आंत आणि पसरायच्या आंत नेताजी गिरफदार झालाच पाहिजे, असा औरंगजेबाचा हुकूम होता.

फर्मान दिलेरखानाच्या हातीं पडलं. शिवाजी पळाल्याची खबर वाचतांच मनांतल्या मनांत तो मटकन् खालींच बसला!! त्याला इतकें भयंकर आश्चर्य पूर्वीं कधींच वाटलें नव्हतें!

ताबडतोब खानानें नेताजीच्या तंबूस गराडा घालून त्यास गिरफदार केलें! हां हां म्हणतां महाराज पळाल्याची बातमी दिलेरच्या फौजेंत पसरली. ऐन झोपेंत नाकांत झुरळ घुसलें तर जशी स्थिति होईल, तशी गत मोंगल शिपायांची होऊन गेली. गिरफदार झालेल्या नेताजीला ते फार फार...म्हणजे फारच 'जपूं' लागले.

*　　*　　*

नेताजी गिरफदार झाल्याची खबर औरंगजेबास कळली! नेताजीच्या वाटेकडे त्याचे ते वटारलेले डोळे लागले!

अन् एक दिवस नेताजी राजधानींत दाखल झाला. बादशहाला खबर पोंचली!

" फलॉं रोज हाजीर करो!" बादशहाचा हुकूम झाला.

तो दिवस उजाडला.

" फिदाअी और मीर आतिश ! " औरंगजेब गरजला.

" जी हुजूर ! " खडे होऊन लगेच कुर्निसात केला दोघांनीं.

" बंद कर दो उसको अंधार कोठडीमें ! सक्त नजर रखो ! और देखो ! वह भी भाग जायेगा तो गर्दन मार दी जायगी ! शुक्रिया ! " कडक शब्दांत औरंगजेबानं फर्मावलं अन् तो निघून गेला.

—अन् एका अंधाऱ्या भयाण तळघरांत हशमांनीं नेताजीला लोटून दिलं. साखळदंडांनीं हातपाय जखडून टाकले होते. दूरवर दार बंद केल्याचा अन् कुलूप घातल्याचा आवाज आला ! आणि भयाण सामसूम......! नेताजी कैद झाला—

* * *

आज आपल्याला औरंगजेबापुढें उभें रहावें लागणार, ह्या जाणिवेनें नेताजी आपल्या भवितव्यतेची कल्पना करीत होता. औरंगजेबाची आजपर्यंतची त्याला ऐकून कळलेलीं सारीं कपटी अन् नीच कृत्यें त्याच्या डोळ्यांपुढें येऊं लागलीं. आज आतां आपली पाळी —!

ती वेळ येऊन ठेपली! पहारेकऱ्यांच्या गराड्यांत नेताजी औरंगजेबाकडे निघाला. बेड्या खळखळत होत्या. त्या भव्य बादशाही महालांत त्यानें प्रवेश केला. सर्वत्र केवळ वैभव भरलं होतं. आरसपानी दगडी कमानींत त्याला स्वतःचं प्रतिबिंब दिसत होतं. किती लाजिरवाणं!

झगमगणारे किनखापी पडदे भराभर बाजूला सरकत होते. नेताजीचीं अवजड पावलं पडत होतीं. हें बादशहाचं निमंत्रण म्हणजे मृत्यूकडे रवानगी का? कसा असेल तो औरंगजेब? दिसेलच आत्तां! तो बघा–तोच का तो? लांबवर समोर गादीवर बसलेला तो!

होय! तोच! औरंगजेब! औरंगजेब!! एका उंची भरगच्च मसनदीवर औरंगजेब बसला होता. भोंवतीं अनेक बख्सारी हशम अंतराअंतरानें अगदीं चित्रासारखे उभे होते. अगदीं गंभीर शांतता भरली होती.

बेड्या वाजल्या! ती उग्रट नजर नेताजीवर खिळली. हशमांच्या माना गुडघ्यापर्यंत कुर्निसातांकरितां वाकल्या! नेताजीनंहि कुर्निसात केला. नव्हे, करणं भाग पडलं त्याला!

"तुम हो नेताजी?" औरंगजेबानं विचारलं.

"हो!" नेताजीनं मानेनंच उत्तर दिलं.

"ठीक है! एक शिवाजी मेरे हाथसे भाग गया–हर्ज नहीं! फौरन दूसरेको तो मैंने कैद किया! हँऽ हँऽऽ ... ए नेताजी! तुम नेकदिल और नेकबहादुर हो! सूरत भी अच्छी है। मैं तुझपर निहायत खूष हूँ। देखो। हमारे पाक इस्लाम महजबका स्वीकार करो! मुसलमीन बनो! तुझे ही दख्खनका सुभेदार बना दूँगा! जो कुछ चाहे वह भी दे दूँगा! लेकिन् ख्यालमें रखना– यदि तुम राजीखुशीसे करोगे तो बहोत ठीक है! नहीं तो ज़ुल्मजबरदस्तीसे तुझे मुसलमीन करूँगा! और उसके बाद भी तैय्यार न होगे तो हलहल करके कुत्तेकी मौतसे मौत आयेगी! मालुम हुआ? अल्ला तेरा भला करे!"

" काय म्हणालांत ? " अत्यंत हर्षभरानें आईसाहेबांनीं *विचारावं.*

" एक महिन्याच्या आंत महाराज आईसाहेबांच्या मांडीवर येऊन बसतील ! "

" हं ? खरं ? अगदीं खरं ? – पंत ! "

मोरोपंतांनीं दाक्षिणेचं ताट पुढें करावं. आईसाहेबांनीं ओंजळीओंजळींनीं दक्षिणा द्यावी.

स्वराज्यांत कुणी थोर साधु, संत, गोसावी, बैरागी, तपस्वी, महावेदांती, शास्त्री, पंडित होते त्यांना अन् कुणी नवीन आल्याचें ऐकिवांत आलें कीं त्यांनाहि आईसाहेबांनीं राजगडावर आणवावं. त्यांचा आदर सत्कार करावा अन् नमस्कार करीत म्हणावं, " माझा मुलगा परमुलुखाला यवनांच्या राज्यांत संकटांत पडला आहे ! *मला तो भेटेल असा आशीर्वाद द्या !* "

आईसाहेबांनी जगदंबा तुळजा भवानीचे पाय आसवांनीं रोज न्हाऊन काढावेत आणि म्हणावं, " आई, मीं निपुत्रिक मरावं अशी तुझी इच्छा आहे का ? आतां कांहीं मागणं नाहीं. माझा मुलगा तूंच आजवर सांभाळलास. तुझ्या आठहि हातांनीं आणून दे ! "

आतां ह्या मातृहृदयाची कशी समजूत घालावी, हें पंतांना समजत नसे. रोज सकाळीं राजगडावरच्या पद्मावती माचीवरच्या राजवाड्यांतून त्या देवीच्या दर्शनासाठीं जात.

--आणि एके दिवशीं—

देवी गाभाऱ्यांत उभी होती. भाळीं मळवट होता. वस्त्रेंभूषणें ल्याली होती. हातीं शस्त्रास्त्रें तळपत होतीं. तांबडीं, पिवळीं, पांढरीं फुलें तिच्या अंगाखांद्यावर हंसत होतीं. गळ्यांत माळा होत्या. उदाधुपाच्या धुरानें गाभारा भरला होता. दिवे जळत होते. अंबा प्रसन्नमुखानें उभी होती. आणि आई-साहेब प्राण कंठीं आणून तिला विनवीत होत्या. उपाध्याय उभे होते. बाहेर मोरोपंत होते. नम्रतेनें जवळच हुजरेपाजरे व कुळंबिणी उभ्या होत्या.

आईसाहेबांनीं देवीच्या पायावर मस्तक ठेवलं आणि पदरानें आसवें पुसलीं. तीर्थ घेतलं आणि बाहेर आल्या. पंतांनीं उजवा हात पुढें

केला. आणि तेवढ्यांत एक भालाईत दरवाजांतून मुजरा करीत करीत पुढं आला आणि म्हणाला, “ गडाच्या पाली दरवाजाशीं कांहीं गोसावीबैरागी आल्याती. गडामंदी येऊं देशील का म्हणून इचारत्याती. ”

“ कोण आहेत ते ? ” पंतांनीं चटकन् विचारलें. त्यांना काळजी गडाची. उगीच कोणी फितूर हर, फितवेखोर– !

“ पंत, कोणीहि असूं द्यात ! साधुबैरागी आहेत ना ? बोलवा त्यांना वाड्यावर ! त्यांच्या तरी आशीर्वादानं माझा शिवबा––! ” आई म्हणाल्या.

“ घेऊन ये वाड्यावर. ”

पंतांनीं आईसाहेबांचा हात धरला. बाहेर पालखी होती. आईसाहेब व पंत वाडयांत आले. आईसाहेब आंत गेल्या. पंतांनीं बाहेरच्या सोप्यांत पाट मांडले.

भालाईत गडाच्या पाली दरवाजाजवळचाच पहारेकरी होता. तो माघारा आला. दरवाजाबाहेर आठ–दहा गोसाव्यांचं टोळकं चिमटे वाजवीत बसलं होतं. लुंग्या, छाट्या पेहेरलेले, अंगाला आपादमस्तक राख फासलेले, रुद्राक्षाच्या माळा गळ्यांत, दंडांत, मनगटांत घातलेले, हातांत भोपळे, चिमटे, कुबडया, कमंडलू घेतलेले आणि खांद्यावर झोळ्या अन् पायांत खडावा घातलेले ते बैरागी आंत यायला बरेच आतुरलेले दिसत होते. त्यांतला एकजण गुरु होता व बाकीचे चेले होते. भालाईत येतांच मोठ्या आतुरतेनें सर्वांनीं त्याच्याकडे पाहिलें.

“ चला समदेजन. तुम्हा समद्यास्नी आईसाहेबांनीं बोलीवलंय्. ”

चटकन् उठले सगळे ! इतकी कसली ओढ यांना ? झोळ्या–चिमटे सांवरीत मंडळी दरवाजांतून आंत आली. पण त्यांच्या त्यांच्यांतच कसलीतरी चुळबुळ सुरू झाली. कुणी राम राम म्हणत होतं. कुणी माळ ओढीत होतं. कुणी अगदीं आठवण ठेवून डोळ्यांची उघडझाप करीत होतं. पण सर्वांच्या नजरा गडावरच्या सर्वांगाला फिरत होत्या. जणुं कांहीं अगदीं आपल्या आद्यपीठाच्या स्थानीं आल्यासारखं त्यांना वाटत होतं. त्यांतला जो तो मार्गे मार्गे राह्यला बघत होता. सर्वांच्याच चेहऱ्यावर जरा गडबड उडालेली दिसत होती. वास्तविक साधुसंत म्हणजे कसे अगदीं निरिच्छ, निर्विकार अन् सुख–

दुःखाच्या पलीकडे पोहोंचलेले असावेत ना! पण ह्यातल्या एका साधुमहा-राजांचा चेहरा अगदीं गहिंवरल्यासारखा झाला होता. त्यानें आपल्या डोक्याला धाबळी गुंडाळलेली होती बाकीचे आतां आपल्या गुरूला म्हणत होतें, " पंत, आतां तुम्हीच पुढें व्हावा ! "

" वा वा ! "

" वा म्हंजी ? आईसाहेब नमस्कार करतील कीं ! आम्ही त्यांचा नमस्कार घ्यायचा व्हय ? तुम्ही बामण आहांत ! तुम्हास्नीं नमस्कार केला तर पुन्येच घडल ! "

हे कोंडाळं खडावा वाजवीत कुजबुजत चाललं होतं. भालाईत पुढून चालला होता. एवढ्यांत वाडा आलाच. प्रत्येक गोसावी उगीचच जादा आव आणीत होता. अगदीं जन्मांत प्रथमच इथें आल्यासारखं अनोळखी-पण प्रत्येकजण आणीत होता.

पंतांना वर्दी गेली. लगबगीनें पंत हात जोडून स्वागताला दारांत आले. " या— ! " आणि एकदम किंचित्सं त्यांना कांहीं तरी वाटलंच ! पण लगेच , छे ! असं ? शक्यच नाहीं, असा निर्णय त्यांच्या मुद्रेवर उमटला. त्यांनीं सर्वांनीं या सत्पुरुषांना नियोजित स्थळीं बसण्याची विनंती केली. मध्यावर जरा प्रमुख जागीं गुरुमहाराज बसले. उजव्या बाजूस डोक्याला धाबळी गुंडाळलेले पट्टशिष्य बसले. ह्यांच्या चेहऱ्यावर जरा विशेष गडबड उडालेली होती.

पंत आंत गेले व आईसाहेबांस हाताला धरून घेऊन आले. ती थकलेली, वांकलेली, सुरकुत्यांनीं फुललेली, लटलटत्या मानेची सत्तरीला पोहोंचलेली वृद्धा उंबरा ओलांडून ओसरीवर आली. साधु मंडळींना अगदीं कसंसंच झालं. तो पट्टशिष्य तर—कांहीं विचारूं नका ! त्याचे ओठ, नाकपुड्या अन् छाती पुसट पुसट हुंदक्यांनीं हलूं लागली. डोळे भरून आले.

आईसाहेब आल्या आणि साधु मंडळींच्या पुढें गेल्या. त्यांनीं वाकून गुरु महाराजांना नमस्कार करीत म्हटलें, " महाराज, माझा मुलगा परमुलुखाला गेलाय्. सहा महिने झाले. अजून आला नाहीं. डोळ्यांत प्राण आणून बसलेय् मी. मला तो भेटेल का हो ? " आईसाहेबांचा कंठ रुद्ध झाला.

" बाई ! चिंता नको करूं ! तुझा मुलगा तुला लौकरच भेटेल ! " गुरु महाराजांनीं ठणठणीत आशीर्वाद दिला.

" हत्तीवरून साखर वांटीन ! तुमच्या आशीर्वादानं एवढी गायवासराची भेट होऊं द्या ! " एवढं म्हणून साधु महाराजांच्या शेजारी बसलेल्या पट्ट-शिष्याला नमस्कार करण्याकरितां आईसाहेब त्याच्यापुढें जोडलेल्या हातांनीं वाकल्या—

" महाराज—! "

आणि तेवढ्यांत त्या शिष्य महाराजांनीं एकदम आईसाहेबांचे हात घट्ट पकडले आणि तो गदगदून ओरडला, " आई ऽ ऽ ऽ ! " ती हांक आईसाहेबांच्या काळजांत शिवबाच्या हांकेसारखी घुसली. त्यानें एकदम आईसाहेबांच्या पायाला मिठीच मारली. त्याच्या डोळ्यावरची धाबळी निसटून बाजूला पडली. आईसाहेबांचा हात एकदम त्याच्या मस्तकावरून फिरला.

" शिवबा ऽ ! शिवबा ऽ ! " थरथरत्या मानेनं आईसाहेबांनीं आरोळी मारली. आणि एकदम महाराजांस हृदयाशीं घट्ट धरलं–" माझ्या राजा ऽ ! अहो पंत–! अहो हा माझा शिवबा ऽ ! "

केवढा आनंद ! आनंद, आनंदी आनंद ! केवढी गडबड ! आणि केवढा गोंधळ ! अन् केवढी मग तारांबळ ! पंत तर चक्रावूनच गेले. सगळेच जण हंसत होते. अंगावरच्या झोळ्या–माळा काढीत होते. छे, छे ! त्या आनंदाला सीमा नव्हती. कसं वर्णन करूं ? देवकीला कृष्ण भेटला ! कौसल्येला राम भेटला ! जिजाऊला शिवबा भेटला ! सगळेच जण हंसत हंसत रडत होते आणि रडत रडत हंसत होते. आनंद गगनांत मावेना.

तो दरवाजावरचा भालाईत वेड्यासारखा ' आ ' करून पहातच राहिला ! पंत डोळे पुशीत पुशीत हंसत हंसत त्याच्यावर खेंकसले, " अरे बघतोस काय ? तोफखान्याला वर्दी दे ! पळ ! "

तो भालाईत उड्या मारीत धांवत धांवत ओरडत सुटला, " आले ! अरे, आपले महाराज आले ! आपले महाराज आले ! "

सगळा किल्ला आनंदानें नाचूं लागला ! ओरडूं लागला ! तोफखाना आकाश-पाताळ घुमवीत गर्जूं लागला. प्रत्येक तोफ दिल्लीकडे तोंड करून

भयंकर हंसत होती. आणि गर्जून गर्जून औरंगजेबाला सांगत होती, " आला, आला ! तुझा वैरी सुखरूप येऊन पोहोंचला ! आमचा कलिजा आला ! आतां तुझ्या बापालाहि तो पुन्हा गवसणार नाहीं ! "

आईसाहेबांनीं महाराजांना न्हाऊन काढलें. आईसाहेबांनीं लगेच पहिला प्रश्न विचारला, " माझा शंभू कुठंय् ? "

" आईसाहेब, तो अगदीं सुखरूप आहे. मथुरेंत आपल्या पंतांच्या मेव्हण्यांच्या पदरांत त्याला टाकून आलों आहे. लौकरच येईल ! "

" काय बाई सोंगं तरी हीं ! कसं ओळखायचं ह्यांना ? पंत, बाजी, येसा, रघु, अन् हा माझा तान्हा—! कठीण कठीण झालं पोरांचं काम बाई ! " आईसाहेब सर्वांना भोंवतीं घेऊन कौतुक करीत होत्या अन् रडत होत्या. आईचा आनंद म्हणजे रडणंच !

पंतांनीं साखरेचं ताट आणून आईसाहेबांच्या पुढं केलं. त्यांनीं सर्वांच्या मुखीं साखर घातली. गडावर लोकांचा आरडाओरडा, शिंगें, कर्णे, नगारे, नौबतीचा कल्लोळ आणि तोफांचा दणदणाट चालू होता. तो ऐकूं येत होता.

त्या तोफांची सरबत्ती ऐकून महाराज म्हणाले, " किती दारूगोळा नासताहेत हे लोक ? " झाली लगेच महाराजांची स्वराज्याची काळजी सुरू !

" शिवबा, आज कांहीं बोलूं नकोस. आज तुझं कुण्णी ऐकणार नाहींत ! खेळूं देत. त्यांची आज दिवाळी आहे ! "

आईपुढं महाराज काय बोलणार ?

पंतांनीं महाराज आल्याचीं बातमीपत्रें व साखर थैल्यांत घालून स्वराज्यांतल्या किल्ल्या-किल्ल्यावर व ठाण्या-ठाण्यांवर स्वारांबरोबर रवाना केली. आनंदाची ही बातमी स्वराज्यांत पसरविण्यासाठीं राजगडावरचे शिलेदार चौखूर उधळत गडावरून बाहेर पडले. सबंध स्वराज्यांत आनंदी आनंद उसळला. ज्या ज्या ठाण्यावर हत्ती होते, तेथें तेथें महाराजांच्या अंमलदारांनीं हत्तीवरून साखरा वांटल्या. प्रत्येकाच्या हाता-हातावर साखर देत देत अंमलदार आनंदानें गहिंवरून सांगत होते, " आपले महाराज आले ! आपले महाराज आले ! "

स्वराज्याचं तोंड गोड झालं! आनंदी आनंद-अवघा आनंदी आनंद!

चंद्रभागा, कृष्णा, कोयना आनंदानें गिरक्या-भोंवरे घेत वाहूं लागल्या. प्रतापगडच्या भवानीचा गाभारा कुंकवानें लाल झाला, जेजुरीचा गड हळदीनें पिवळा झाला. पंढरीचं राऊळ बुक्काकस्तुरीनें घमघमलं. मृदंग, टाळ, खंजिरी, डफ, तुणतुणं, झांज, संबळ एकमदच वाजूं गर्जूं लागले

* * *

आधार :सभासद :

एक्याणव कलमी बखर : कलम ५६ वें.
जेधे शकावली : महाराज राजगडीं आले.
—तारीख २०-११-१६६६.

अनुक्रम ........................ वि: ......................
क्रमांक ........................ नों: दि: ......................
लेखन सीमा

अनुक्रम २१००३ वि:
क्रमांक ५४७ नों: दि:

## नामवंतांचें उत्तेजन—

**भालजी पेंढारकर :** अशीं मराठी पुस्तकें आलीं तर आमचीं पोरेंबाळें आपणांस धन्यवाद देतील. आपले श्रम अभिनंदनीय तसेंच स्वत्त्व तेजस्वी! कृपा करून आणखी कांहीं पुस्तकें लिहा.

**प्रा. रा. वि. ओतुरकर :** प्रस्तुत पुस्तकांचा मुख्य विशेष असा कीं, पुरंदरे यांनीं आपल्या उत्कृष्ट भाषाशैलीनें ऐतिहासिक प्रसंग चित्तवेधक रीतीनें मराठी वाचकांपुढें मांडले आहेत. संशोधक मंडळातर्फे प्रकाशित होणारीं इतिहासाचीं साधनें नीरस म्हणून तीं कोणी वाचीत नाहींत; म्हणून शालोपयोगी पुस्तकांतून त्यांचे उतारे देण्याचा बळजबरीचा प्रयोग कांहीं शिक्षणतज्ज्ञांनीं केला. परंतु श्री. पुरंदरे यांनीं हीं ऐतिहासिक साधनें आपल्या ललित लेखनाच्या द्वारें मराठी कुटुंबांच्या ऐन माजघरांत आणून ठेवलेलीं आहेत.

**डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे :** अगदीं प्रारंभींच्याच काळीं रा. पुरंदरे यांना स्पृहणीय असें यश आलें आहे. मराठ्यांचा इतिहास भरीव, मांसल व बांधेसूद अशा स्वरुपांत दाखविण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत आहे असें आज वाटतें.

**केसरी :** शिक्षकानें विद्यार्थ्यांकडून वर्गांत वाचवून घ्यावें...स्फूर्तिदायक, मराठ्यांच्या इतिहासाचें अमृत...

● ●

याव्यतिरिक्त श्री. वि. स. खांडेकर, श्री. चिं. ग. कर्वे, श्री. ग. ह. खरे, प्रिं. ना. वि. पाटणकर, कै. वि. वि. साठ्ये (रि. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, डि. स्कूल बोर्ड सोलापूर) श्री. ग. वि. केतकर इत्यादि नामांकित व्यक्तींचे व दैनिक भारत, विक्रम (सांगली), धनुर्धारी, महाराष्ट्र, मौज, वसंत, विविधवृत्त, काळ, आदेश, किर्लोस्कर इत्यादि प्रमुख नियतकालिकांचे उत्कृष्ट अभिप्राय......

* * *